



यशोगाथा

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १६ जुलै २०२३

# ऋषी सुनक : जीवनाला आयाम देणाऱ्या तत्त्वचिंतक व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास

लेखक-पत्रकार

## दिगंबर दराडे

यांनी उलगडली पुस्तक निर्मितीची संकल्पना

आधुनिक केसरी

भारतीय वंशाचे ब्रिटनचे पंतप्रधान आणि सर्वसामान्य कुटुंबातील एक संघर्षमय व्यक्तिमत्व म्हणजे ऋषी सुनक होय. प्रचंड ध्येयाने प्रेरित होऊन ऋषी सुनक यांनी घेतलेली उंच भरारी निश्चितच मार्गदर्शक ठरणारी आहे. खासदार ते ब्रिटनचे पंतप्रधान होण्यापर्यंत ऋषी सुनक यांचा संघर्षमय प्रवास पंधरा प्रकरणांमध्ये अतिशय सखोलपणे पुस्तक रूपाने मांडण्याचा प्रयत्न लेखक तथा पत्रकार दिगंबर दराडे यांनी केला आहे. ऋषी सुनक या पुस्तकास वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून मे 2023 या एकाच महिन्यात पाच आवृत्ती प्रसिद्ध होतात आणि त्या हातोहात संपतात. यावरूनच या पुस्तकाची अनुभूती वाचकांच्या मनाला भावून जाते. म्हणूनच हे पुस्तक न वाचणाऱ्याला देखील त्याचे प्रचंड वेड लागून जाते. लेखक तथा पत्रकार दिगंबर दराडे यांनी प्रचंड मेहनत घेऊन, परदेश दौरे करून, आपल्यातील विवेक जागृत ठेवत ऋषी सुनक यांच्या व्यापक सामाजिक जीवनाचा धांडोळा घेतला आणि सखोल अनुभूतीच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेत त्यांनी ही सुंदर पुस्तकरुपी कलाकृती वाचकांना भेट दिली. मराठी भाषेत हे पुस्तक अल्पावधीतच लोकप्रिय झाल्यानंतर ते इतर पाच भाषेत प्रसिद्ध होत आहे हेही या पुस्तकाचे एक वेगळे वैशिष्ट्य आणि यश आहे, असे म्हणावे लागेल. याच पुस्तकाविषयी लेखक तथा पत्रकार दिगंबर दराडे यांच्याशी साधलेला खास संवाद वाचकांसाठी...

**● संस्कृतीप्रिय ऋषी सुनक यांच्यावर पुस्तक का लिहावे वाटले ?**

मी ऑगस्ट 2022 मध्ये लंडनला गेलो होतो. तिथे अनेक भारतीय तरुणांना भेटलो. त्यावेळेस अर्थमंत्री म्हणून ऋषी सुनक त्या देशाचे काम पाहत होते. त्यावेळी तेथे व्हॉट्सअप डीपी व समाज माध्यमावर ऋषी सुनक हे नाव प्रचंड चर्चेत होते. त्यावेळेस मी ऋषी सुनक यांच्याविषयी थोडीफार माहिती जाणून होतो. पुढे त्यांच्याविषयी मला प्रचंड उत्सुकता निर्माण झाली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मी माहिती घेऊ लागलो. आणि नकळतपणे ऋषी सुनक यांच्याकडे मी प्रभावीत होत गेलो. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा, त्यांच्या प्रतिभेचा सविस्तर अभ्यास करीत त्यांच्या विषयीचे संदर्भ शोधून काढले आणि ऋषी सुनक हे पुस्तक आकाराला याचा आनंद वाटतो.

**● या पुस्तकाची जडणघडण कशी झाली ?**

हे पुस्तक लिहिताना मला प्रचंड मेहनत घ्यावी लागली. पुस्तक दर्जेदार आणि ज्यांच्यावर आपण लिहीत आहोत त्या व्यक्तिमत्त्वाचा वैविध्यपूर्ण शोध मी घेतला. त्यासाठी मला समाज माध्यमाची आणि इतर स्त्रोताची खूप मदत झाली. माझा पिंड पत्रकार असल्याने समाज प्रश्न मांडताना माझी भूमिका नेहमीच स्वतंत्र राहिली. या निमित्ताने माझ्यातील पत्रकाराबरोबर लेखक जागा झाला आणि ऋषी सुनक यांच्या कार्यकर्तृत्वाचा सखोल अभ्यास करीत, नवे जुने संदर्भ शोधून काढून ती मांडले. या कार्यात अनेकांचे सहकार्य लाभले आणि यातून हे पुस्तक आकाराला आले.

**● या पुस्तकातून वाचकांना वाचावयास काय मिळणार आहे ?**

ऋषी सुनक लंडनमधील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. एक व्यक्ती वयाच्या 42 व्या वर्षी पंतप्रधान होणे या देशासाठी खूप भूषणावह बाब वाटते. त्या उच्चपदापर्यंत पोहोचण्यासाठी केलेली पराकाष्टा, जिद्द आणि इच्छाशक्ती यांच्याशी समरस होत ऋषी सुनक यांनी तावून सुलाखून निघत हे ध्येय गाठले. म्हणून भारतीय वंशाच्या आणि ब्रिटनच्या पंतप्रधानपदाविषयी तेथील लोकांमध्ये प्रचंड आशावाद बघायला मिळतो. त्यांचे देशाप्रतीचे कार्य अचंबित वाटत राहते. इन्फोसीसच्या चेअरमन सुधा मूर्ती यांचे ते जावई असल्यामुळे त्यांना भारतीय संस्कृती प्रिय वाटते. पत्नी अक्षता मूर्ती आणि ऋषी सुनक यांचे प्रेम संबंध, वेगवेगळ्या कॉलेजमधील शिक्षण, ऋषी सुनक हे कृष्णभक्त असल्याने त्यांचे कृष्णाविषयीची आस्था इत्यादी सविस्तर मांडण्याचा मी प्रयत्न केला.

**● पुस्तकात ऋषी सुनक यांची जीवनअनुभूती कशाप्रकारे मांडली आहे ?**

ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक प्रचंड संघर्षाचे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या जीवनात आपल्या देशाविषयी प्रचंड प्रेम आहे. शिवाय लोकांनाही त्यांचे प्रचंड आकर्षण वाटते. आणि त्यांच्यातील श्रेष्ठत्वाचा मानबिंदूही विशेष नोंद घेण्यासारखा आहे. देशकार्य करताना सतत संधीचा शोध घेत त्यादृष्टीने कार्य करणे आणि त्याप्रती तावून सुलाखून निघत आपल्या अभिव्यक्तीला घडवत जाणे याला ऋषी सुनक यांनी प्राधान्य दिले. आणि यातून वैविध्यपूर्ण मूल्यांची त्यांनी कायम जपणूक केलेली बघायला मिळते. ते ब्रिटनचे पंतप्रधान झाल्यामुळे आपल्या भारताला देखील मोठी मदत होणार आहे. हेच विचारातील स्वातंत्र्य आणि त्याचे मूल्य अत्यंत काळजीपूर्वक मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**● ऋषी सुनक यांचा संघर्ष आपण कशाप्रकारे मांडला आहे ?**

ऋषी सुनक हे प्रचंड ध्येयाने पछाडलेले व्यक्तिमत्व आहे. आपल्या भोवतालच्या गोष्टी माणसांना जीवन उभारी देतात. ते शांत आणि संयमी व्यक्तिमत्व आहे. काम, निष्ठा प्रामाणिकपणे केल्यामुळे वयाच्या 42 व्या वर्षी ते ब्रिटनचे पंतप्रधान होतात, म्हणजे हा केवढा मोठा संघर्ष आहे. जीवनाला भिडण्याची ताकद त्यांच्या विविध पैलूतून अधोरेखित झालेली दिसते आणि या संघर्षाचा नेमकेपणाने वेध घेत मी तो संघर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**● ऋषी सुनक यांच्या विविध पैलू बद्दल काय सांगाल ?**

ऋषी सुनक यांनी अगदी कमी वयात जीवन अनुभूती आणि ध्येयाने प्रेरित होऊन कार्य केले. त्यांच्या कार्याकडे डोळसपणे बघताना त्यांनी विशिष्ट गुण आत्मसात केले याचा बोध होतो. त्या गुणांचा बोध आजच्या तरुणाने नक्कीच घेतला पाहिजे. त्यांचे कार्य आणि प्रवास भारवणारा आहे. त्यांचे शिक्षण, व्यक्तिमत्त्वांची जडणघडण खूप प्रेरणादाणी आहे आणि म्हणून या पुस्तकातील एक एक स्टोरी रोमांचकारी वाटत जाते. देशाचा पंतप्रधान राहूनही कधीच पब्लिसिटी करत नाहीत हा एक ऋषी सुनक यांच्यातील महत्त्वाचा गुण आहे, असे मला वाटते.

**● तुम्ही पत्रकारासोबत लेखक झालात त्या प्रवासाबद्दल काय सांगाल ?**

मी सामान्य कुटुंबात जन्मलो. माझे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले. मातीशी प्रामाणिक राहत मीही संघर्ष केला. जे अनुभवायला मिळाले, त्यातून बोध घेत गेलो. त्यातून स्वतःशी प्रामाणिक राहत संघर्ष देखील केला. जगातील घडामोडींवर लक्ष ठेवत विविध देशाचे दौरे, तेथील संस्कृती यांचा अभ्यास करीत गेलो. पर्याप्त परिस्थितीवर मात करीत पत्रकारिता क्षेत्रात रमलो. परंतु आणखी काहीतरी वेगळे करावे या उद्देशाने ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याशी प्रचंड उत्सुकता लागली आणि त्या व्यक्तिमत्त्वाचा अनोखा वैविध्यपूर्ण शोध लंडनमध्ये गेल्यावर घेतला. तो पुस्तक रूपाने मांडण्यात मी यशस्वी झालो आणि मी पत्रकारासोबत लेखकही झालो यासारखा आनंद दुसरा वाटत नाही.

लेखक तथा पत्रकार दिगंबर दराडे यांनी प्रचंड मेहनत घेऊन ऋषी सुनक हे पुस्तक रूपाने वाचकांना हाती दिले. वैचारिकतेला आनंद देणारी ही कलाकृती वाचकांच्या हाती दिली याचा सर्व वाचकांना आनंद आहे.

लेखकाने वैविध्यपूर्ण आशय आणि त्याची उत्तम मांडणी करीत हे पुस्तक वाचकांना हाती दिले त्याचे दमदार स्वागत झाले. लेखकाचे जितके परिश्रम या ग्रंथाला अंतरंग खुलवण्यासाठी झाले आहेत तितकेच हे पुस्तक वाचकांना पानोपानी आनंद देतात.

लेखकाच्या भावी वाटचालीस आधुनिक केसरीच्या मनःपूर्वक शुभेच्छा..!




### पुस्तकाला प्रचंड प्रतिसाद...



पुस्तकाच्या यशाबद्दल सांगताना लेखक तथा पत्रकार दिगंबर दराडे सांगतात, मी हे पुस्तक प्रसिद्ध केल्यावर ते प्रचंड प्रतिसादाने वाचले जाईल याविषयी मला शंकाच होती? परंतु सहा महिन्यात त्याच्या पाच आवृत्ती हातोहात संपतात यावरूनच वाचकांची मागणी आणि वाचनाची भूक अधोरेखित होत जाते. पुस्तक वाचून लगेच फोन करणारे वाचक मी कधीही विसरणार नाही. पुस्तकाचे वाचकांनी भरभरून केलेले कौतुक पंतप्रधान ऋषी सुनक यांच्याबरोबर मलाही निश्चितच आनंद देणारे आहे.

### मराठी भाषेची घोडदौड सुरु आहे...


अलीकडे वाचले जात नाही ही ओरड होते. याबद्दल आपली भूमिका मांडतांना, वाचले जात नाही? हा आरोप मला चुकीचा वाटतो. तरुण आणि सामान्य लोक प्रचंड प्रतिसादाने पुस्तके वाचत आहेत. माझे पुस्तक वाचून वाचकांचे फोन येतात ही मराठी भाषेच्या विकासाची मोठी उपलब्धतता मला वाटते. यावरूनच मराठी भाषेची मोठी घोडदौड सुरू आहे हे निश्चितपणे नोंद घेण्यासारखे आहे.

### लवकरच इतर भाषेत पुस्तक येणार...

इतर भाषेतही माझे हे पुस्तक प्रसिद्ध होते आहे. या पुस्तकाचे मराठीत भरभरून कौतुक झाल्यानंतर प्रचंड मागणी वाढली. मराठी भाषेच्या भरघोस प्रतिसादानंतर इतर हिंदी, इंग्रजी, जर्मन, कन्नड या भाषेत हे पुस्तक वाचकांच्या हाती देण्याचा माझा प्रयत्न आहे.

मुलाखत आणि शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद, संवाद-9423051246

मांडणी व सजावट : अतुल ह. खंडगावकर, औरंगाबाद, संवाद-7218340512




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# हम बोलेगा तो...

आधुनिक केसरी

आपली जीभ साधारण सहा इंचाची. पण ही सहा इंचाची जीभ समोरच्या सहा फुटी माणसाला सहज गारद करू शकते एवढे सामर्थ्य तिच्यात आहे. पण हे भल्याभल्याना उमगत नाही. म्हणून आपल्याकडे ' जिभेवर ताबा ठेवा ' असा सल्ला दिला जातो. हा सल्ला दोन्ही अर्थांनी लागू होतो. आपले आरोग्य बिघडू नये म्हणून डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञ आपल्याला जिभेवर ताबा ठेवा असे सांगतात. म्हणजेच आपल्याला सोसेल, मानवेल तेवढेच खा. कमी खा. हा त्याचा अर्थ असतो. दुसरा अर्थ म्हणजे कमी बोला किंवा योग्य तेच बोला. बऱ्याच ठिकाणी ' आपले म्हणणे थोडक्यात किंवा योग्य शब्दात सांगा ' अशी सूचना लिहिलेली असते. मार्गशीर्ष महिन्यात येणाऱ्या एकादशीला ' मौनी एकादशी ' म्हटले जाते. ही एकादशी त्या दिवशी तरी आपण ' मौन ' धारण करावे यासाठी असते. हे मौन म्हणजे नुसते निःशब्द होणे नाही तर त्यापलीकडेही बरेच काही असते. कोणत्याही प्रकारे काही बोलायचे नसते. पाटीवर किंवा कागदावर लिहून, देहबोलीद्वारे कोणत्याही प्रकारे व्यक्त व्हायचे नाही. मौनात जायचं म्हणजे निर्विचार व्हायचं. निदान काही काळ तरी.

ज्ञानेश्वर माऊली म्हणतात...
ऐसे ते अचिंत्य काय हो बोलावे । मौन स्वीकारावे हेचि भले ।।
याचा अर्थ काही विचार, चिंतन न करता बोलण्यापेक्षा न बोललेले किंवा मौन स्वीकारणेच उत्तम ! पंचतंत्रात एक छान श्लोक आहे. आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिका : । बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थ साधनम ।।
आपल्या मुखदोषामुळे म्हणजेच बोलण्यामुळे पोपट किंवा मैनेला पिंजऱ्यात बंदिस्त व्हावे लागते बगळा मात्र मुक्त असतो कारण तो बोलत नाही. मौनाने सर्व काही साधते असे हा श्लोक आपल्याला सांगतो. अर्थात जेव्हा बोलायचे तेव्हा बोललेच पाहिजे. काही लोक योग्य वेळी बोलत नाहीत. अशा लोकांना वेळ निघून गेल्यानंतर पश्चात्तापाला सामोरे जावे लागते.
शारीरिक श्रमामुळेही जेवढा थकवा येत नाही तेवढा थकवा खूप बोलल्याने येतो. अग्नीतत्व आणि वायुतत्व जे आपल्या शरीरात विद्यमान असतात, ते मोठ्या प्रमाणावर खर्ची पडतात. म्हणून जास्त बोलण्यापेक्षा कृती करणे अधिक चांगले. काही लोक बोलण्यापेक्षा आपल्या कृतीतून समोरच्याला उत्तर देतात. आपल्याला परमेश्वराने दोन डोळे, दोन कान दिले आहेत पण जीभ मात्र एकच दिली आहे. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. जास्त पहा, जास्त वाचा. जास्त ऐका पण कमी बोला. लोक फोनवर सुद्धा एकेक तास एखाद्या व्यक्तीशी बोलत असतात. आमच्याकडे येणारी हिची एक मैत्रीण आहे. त्या बऱ्याचदा आमच्याकडे येतात. त्या आल्या म्हणजे साधारण तासाभराची निश्चिंती असते. त्या आल्या की किचनमध्ये हिच्या अगदी शेजारी उभ्या राहून जे गप्पा सुरु करतात, त्यांना अंत नसतो. बरं गप्पांना कुठलाही विषय चालतो. अगदी भांडेधुणेवाल्या बाईपासून स्वयंपाकापर्यंत. हिच्या मिस्टरांपासून तिच्या मिस्टरांपर्यंत. त्यांचे ते अनेक विषयांवरचे ज्ञान पाहून अक्षरशः स्तिमित व्हायला होते. मला कधी पाणी हवे असले तर मला त्यांना सांगावे लागते की वहिनी एक मिनिट बाजूला होता का ? तेवढे एक मिनिट त्या थांबतात ( माझे भाग्य ! ) पुन्हा त्यांची टकळी सुरु होते. जाताना म्हणतात ' बरं वहिनी निघते आता मी...' मला हायसे वाटते. पण हाय राम ! जातानाचा त्यांचा निरोपाचा अवधी सुद्धा दहा ते पंधरा मिनिटांचा असतो. आता मी जास्त बोलत नाही. थांबतो. नाहीतर म्हणाल. ' हम बोलेगा तो बोलोगे के बोलता है...'



# आनंदी पहाट

## मन:स्वास्थ्य योगाभ्यासातून प्राप्त होते

आधुनिक केसरी

योगाभ्यासाच्या मदतीनं आपल्या शारीरिक आणि मानसिक समस्यांची खात्रीने सोडवणूक होऊ शकते. अनेक विद्यार्थी शारीरिक व्याधी दूर करण्याच्या उद्देशाने तसेच स्वास्थ्य टिकवण्याच्या दृष्टीने योग शिक्षण घेतात. काही विकार उद्भवू नये म्हणून कुतूहलपूर्णता व कुतूहलजागृती म्हणूनही काही जण योगाभ्यासाकडे वळतात. आपली दैनंदिन धावपळ, धडपड ही सर्व पुर्वानुभवांवरच चाललेली असते. ह्या सर्वांमधून मुक्त व्हायचं असेल, तर चित्तावरचे संस्कार शून्यवत करत आणणे जरुरीचं असतं. ही कैवल्य अवस्था किंवा निर्बीज समाधीची अवस्था आहे. कारण यात प्रतिक्रिया शून्य होत जाते. 'मी' चं परमात्मा वेगळेपण संपतं आणि मनही शांत होत जातं. आपल्या वृत्तीमुळेच मन चंचल असतं. वृत्ती शांत झाल्या, की मन हे शांत होतंच. मन स्वतःच्या ठिकाणी स्थिर राहतं. ते इतर कोठेही न जाणे म्हणजे मनःस्वास्थ्य प्राप्त करणे होय. हे मनःस्वास्थ्य आपल्याला योगाच्या अभ्यासातून मिळतं. भीती, राग, द्वेष, मत्सर, आनंद इत्यादी भावनांमुळे शरीरात व्याधी उत्पन्न होतात. त्यामुळे कोणत्याही



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

भावनेचा अतिरेक टाळण्यासाठी यथार्थ ज्ञान होणं महत्त्वाचं असतं. त्यासाठी वृत्तीवर नियंत्रण ठेवणं, योग करणं आवश्यक असतं. योगविद्या ही शरीर, मन यांना सतत क्रियाप्रवण, उत्साही, निरामय ठेवण्यासाठी निरंतन उपयोगी पडणारी विद्या आहे. मानसिक, शारीरिक स्वास्थ्यासाठी, साधी व्याधी बरबादी ठरू न देणं आपल्याच हाती असतं. आपल्या प्रत्येकाला प्रकृतीची काळजी घेणं जरुरीचं असतं. त्यासाठी आवश्यक ती पथ्य पाळणे देखील आवश्यक असतं. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या व्यग्र आणि व्यस्त दिनक्रमांत आपण दीनदुबळ्या अवस्थेलाच निमंत्रित करत असतो, हे नेहमीच विसरतो, अथवा त्याची जाणीव आपल्याला त्यावेळी होत नाही.

# पीठ ...

आधुनिक केसरी

गहू, बाजरी, ज्वारी दळून आणताना आपण नेहमी बारीक दळून आणतो. बेसन दळताना जरा जाडसर दळायला सांगतो. आणि शेवया ,रवा, बट्टी साठी जवळजवळ भरडाच काढला जातो पण थोडा बारीक. पिठाचे असे बरेच प्रकार आपण का दळतो ? कारण ती वस्तू तो पदार्थ त्यानुसार बनत असतो. त्यामुळे या पिठावर हे पदार्थ अवलंबून असतात. दोन व्यक्ती तिसऱ्या विषयी बोलत असल्यास सहजच म्हटलं जातं फार पीठ करत बसू नका !!! किंवा उगीचच कोणाचे दळण दळू नका. अर्थात उगीचच कोणाच्या टिवल्या बावल्या करत बसू नका. पिठाचं सुद्धा कसं आहे बघा. धान्याचं आपण गिरणीतून काढून आणलेले पीठ उपयोगाचे असते. आणि किड्या मुंग्यांनी धान्याचे केलेले पीठ निरोपयोगी असते. लाकडाचे देखील पीठ होते. लाकडांना शक्यतो वाळवी लागते .या वाळवीत इतकी ताकत असते की खूप मोठी झाडे वाळवीमुळे उध्वस्त होतात . घरातील लाकडी सामान सुद्धा वाळवी खराब करते. एकदा वाळवी लागली की ते सर्व सामान खराब होते. त्या वस्तूंचे वाळवी पीठ करते. ते पीठ मात्र खराब असते. ज्या अन्नावर आपण जगतो त्या धान्याचे आपण पीठ करून भाकरी, चपाती बनवतो. हे झाले धान्याचे पीठ. आणखी जिथे आपल्याला पदवी ,पदवीत्तर शिक्षण मिळते त्याला विद्यापीठ म्हणतात. तिथे विद्येचे पीठ होऊन ते आपल्या ज्ञानात भर टाकते. म्हणून ते विद्यापीठ .जिथे संत साहित्य व अध्यात्म्याचे शिक्षण मिळते त्याला संतपीठ म्हणतात. साहित्यात सर्वोच्च पुरस्कार दिला जातो त्याला ज्ञानपीठ पुरस्कार म्हणतात. ज्या घरात खूप छान सुसंस्कारी मुलं घडतात त्या घराला संस्कार विद्यापीठ म्हणतात. जेव्हा कार्यक्रमासाठी सगळे एकत्र बसतात तेव्हा त्याला व्यासपीठ म्हणतात. ज्याप्रमाणे शिक्षण घेताना आपल्याला कोणत्या विद्यापीठात चांगले शिक्षण मिळते याची माहिती असावी लागते .त्याप्रमाणेच मुलासाठी मुलगी शोधताना किंवा मुलीसाठी मुलगा शोधताना आपण कोणत्या घरातील संस्कार चांगले आहेत म्हणजे कोणते विद्यापीठ सुसंस्कारी आहे याचा विचार करतो. प्रत्येक वेळी या गोष्टीचा विचार व्हावा .कोणत्या विद्यापीठातून कोणती माहिती आपल्याला हवी आहे आणि ती योग्य मिळेल का याची खात्री करूनच त्या विद्यापीठात प्रवेश घेतला जावा. विद्यापीठांना आपल्या जीवनात खरोखरच खूप महत्त्वाचे स्थान आहे. आपल्याला एक व्यक्ती म्हणून घडवण्यासाठी विद्यापीठ जे प्रयत्न करतात त्यांच्या आपण सदैव ऋणात असू. कारण आपल्याला खूप कमी गोष्टींची माहिती असते. पण या विद्यापीठामुळे आपल्या ज्ञानात भर पडत जाते. माहितीचा खजिनाच आपल्याला या विद्यापीठातून मिळत असतो. आपल्या ज्ञानात भर पडते. विद्यापीठामधून अनेक नामवंत व्यक्ती घडत असतात. आणि जे खरोखरच खूप मेहनतीने घडतात ते आपल्या भावी जीवनामध्ये आदर्श नागरिक होतात. समाजाला त्यांचा उपद्रव न होता उपयोगच होत असतो. असे हे सर्व पीठं खूप महत्त्वाची व उपयोगी आहेत.
प्रत्येक पिठाशी आपलं नातं जोडलेलं आहे. या पिठाचा आपण एक भाग आहोत....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-७

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**एकें चाराबोरा गुंतलीं नाहीं जीवन चित्तीं । एक एका चला म्हणती एक हुंबरी घेती ॥३॥**
**एकीं एकें वाटा लाविलीं भोळीं नेणतीं मुलें । आपण घरींच गुंतले माळा नासिलीं फुलें ।**
**गांठीचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें । सांपडलें वेठी वोढी रे भार वाहातां मेलें ॥४॥**
**एक ते माया गुंतले घरीं बहुत काम । वार्ता ही नाहीं तयाची तया कांहीं च ठावें ।**
**जैसें होतें शिळे संचित तैसें लागलें खावें । हातोहातीं गेलें वेचुनि मग पडिलें ठावें ॥५॥**
**एकीं हातीं पायीं पटे रे अंगीं लाविल्या राखा । एक ते सोलिव बोडके केली सपाट शिखा ।**
**एक ते आळसी तळीं रे वरी वाढिल्या काखा । सिदोरी वांचून बुद्धि रे केला अवघ्यां वाखा ॥६॥**
**तुका म्हणे आतां कान्होबा आम्हां वांटोनि द्यावें । आहे नाहीं आम्हांपाशीं तें तुज अवघें चि ठावें ।**
**मोकलितां तुम्ही शरण आम्ही कवणासि जावें । कृपावंते कृपा केली रे पोट भरे तों खावें ॥७॥**

# निरुपण

आधुनिक केसरी

**यद्यत् पिबामि तत्तद्धि तीर्थं चरणयोस्तव | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ४४ || मी जे प्राशन करतो, ते तुझ्या चरणांचे तीर्थ असो. तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**चातक श्वाती प्रेम जल, वृष्टि होय चहुँ मास । ग्रहण रञ्ज जल नहिं करे, त्यों भक्तन प्रभु आश ।।१८।।(स्वर्वेद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय)**
**०५/०४/१८ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
चारही महिने वृष्टि होत असते पण चातकाला स्वातीच्या जलाशी प्रेम असतं. थोडंही दुसऱ्या नक्षत्राचं जल तो ग्रहण करत नाही. तद्वतच अनुरागी संत संसारातील सर्व सुख-भोग प्राप्त असतानाही त्या विषयांपासून विरक्त होऊन रात्रंदिवस प्रभूचं चिंतन, स्मरण आणि भजन करतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

# दुश्चीतनिरूपण

आधुनिक केसरी

आपण आता समासाच्या शेवटाकडे आलो आहोत. खरं तर ह्या समासाचा अभ्यास करत असताना एक गोष्ट लक्षात येत आहे ती म्हणजे समर्थांच्याच दासबोधातील दुसऱ्या दशकातील पहिला समास आपण अभ्यासला आहे त्यातील "मूर्खलक्षण" हा समास व त्याचा अर्थ एक सारखाचं आहे. म्हणून आपल्याला अविवेकी पणा कसा घातक ठरू शकतो हा या 'मूर्खलक्षण' समासाचा उपदेश लक्षात आल्याशिवाय रहात नाही. निद्रा, आळस,दुश्चितपणा ही तीन मूर्खाची लक्षणे आहेत.हे तीनही गुण ज्याच्या अंगात आहेत त्यांना कितीही सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला तरी ते स्वतः च व त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्या माणसाचं जीवन नकोसं करतात. आपल्या भल्यासाठी कोणी प्रयत्न करत आहेत ते समजून घ्यावे अंगात नम्रता असावी,केलेल्या उपदेशाचे पालन करून आयुष्याचे सार्थक करावे. हा विवेक दुश्चीत माणसाजवळ नसतो. आत्मसन्मान वाढवावा,विवेकाची ओळख करून घ्यावी. सतत सत्समागमात रहावे. अज्ञान अहिताला मुठमाती द्यावी. आणि हे सर्व लक्षात रहाण्यासाठी परमार्थ मार्गावर चालावे. दासबोध हा "गुरूशिष्य"संवाद आहे. तेव्हा समासाच्या सुरवातीला श्रोत्याने जो प्रश्न विचारला होता त्याचे ऊत्तर शेवटच्या समासात पहायला मिळते ते ऊत्तर काय आहे हे आपण आता पाहूया! त्समागम केला असता मुक्ति मिळण्यास किती दिवस लागतात ? हा तो प्रश्न होता. ऊत्तर- परिस लोहाला सोने करते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# देव आणि नाम भिन्न नाहीत

आधुनिक केसरी

आपल्या अनुभवाला येईल तेच खरे जरी असले, तरी आपण त्याप्रमाणे वागतो का ? पुष्कळ गोष्टी वाईट आहेत असे आपल्या अनुभवाला येते, परंतु त्या करण्याचे आपण टाळतो का ? हाच तर आपल्यांतला दोष आहे. थोर पुरुषांचे मात्र तसे नसते. त्यांना जे अनुभवाला आले ते त्यांनी आचरणात आणून दाखविले, आणि म्हणूनच ते संतपदवीला गेले. खरोखर संतांचे आपल्यावर केवढे उपकार आहेत ! जगातले सुख हे खरे सुख नव्हे, दुःखानेच सुखाचा घेतलेला केवळ वेष आहे तो, असे जेव्हा त्यांच्या अनुभवास आले, तेव्हा त्यांनी त्या सुखाकडे पाठ फिरविली आणि खऱ्या सुखाच्या शोधाला ते लागले. परमेश्वरप्राप्तीतच खरे सुख आहे, असे त्यांना आढळून आले. त्या प्राप्तीचा अगदी सोपा मार्ग म्हणजे ईश्वराचे नाम. हेच, वेदकाळापासून तो आत्तापर्यंत सर्व साधुसंतांनी अनुभव घेऊन सांगितले आहे. सद्गुरूकडून मिळालेले ईश्वराचे नाम प्रेमाने, भक्तीने आणि एकाग्रतेने घेतले तर परमेश्वर आपल्याजवळ येऊन उभा राहतो, असा सर्व संतांनी आपला अनुभव कंठरवाने सांगितला आहे. आपण तसे नाम घेतो का ? नामाकरिता नाम आपण घेतो का ? का मनात काही इच्छा, वासना ठेवून घेतो ? कोणतीही वृत्ती मनात उठू न देता जर नामस्मरण केले तर देव काही लांब नाही. देव आणि नाम ही दोन्ही भिन्न नाहीतच; नाम म्हणजेच देव आणि देव म्हणजेच नाम. नाम एकदा मुखात आले म्हणजे देव हातात आलाच. मुले पतंग उडवितात; एखादा पतंग आकाशात इतका उंच जातो की तो दिसेनासा होतो. तरी तो पतंग उडविणारा म्हणतो, ' माझ्या हातात आहे पतंग; ' कारण पतंगाचा दोरा त्याच्या हातात असतो. जोपर्यंत अखंड नामस्मरणाची दोरी आपल्या हातात आहे, तोपर्यंत परमेश्वर आपल्या हातात आहे. ती दोरी सुटली की परमेश्वर सुटला. आपल्या नामस्मरणाला एका गोष्टीची अत्यंत जरूरी आहे. आपल्या जीवनात परमेश्वरावाचून नडते असे जोपर्यंत आपल्याला वाटत नाही, तोपर्यंत आपले नामस्मरण खरे नव्हे. परमेश्वरच आपल्या जीवनाचा आधार, त्याशिवाय आपण जगूच शकत नाही, अशी वृत्ती बाणल्यावर होणारे नामस्मरण तेच खरे नामस्मरण. आपली स्थिती तर याच्या अगदी उलट ! परमेश्वरावाचून आपले कुठेच अडत नाही अशा वृत्तीने आपण नामस्मरण करतो. मग परमेश्वर तरी कसा येईल ? परमेश्वराचे नाम हेच आपल्या जीवनाचे सर्वस्व समजून नाम घेतले, तर जीवनाचे सार्थक झाल्यावाचून राहणार नाही. नामाने भगवंताची प्राप्ती होणारच ही खात्री असावी. अशा नामालाच ' निष्ठेचे नाम ' असे म्हणतात.



**आजचे बोधवचन आहे - १९५. भक्त, भगवंत व नाम ही तिन्ही एकरूपच आहेत. जेथे नाम आहे तेथे भक्त आहे, व तेथेच भगवंत आहे. श्रीराम समर्थ**

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

**(२४) कीटक : -भुंगा अळीला पकडतो आपल्या बिळात तिला कैद करून टाकतो. भयाने ती आळी सतत भुंग्याचे चिंतन करत शेवटी स्वत भिंगोटी बनते .तसे मनुष्य हि ईश्वराचे चिंतन करता करता ईश्वर बनू शकतो.विषयाचे चिंतन करता करता विषयी बनतो .तर प्रभूचे चिंतन करता करता प्रभूमय बनतो. मग आपल्याला गुरूची किती जरूरी असेल ? आपण गुरुने सांगितलेले आचरण करत राहिल्यासच आपणास वरचा पल्ला गाठता येतो. म्हणजे परम शांती मिळू शकते पण गुरू शिवाय कर्म करत राहिल्यास पदरी फळ पडत नाही.गुरू: साक्षात परब्रह्म असे आपण रोज म्हणतो, पण तसे वागत नाही. तेव्हा आपला परमार्थ केवळ बोलका नसावा, कृतीचा असावा! आपले कर्म करताना सद्गुरुणी दिलेले नाम निष्ठेने घ्यावे. ते नाम त्यानी आपले पुण्य कर्म आणी अध्यात्मिक शक्तीने सिद्ध केलेले असते! क्रमशः**



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**ऋणशेपश्चानिशेषः शत्रुशेषस्तथैव च ।**
**पुनः पुनः प्रवर्तन्ते तस्माच्छेषं न रक्षयेत् ॥**
**सरलार्थ - कर्जाचा शेष ( अल्पसाही भाग), अग्नीचा दोष आणि त्याचप्रमाणे शत्रूचा शेष हे पुनः पुनः पुढे येतात म्हणून (या तिघांचा) शेष राखू नये. स्पष्टीकरण - एखाद्याचे कर्ज सगळेच्या सगळे फेडून टाकावे. शिल्लक राहिल्यास तेच वाढत जाते. आग समूळ विझवावी. एखादी ठिणगी जरी शिल्लक राहिली, तरी ती पुन्हा पेट घेते. शत्रू चालून आला तर त्याचा पुरता बीमोड करावा. त्याला अर्धवट सोडल्यास तो आज ना उद्या मोठा होऊन आपणास उपद्रव देऊ शकतो.**

**पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे**




रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १६ जुलै २०२३


# कलंकित नेता कोणाला म्हणावे ?

आधुनिक केसरी

**शिवसेना उध्दव ठाकरे गटाने फडणवीस हे नागपूरसाठी कलंक आहेत, असा शब्द प्रयोग केला. त्याच बरोबर राज्यातील शिंदे व फडणवीस सरकार हे कलंकित सरकार असल्याचा आरोप केला. यातून भाजपा संतापले. त्यांनी प्रतिउत्तर देताना 'नागपूरकर जोड्याने मारतील, असे म्हणत एकेरी शब्दात ठाकरेवर प्रहार केला. राजकारणात सत्ताधारी व विरोधी पक्षाने टीका करण्याची मर्यादा ओलंडली आहे. ते खालच्या पातळीवरचे शब्द वापरत आहेत.यावरुन महाराष्ट्राचा राजकारणातील सुंस्कृतपणा लोप पावत चालला आहे, हे दिसतेय!**

देशात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर स्व. यशवंतराव चव्हाण यांनी लोकशाहीत सत्ताधारी व विरोधी पक्ष दोन्ही महत्वाचे मानले. यात विरोधी पक्षांने सत्ताधारी पक्षाच्या धोरणावर,निर्णयावर सकारात्मक टीका केली पाहिजे. सत्ताधारी पक्षाने आकस न करती ती टीका स्वीकारली पाहिजे. हे महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना सांगितले. परंतु आज महाराष्ट्रातील राजकीय नेते धुळवंडीतील शिव्या देत आहेत, त्याप्रमाणे बदल्याच्या भावनेतून एकमेकावर शाब्दीक चिखलफेक करत आहेत. हे मुळीच शोभणारे नाही. शिवसेनेचे नेते उध्दव ठाकरे यांनी नागपूरच्या सभेत हिंदुत्वाच्या मुद्दावरून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यपध्दतीवर टीका केली. या मागे संघ हा भाजपा सरकारचे समर्थक असल्याने त्यांचा राग आहे.शिवसेनेने हिंदुत्व सोडले नाही, केवळ राजकीय तडजोड केली तर काय चुकले ? संघाचे नेते मशिदीतीत जातात, इस्लाम धर्माच्या लोकांना भेटतात. भाजपाचे नेते तेच करतात! ते मात्र हिंदुत्ववादी. शिवसेना करत मात्र हिंदुविरोधी कशी ? असा सवाल त्यांनी केला. ठाकरे यांनी प्रथम संघाची राष्ट्रीय विचारधारा समजून घ्यावीस हवी. भाजपा हा संघाला मातृसंस्था मानतो.पक्षातील नेते संघात तालमीत तयार झालेले आहेत. !यात खुद्द पंतप्रधान मोदी,नितीन गडकरी देवेंद्र फडणणीस असे राष्ट्रीय अनेक नेते संघाच्या शिकवणी तयार झालेले आहेत. हे नेते संघाला पूज्य मानतात! ठाकरे परिवार कधी संघाच्या शाखेत गेलेला नाही!संघाची स्थापना १९२५ मध्ये झालेली असून ते हिंदू संस्कृती हिंदुस्थानाचा श्वास मानतात. हिंदू संस्कृतीचे संवर्धन व देशाचे संरक्षण करणे हाच संघाचा उद्देश आहे. संघात त्याग, शिस्त, सेवाभावाची राष्ट्रीयत्वची शिकवण दिली जाते.जातपातीला थारा नाही. तर शिवसेनेची स्थापना मराठी भाषेच्या प्रश्नावर झाली. काँग्रेस पक्षाची स्थापना १८८५ मध्ये इंग्रज अधिकारी एलेन ऑक्टेवियन ह्युम यांनी केली. स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस ही एक चळवळ होती म.गांधीजींनी पक्ष विसर्जीत करण्याचे सूचित केले होते. पण हा पक्ष जीवंत ठेवला गेला. तेव्हा काँग्रेस चळवळीत विविध विचाराचे नेते होते. नंतर विचारात मतभेद झाल्याने अनेकांनी पक्ष सोडला.तेंव्हा हा पक्ष नेहरू व सद्याच्या गांधी परिवाराच्या मालकीचा नाही. पक्ष हा जरी धर्मनिरपेक्ष पक्ष सांगत असला तरी तो सत्तेसाठी तुष्टीकरण करणे, ही त्यांची छूपी राजकीय नीती होती.आता अनेक प्रश्नावरुन उघड होत आहे. राष्ट्र व घटनेपेक्षा त्यांना व्होट बँक महत्वाचे वाटते! त्यामुळे मोदीं सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करत आला आहे. यातून काँग्रेस पक्ष संघ आणि स्वातंत्र्यवीर सावरकारांचा तिरस्कार करत असतो .स्व. शिवसेना प्रमुख ठाकरे यांनी 'काँग्रेसच्या विचाराला गाडा 'म्हटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही काँग्रेसचे विचार मान्य नव्हते, काँग्रेस हे जळते घर आहे, असे म्हंटले आहे. ते काँग्रेस पक्षात गेले नाहीत.त्यांनी शेड्युल कास्ट हा पक्ष काढला होता. शिवसेना प्रमुख ठाकरे यांनी १९८९ मध्ये सत्तेसाठी नव्हे, हिंदूत्वाच्या मुद्दावर भाजपाशी युती केली. त्यानंतर महाराष्ट्रात १९९५ मध्ये भाजपा व सरकार आले,पण उध्दवजी ठाकरे यांनी मात्र भाजपामित्र पक्ष सोडून सत्तेसाठी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी संगत केली. महाराष्ट्रात समान विचारधारेच्या पक्षांनी २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपा, शिवसेना पक्षाने यांनी स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या नंतर ते पुन्हा सत्तेत एकत्र आले स्वातंत्र्यापूर्वीपासून काँग्रेस आणि राष्ट्रीय स्वंयसेवक संघ यांच्यात हाच वैचारिक संघर्ष चालू आहे. काँग्रेसप्रमाणे उद्धवजींना संघावर टीका करण्याचा पूर्णपणे अधिकार आहे.त्यांना आता जर काँग्रेसची विचारधारा मान्य असेल तर त्यांनी संघाकडून सहकार्याची अपेक्षा का करावी ? ठाकरे शिवसेनेने शिंदे -फडणवीस सरकारला कलंकित सरकार म्हंटले. यावरुन वादळ उठले आहे. भाजपा नेत्यांना संताप व्यक्त करण्याची गरज नव्हती.कारण ठाकरेनी भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरुन सरकारवर टीका केली. भ्रष्टाचार हा शब्द भ्रष्ट आणि आचार या दोन शब्दाच्या एकीकरणातून आलेला आहे. विचारवंत डी. एच बेली. यांचे मते 'भ्रष्टाचार स्वतःच्या व्यक्तिगत लाभासाठी मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करणे, म्हणजे भ्रष्टाचार आहे'. प्राचीन कौटील्य शास्त्रात भ्रष्टाचाराचा उल्लेख आहे. भ्रष्टाचार हा प्राचीन काळापासून आलेला संसर्गजन्य जागतिक रोग आहे. २०२१ च्या जागतिक अहवालानुसार भ्रष्टाचारात १८० देशाच्या यादीत भारताचा ८६ क्रमांकावर आहे. भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड आहे. भ्रष्टाचारामुळे देशाला विकासाला खीळ बसते.आपण उपेक्षित समाजाला न्याय देवू शकत नाही. १९३७ मध्ये काँग्रेस अधिपत्या खालील सहा प्रांतिक राज्यात भ्रष्टाचार बोकाळला होता. तेंव्हा महात्मा गांधीनी काँग्रेसवर नाराजी व्यक्त केली होती. नंतर काँग्रेस सरकारने १९४७ मध्ये भ्रष्टाचाराच्या विरोधात कायदा केला. नंतर या कायद्यात अनेक सुधारणा केल्या. पण तत्कालिन पंडीत नेहरु यांचे कार्यकाळात १९४८ मध्ये जीप घोटाळा झाला. या प्रकरणाच्या चौकशी समितीने ब्रिटन भारतीय उच्चायुक्त मेनन यांचेवर ठपका ठेवला. पण काँग्रेसने त्यांचेवर कारवाई न करता,त्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले. देशात काँग्रेस सरकारने भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा दिला. हा पक्ष ५५ वर्षे सत्तेत असताना भ्रष्टाचाराच्या अनेक मालिका उजेडात आल्या आहेत. तेंव्हा काँग्रेसने भ्रष्टाचारावर प्रवचन देऊ नये.त्यांनीच निर्माण केलेल्या सी.बी. आय. व ईडी केंद्रीय तपास संस्था आहेत. आता या संस्थेचा गैरवापर होतो, हे काँग्रसला व विरोधी पक्षाला वाटतेय! काँग्रेसने या तपास संस्था बंद करावयास पाहिजे होत्या.ही तपास यंत्रणा संस्था भ्रष्ट राजकीय नेत्याची चौकशी करू लागताच, ओरड सुरू झाली. ठाकरे भ्रष्टाचाराच्या प्रश्नावर पोटतिडकीने बोलत आहोत काय ? पण तसे नाही. ते केवळ महाविकास आघाडीच्या काळातील भ्रष्टाचारावर पांघरण घालण्यासाठी हा राजकीय गोंधळ घालत आहेत! भाजपाच्या नेत्याने भ्रष्टाचार केला असेल, तर त्यांनी तपास संस्थेला पुरावे द्यावे, त्यांना जेलमध्ये पाठवावे, पण उगाच वल्गना करत बसू नयेत. त्यात भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले! त्यांनाच भाजपाने सत्तेत घेतले. राजकारणात आपण करतो आपण करतो ते पुण्य दुसरा करतो पाप!असे भाजपाचे चालले आहे. ठाकरे यांनी जे केले, तेच भाजपाने करत आहे. मग भाजपाने आगपाखड का करावी ? राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांना शह देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर केंदिय पातळीवर अमित शहा व राज्याचे नेते फडणवीस यांच्या मदतीने राष्ट्रवादी काँग्रेस फुटीला मदत केली! कारण शरद पवार हे भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करत होते,तसेच महाराष्ट्रात भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याच्या उद्देशाने समविचारी पक्ष नसलेला व भाजपा मित्र असलेल्या शिवसेनेला तोडले व सत्ता घेतली. याचा पवारांना राजकीय धडा म्हणून भाजपाने डाव खेळला. पण भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सत्तेत घेण्याचा जो अगाऊपणा केला.हे अनैतिक आहे. हे सामान्य माणसाला मुळीच रुचणारे नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडण्यापूर्वी अजितदादा मुश्रीम,आदींच्या भाजपाने भ्रष्टाचाराचे केले तेव्हा काँग्रेस व शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस नेते त्यांचे समर्थन करत होता. भाजपा सुडबुध्दीने कारवाई करत आहेत, असे ओरड होते ? पण आता त्यांचा सूर बदलला आहे, पवार मुश्रीम यांना शिक्षा होणार काय ? असा सवाल विचारत आहेत. राजकीय नेते भ्रष्टाचाराबाबत सरड्याप्रमाणे भूमिका बदलत असतात. यात मात्र पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांची कोंडी होते! शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी पक्ष सत्तेत असतात राज्याच्या तत्कालिन गृहमंत्र्याला खंडणीच्या आरोपाखाली अटक होणे. जेलमध्ये जाणे. एक माजी मंत्री आंतराराष्ट्रीय गुन्हेगाराच्या भूखंडाचे श्रीखंड करतो.पत्राचाळ भ्रष्टाचार प्रकरणात शिवसेना नेत्याला अटक होते. पालघर येथे संताची क्रूरपणे हत्या होते. तसेच पत्रकारांना जेलमध्ये टाकले जाते. करोनाच्या काळात बनावट रुग्णालय उभारुन भ्रष्टाचार केला जातो. तसेच ठाकरे परिवारावर भूखंडाचे आरोप झाले! ते चुकीचे होते काय ? तेंव्हा राज्याचे महाविकास आघाडीचे सरकार हे कलंकित सरकार नव्हते काय ? देशात घटनेनुसार कायदे,तपास यंत्रणा व न्याय संस्था आहेत. त्याला समोरे का जात नाहीत ? यातून नेत्यांना निर्दोषत्व सिध्द करता येते. पण ते न करता आपल्यावर आरोप केले, म्हणून भाजपावर खालच्यापातळीवर चिखलफेक केली जात, हे विरोधी पक्ष शोभणारे नाही. यातून आपल्या भ्रष्टाचारावर पांघरण घालण्यासाठी हा कांगावा नाही ना ? खर तर! राजकारणात कोणीही धुतल्या तांदुळाचा नाही. देशात काँग्रेस सरकारने भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा दिला. केंद्र व राज्यात सत्ता असताना पक्षाच्या नेत्यांनी करोडो रुपायांचा भ्रष्टाचार केला. भारतात दुर्देवाने गरिबाने पोटासाठी दोन रुपायाची चोरी केली तर त्याला चोर म्हटले जाते, त्यास हातकडी घातली जाते, तो जेल सडतो, तो न्यायासाठी, जामीनासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊ शकत नाही. देशात आर्थिक बळावर श्रीमंत, राजकीय नेते न्याय मिळतो.पण गरीब माणसाला पैश्याअभावी न्याय मिळत नाही,हि शोकांतिका आहे. देशाची तिजोरी लुटणाऱ्यांना राजकीय नेत्यांना हातकड्या घातल्या जात नाहीत, तो उच्च न्यायालय ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत जातो. अटकपूर्व जामीन मिळवितो. कारण त्याचेकडे आर्थिक बळ असते, त्याच जोरावर आज भ्रष्ट नेते थेट सर्वोच्च न्यायालयात जातात, जामीन मिळवितात! यात प्रत्येक भ्रष्ट नेता, मात्र राजकीय षडयंत्र असल्याचे रडगाणे गात असतो. पण हे नेते भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यावरही नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देत नाहीत. काँग्रस पक्षाने भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचेवर जैन डायरी प्रकरणी भ्रष्टाचाराचा आरोप केला होता, तेव्हा त्यांनी लगेच खासदारकी राजीनामा दिला. नंतर त्या आरोपात तथ्य आढळून आले नाही. त्यांनी पुन्हा निवडणूक लढविली व ते निवडून आले. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेत ठाकरेत ही नैतिकता आहे काय ? केंद्रात मोदी सरकार आल्यानंतर देशातील भ्रष्ट राजकीय नेत्यावर कारवाई सुरु झाली विरोधी पक्ष सी.बी.आय. व ईडीचा गैरवापर करत असल्याचा आरोप करत आहे. या प्रश्नावरुन विरोधी पक्ष सर्वोच्च न्यायालयात गेला होता, तेथे विरोधी पक्ष तोंडावर पडला.देशात भ्रष्टाचारात ९५ टक्के विरोधी पक्ष नेते कसे काय सापडतात ? यात ठाकरे शिवसेनेचे काही नेत्यावर भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल झालेले आहेत! मग ते कलंकित नाहीत काय ? यात कलंकित नेता कोणाला म्हणावे ? याचे निकष काय आहेत ? भ्रष्टाचाराबाबत अनेक बड्या राजकीय नेत्या विरोधात गुन्हे दाखल झाले आहेत,काही जण जामीनावर आहेत. देशातील भ्रष्टाचारराची प्रकरणांची वर्षानुवर्षे चौकशी चालू राहते! त्यात न्यायालयात 'तारीख पे तारीख दिली जाते. त्यात केद्रातील सरकार बदलले की! भ्रष्टाचाराची चौकशीची फाईल कायमची बंद होते ? देशात कायद्याच्या भाषेत भ्रष्टाराचाराच्या आरोपाखाली शिक्षा झाली तरच तो दोषी व कलंकित मानला जातोय! पण राज्यातील शिंदे व फडणवीस सरकार हे कलंकित सरकार असेल मग ठाकरे व महाविकास आघाडीचे नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत तेही कलंकित नव्हते काय ? केवळ भ्रष्टाचार विषयावर राजकीय पक्षांनी तुमचा व आमचा न करता करच बसता, खरच त्यांना ! भ्रष्टाचाराची चीड असेल तर भ्रष्ट व्यक्तीला राजकीय पक्षांनी बहिष्कृत केले पाहिजे!त्यांना पक्षाची उमेदवारी देता कामा नये,या विषयावर राजकीय पक्ष एकत्रिक येत नाहीत! पण काँग्रेस पक्ष व इतर विरोधी पक्ष विरोध करणार! कारण देशात काँग्रेसने व्देषाचे राजकारण सुरु केले आहे, सत्ताधारी पक्षाला शत्रू समजून वागत आहेत! खर तर ! लोकशाहीत टीका अभिप्रेत असते, यातूनच लोकशाही व्यवस्था अधिक मजबूत होते! पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत! याचे भान ठेवले पाहिजे. पण काँग्रेसचे नेते मोदींचा वैयक्तीक व्देषाने पछाडलेले आहेत.पुण्याचा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय लोकमान्य टिळक पुरस्कार देण्यात मोदींना देण्यात येणार आहे, यालाही काँग्रेस व विचारसणीच्या संघटनेने विरोध केला आहे, कारण काय तर, म्हणे, मोदींनी लोकशाहीची मूल्ये ही पायदळी तुडवली. मग श्रीमती इंदिरा गांधी यांनी लोकशाहीचा गळाच घोटला, तेंव्हा त्यांचा भारतरत्न पुरस्कार परत मागायचा काय ? विरोधी पक्षाने सरकारच्या धोरणावर, निर्णयावर सकारात्मक टीका केली पाहिजे, त्याबरोबर दोन्ही बाजूनी एकमेकाचा सन्मान केला पाहिजे. पण राजकारणात कटूता वाढत चालली आहे. हे भारतीय लोकशाही व्यवस्थेला धोकादायक आहे.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850






# सर्व मंगल मांगल्ये



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**सर्व मंगल मांगल्ये  शिवे सर्वार्थ साधिके शरण्ये त्रंबक्ये गौरी नारायणी नमोस्तुते श्रीसूक्तातील  श्री वर काही मांडण्याचा प्रयत्न करते आहे. ज्या शासकीय कार्यालयात मी काम करते ते म्हणजे आयकर कार्यालय त्यामुळे तिथे जितका पैशाशी संबंध येतो तितकाच भ्रष्ट व्यवस्थेशीही संबंध येतो म्हणून लक्ष्मी, पैसा, आणि त्या योगाने येणारा भ्रष्टाचार यावर राष्ट्रीय प्रश्नाच्या दृष्टिकोनातून व्यक्त व्हावेसे वाटले.  कार्यालयात मी प्रशिक्षणही देते. त्यातही मुख्य विषय आहे वित्तीय नियम म्हणजे फायनान्शिअल रुल्स. साहजिकच नीतिमत्तेने सरकारी  व्यय यावर बोलणेही क्रमप्राप्तच असते. दुर्दैव आहे की भ्रष्ट व्यवस्था फोफावली असल्याने कायद्याने पैसा आणि कायद्याने व्यय कसा करायचा याचे स्पष्टीकरण देणे म्हणजे पैसा काय आहे हेच मुळात समजावून सांगावे लागते. आज घराघरातून पैसा काय आहे यासाठीचा संस्कार रुजवला  जायला हवा.**

पैसा आपल्यासाठी आहे की आपण पैशासाठी आहोत हे घरातल्या वडीलधाऱ्यांनी मुलांना समजावून सांगायला हवे.

श्री सूक्ताची आवड असल्याने त्यातील  लक्ष्मी म्हणजे श्री ही विशेष आनंद देऊन जाते आणि म्हणून त्याविषयी मांडायचा प्रयत्न करते आहे. ऋग्वेदाच्या परिशिष्टात श्रीसुक्ताचा उल्लेख येतो. पंधरा श्लोकांचे स्तोत्र आहे. आणि सोळावी ऋचा साधकाने कसे असावे यासाठी आहे. या स्तोत्रात लक्ष्मीचा अर्थ श्री या उल्लेखाने येतो साधारण लक्ष्मी उपासना म्हणजे धन ,संपत्ती पैसा यासाठीच केली जाते ना... ?

थोडक्यात लक्ष्मी म्हणजे पैसा अशीच व्याख्या आढळते. पण पैसा हे साध्य आहे का सांगा बरं मंडळी. अहो ते निव्वळ एक साधन आहे . असं बघा तहान लागलेली असताना पाणी पिणे महत्त्वाचं असते की नाही.... ?मग ते स्टीलच्या पेल्यात,  तांब्याच्या पात्रातून, चांदीच्या पात्रातून या गोष्टी गौण असतात की नाही पण आपण त्याच महत्त्वाच्या धरतो. तहान भागवणे ...त्यासाठी पाणी पिणे हे दूरच राहते. पाणी कशातूनही प्यायलो तरी शेवटी तहान भागणेच महत्त्वाचे असते . असं बघा ...भर उन्हामध्ये तुम्ही चालताय आणि तहानेने व्याकुळ झालेले आहात अशा वेळी एखादा जलाशय दिसला तर आपण पटकन ओंजळीने देखील पाणी पिऊन जातो की नाही... ?आणि तो क्षण जास्त तृप्त करून जातो. समाधान देऊन जातो की नाही... ?

अहो मग तसेच पैशाकडे बघायला हव ना....  ?साध्य म्हणून नाही तर एक साधन म्हणून..... प्रपंचासाठी पैसा गरजेचा आहेच...पण आपण पैशाच्याच मागे धावतो. भौतिक गोष्टींच्या मागे धावण्याने तोच सोस वाढतो . हाच चंगळवाद सध्या हात पाय पसरून बसलेला आहे. त्या मागची मनःशांती हे साध्य आपण विसरून जातो.यानिमित्ताने वडिलांची  एक शिकवण नेहमी आठवते, ते म्हणतात की गरजा कमी ठेवाव्यात आणि खरंच त्यामुळे पैशाचा ध्यास, पैशाचा सोस नक्कीच कमी होतो. पैशाच्या मागे धावताना मनःशांती ,सुख, समाधान, आनंद यापासून आपण दूर जातो आहे की नाही... ?आरोग्य पण कमी होत चाललय. सुख, समाधान आणि आनंद यातली रेषा धुसर जरी असली तरी अंतिम टप्पा हा समाधान  आणि आनंदाचाच असायला हवा ना.... ? अगदी तुकाराम महाराजांनी वर्णिलेल्या आनंदाचे डोही आनंदाचे तरंग म्हणजे निर्भेळ आनंद. चिंतामुक्तीचा आनंद. आणि हा आनंद पैशाने मिळतो का सांगा बरे... ?

नाहीच.... कारण तो मानसिक असतो. चित्तातील आनंद टिकला पाहिजे ना.... ? आपण पाहतो की काही श्रीमंत घरांमध्ये याची वानवाच दिसून येते. आनंद नसतो, वृद्धांची काळजी, सेवा नसते ....अपत्य बिघडलेली असतात ....मग अशा ठिकाणी पैसा काय कामाचा  सांगा बरे... ? पैसा म्हणजे काय असावं .... लक्ष्मी म्हणजे पैसा का.... ?अशा दृष्टीने हे विवेचन बघूया.

श्री सूक्तात लक्ष्मीला श्री म्हंटले गेले. श्री म्हणजे वैभव समृद्धी, संपन्नता, शांती ,सौभाग्य म्हणून उपासना सुचवली गेली आहे. म्हणजे श्री ची व्याख्या समृद्धता ,संपन्नता या अर्थाने येथे येते. श्री सुक्तातून ऐश्वर्य अपेक्षित आहे. ज्या ऐश्वर्याचा  मला तर  उपभोग घेता येईलच परंतु दुसऱ्यालाही त्या ऐश्वर्याचा उपभोग देता येईल. म्हणजे दुसऱ्यालाही माझ्याकडून काही मदत होईल, त्याच्या अडीअडचणीला मला त्याला काही सहकार्य करता येईल असे अपेक्षित आहे. ऐश्वर्य असे मिळावे जेणेकरून ब्रह्मचारी ,संन्याशी यांना भिक्षा घालता यावी. यज्ञादिविधी करता यावे. थोडक्यात धर्म रक्षण करता यावे असे ऐश्वर्य अपेक्षित आहे. ऐश्वर्य राष्ट्रोद्धारासाठी उपयोगात यावे. अगदी साधे उदाहरण द्यायचे तर कोरोना काळात भारताने संपन्न देशांनाही मदत केली कारण सध्या देशात असणारी लक्ष्मी धार्मिक अनुष्ठानाने बद्ध आहे आणि म्हणून ती लक्ष्मी दुसऱ्यांच्या उपयोगी पडू शकली. गेल्या कित्येक वर्षात सोने की चिडिया असलेल्या आपल्या भारतातून असे चित्र दुर्मिळ झालेले होते. प्रतिष्ठा मिळावीच.... ती धनाने नाही तर आदराने प्रतिष्ठा मिळावी. यश, श्रीमंती, दीर्घायुष्य ,आरोग्य हे श्री मध्ये अपेक्षित आहे. बघा...एखादी आलिशान वास्तु बघताना आपल्याला असं होतं ....की कधी आपण या वास्तुतून बाहेर पडू ....अशी अस्वस्थता निर्माण होते या उलट एखाद्या मध्यमवर्गीय घरात किंवा अगदी  एखाद्या झोपडीत देखील आपल्याला आपण गेलो तर समाधान मिळते . कारण  तिथे प्रेम, आदर, आनंद मिळतो म्हणून आपल्याला प्रसन्नता जाणवते. या दोन्हीत फरक पैशाचा आहे अर्थात श्री चा. एके ठिकाणी पैसा आहे आणि दुसरीकडे श्री चे वास्तव्य आहे.

म्हणूनच संत तुकडोजी महाराज म्हणतात,

राजास जी महाली
*** सौख्ये कधी मिळाली***
**ती सर्व प्राप्त झाली**
**या झोपडीत माझ्या**

श्रीसुक्तात लक्ष्मी चंद्रां प्रभासां असावी असे म्हटले गेले आहे. म्हणजे शितल ,प्रसन्न, प्रकाशमान ,कीर्ती देणारी असावी असा उल्लेख आहे. ती तृप्त असावी आणि तृप्त करणारी असावी. तृप्तां तर्पयंतीं असे म्हटले गेले आहे. म्हणजे आपले आयुष्य इतरांसाठी, समाजासाठी, राष्ट्रासाठी उपयोगी यावे ज्यायोगे आपण तृप्त असावे, तृप्त करावे असे त्याच्यामध्ये अभिप्रेत असते. अगदी घरात देखील घरच्या लक्ष्मीने तृप्त असावे. घरातील वस्तू ,पदार्थ संपले आहेत म्हणण्यापेक्षा आणावे लागेल असे सकारात्मक बोलावे. अर्थात मनात तृप्त भाव असेल तर याची जाण येतेच की संपण्याचा क्षण हा एकच क्षण असतो पुढच्या क्षणी ती वस्तू अथवा तो पदार्थ आपल्या घरात येणारच असतो. परंतु नसण्याच्या अस्वस्थतेतून घरामध्ये अशांतता निर्माण होऊ शकते. श्री सूक्त तृप्त राहण्यास शिकवते.

दूराधर्षा  ...म्हणजे कशी.... ? ज्या लक्ष्मीचे हरण होणार नाही अशी लक्ष्मी म्हणजे दूराधर्षा. अगदी थोडक्यात सांगायचे तर आमचे आयकर खाते ज्यांच्याकडून पैसा जप्त करून आणते त्यांची लक्ष्मी हरण होते कारण ती वैध मार्गाने आलेली नसते. लक्ष्मी कष्ट साध्य असावी. आपल्या निपुणतेने सातत्याने आपल्याकडे यावी. हस्तीनाद प्रबोधिनीं म्हणजे हत्तीच्या चित्कारा सारखी यावी. म्हणजे वाजत गाजत येणारी लक्ष्मी असावी. लपतछपत, वाम मार्गाने तिने येऊ पण नाही आणि जाऊ पण नाही. कारण तिला अलक्ष्मी म्हंटले गेले आहे. म्हणजे ती वैध मार्गाने, उजळ माथ्याने येत नाही तर लपछपत येते .ती बाह्याः अलक्ष्मी म्हणजे बाह्य इंद्रियांची असते. भ्रम ,माया ,अज्ञान, मोह, विकार याने भरलेली असते. क्षूधा आणि तृष्णा यांनी मलीन झालेली असते. अशी लक्ष्मी ही आपल्या घरातून बाहेर पडावी अशी त्यामागे प्रार्थना आहे.  कष्टाने आलेली लक्ष्मी ही समाधान, सात्विकता आणि आनंद देऊन जाते. ती आपल्याकडे कायमस्वरूपी वास करते. अशी लक्ष्मी कधीही हरण होऊ शकत नाही.  वाम मार्गाची लक्ष्मी वखवख देऊन जाते. म्हणून लक्ष्मी म्हणजे काय .... ?ती कशी असावी.... कशी यावी.... याचे चिंतन करून श्री सूक्ताची उपासना व्हायला हवी.

श्री सूक्तात लक्ष्मीला आर्दां  म्हणले गेले आहे म्हणजे सौम्य, शांत, कनवाळू, दयेने ओली असलेली ती श्री. त्याचबरोबर ती ज्वलंतिम म्हणजे सोन्याच्या कांतीने झळकणारी हवी तशीच ज्वलंत हवी म्हणजे दुष्टांचे निर्दालन करणारी हवी. नित्य पुष्टां म्हणजे तिने नित्य माझे पोषण करावे. आरोग्य प्रदान करावे अशी प्रार्थना केली जाते.

तिला देवजूष्टां म्हटले आहे म्हणजे देवांनाही तिची सेवा करावी असे वाटते.लक्ष्मी कृतज्ञता देणारी असावी असे अभिप्रेत आहे. आयुष्याच्या यशस्वीते मागे आपण एकटे नसतो तर अनेक कळत नकळत हात आपल्याला मदत करीत असतात यासाठीची कृतज्ञता सतत मनात राहायला हवी ही भावना श्री सूक्ताची उपासना देते.

ब्रह्मांड पुराणातील ललिता सहस्त्रनामात देखील लक्ष्मीचा उल्लेख प्राणदात्री म्हणून येतो. म्हणजे ती प्राणांची स्वामिनी आहे. प्राणांना पुष्ट करणारी अशी देवी तिला म्हणलं गेलं आहे. तिला मुक्ती निलया म्हटले जाते. म्हणजे मुक्ती देणारी, मोक्षप्रदायीनी म्हंटले आहे. सलोकता ,सरुपता, सायूज्यता याचे ती भांडार आहे असा ललिता सहस्त्रनामात उल्लेख आहे.

सहस्त्रनामात तिला कैवल्यप्रदायिनी देखील म्हटले गेले आहे. म्हणजे अमूल्य असे कैवल्य पद देणारी लक्ष्मी म्हणजे श्री अशी ती अपेक्षित आहे. म्हणून लक्ष्मी उपासनेत मोक्ष, मुक्ती ,आनंद, समृद्धता संपन्नता हेच अभिप्रेत आहे. म्हणून लक्ष्मी म्हणजे धन, संपत्ती, वैभव एवढाच अर्थ नसून श्री ची समृद्धी त्यात मागितली जाते. यासाठी लक्ष्मीची उपासना व्हावी.

लक्ष्मीमध्ये लक्ष्मी, सरस्वती ,काली ही तिन्ही रूपे सामावलेली आहेत. त्या दृष्टीने लक्ष्मीची उपासना असावी. दासबोधात समर्थांनी लक्ष्मीचे स्तवन लिहिताना  तिला सरस्वती, शारदा असा उल्लेख त्यांनी केलेला आहे.  तिला अमृतरुपी  म्हटलं आहे. तर कालीचे रूप म्हणजे धैर्य मिळावे असे अपेक्षित आहे. आपणा सगळ्यांचीच वाटचाल मनःशांतीकडे आणि त्यायोगे मोक्षाकडे, मुक्ती कडे  व्हावी म्हणजे श्री कडे वाटचाल व्हावी  यासाठी तिच्या चरणी आत्मीय प्रार्थना .

# जागतिकीकरणात पत्रकारिता



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**दुसऱ्या महायुद्धानंतर विकसित राष्ट्रांच्या उत्पादन वाढीस नवी बाजारपेठ निर्माण करून देण्याच्या उद्देशाने निव्वळ आर्थिक हित समोर ठेवून विकसनशील राष्ट्रांना विकासाचे स्वप्न दाखवत उभी केलेली भांडवली आंतरराष्ट्रीय संरचना म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण ही प्रक्रिया लोकांनी स्वीकारलेली नसते. लोकशाहीमध्ये लोक प्रत्यक्षपणे सहभागी होत नसतात तर त्यांचे प्रतिनिधी दिशा ठरवत असतात. विशेषतः नुकत्याच स्वतंत्र झालेल्या आणि सामंतीपणाच्या खुणा बाळगणाऱ्या आणि अर्ध वसाहतिक असलेल्या भारतासारख्या राष्ट्रांमध्ये तर आपले प्रतिनिधी जनतेचा विचार न करता स्वतःच्या सामंती वृत्तीचा विचार करूनच निर्णय घेत असतात.**

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत पत्रकारितेची महत्त्वाची भूमिका आहे. कारण शासनाची ध्येय धोरणे आणि सामान्य जनता यांच्यामध्ये पत्रकार उभा असतो. हे त्याचे उभे असणे केवळ दोघांनाही विरोध करण्यासाठी नसून परस्परांमध्ये संवादी वातावरण तयार करण्याची भूमिका पत्रकारितेने घेतली पाहिजे. ज्या ठिकाणी

जो चुकेल त्यास त्याची चूक दाखवून देण्याचे कार्य पत्रकार करत असतात. आज सद्यस्थितीत भारतात ७४५ टीव्ही चॅनल्स असून ३७९ मनोरंजन विषयक तर ३६६ चॅनल वृत्त आणि माहिती प्रसारित करणारे आहेत. आणखी तीनशे चॅनल सुरू करण्यासाठीचे परवाने सरकारने प्रलंबित ठेवले आहेत, अशी माहिती आहे. सध्या इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून जवळपास ३५ हजार कोटींची वार्षिक उलाढाल होत असते. येत्या चार-पाच वर्षात हा व्यवसाय दुप्पट होण्याची शक्यता अभ्यासक वर्तवत आहेत. यात वृत्तपत्रांची आकडेवारी आणि त्यांची मिळकत मिळवली तर हा व्यवसाय किती प्रचंड आहे याची कल्पना येईल. अशा या गंभीर वातावरणात मानवी आयुष्य त्याचे जगणे कर्कशपणे बदलविणाऱ्या जागतिकीकरणात

माध्यमांची, पत्रकारितेची भूमिका केवळ काळसुसंगत असून चालणार नाही तर न्याय्यपूर्ण आणि विवेकी असणे गरजेचे आहे. सामाजिक बांधिलकीच्या हेतूने केली जाणारी पत्रकारिता आज फार क्वचित प्रसंगी दिसून येते. पत्रकारितेसाठी आवश्यक असणारे गुण एखाद्या व्यक्तीकडे असोत अथवा नसो तो भांडवलशाहीचा शासनकर्त्यांचा उत्तम भाट असेल तरच या व्यवसायात टिकून राहू शकतो ही वस्तुस्थिती आहे. शोध पत्रकारिता इतिहास जमा होऊन त्याची जागा प्रतिशोध पत्रकारितेने घेतली की काय अशी शंका मनात येते. साहित्य, संस्कृती आणि इथल्या परंपरांचे भानही कित्येक पत्रकारांना नसल्यातच जमा आहे. वृत्तपत्र हे समाज जागृतीचे साधन बनले पाहिजे असे पूर्वीच्या पत्रकारांना वाटायचे. बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, शि. म. परांजपे, आचार्य अत्रे ही सर्व मंडळी साहित्य, समाज, संस्कृतीची अभ्यासक होती. या सर्व परंपरेला आज छेद देण्याचे कार्य होताना दिसते. जागतिकीकरणाच्या व्यामिश्र प्रक्रियेत माध्यमांनी शोषितांच्या जगण्या मरण्याचे प्रश्न लावून धरले नाहीत तर भावनेचा उद्रेक होऊन सामाजिक व्यवस्था धोक्यात येऊ शकते. श्रमिक शोषितांचे जगणे  असह्य करणारी भांडवलशाही ते संपवणार हे निश्चित आहे. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा या दुष्टचक्राचे आवर्तन थांबवून नवजनवादी लोकशाही मार्गाने श्रमिक शोषितांची सत्ता स्थापून शोषणमुक्त समाज व्यवस्था निर्मितीसाठी पत्रकारांनी पत्रकारिता केली पाहिजे. दररोजच्या जगण्याचा जेथे खेळ खंडोबा

होतो तेथे खेळाच्या आणि मनोरंजनाच्या नावाखाली चाललेला चंगळवाद आणि त्याला मिळणारी प्रसिद्धी थांबली नाही तर आज ना उद्या या देशाला गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल. जागतिकीकरण ही केवळ एक सुटी संकल्पना नसून माणसाचे जगणे मरणे अंतरबाह्य जखडून टाकणारी अमूर्त अशी बाब आहे. देशाचे सार्वभौमत्व, अंतरिक कायदा व्यवस्था आणि समाज स्वास्थ्य टिकवून ठेवण्याच्या कामी पत्रकारितेने अग्रेसर भूमिका घेतली पाहिजे. प्रसार माध्यमांनी अशा परिस्थितीत न्यायाधीशाची भूमिका न बजावता जबाबदारीने वागून सत्यशोधन केले पाहिजे. अलीकडे प्रसार माध्यमांना मंत्रचळासारखा विकार जडलेला आहे. स्थानिक घटना प्रसंगांचे




चित्रनही ते पाश्चात्यांच्या परिप्रेक्ष्यातून करू लागले आहेत हे वाईट आहे. जागतिकीकरणाच्या या गदारोळात पाश्चात्य साम्राज्यवादी शक्तीने दोन कामे त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाची केली आहेत. ते चूक की बरोबर हा वादाचा मुद्दा होऊ शकेल त्यापैकी एक म्हणजे भारतीय समाज व्यवस्था मोडीत काढणे आणि दुसरे त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एकूण भारतीय भाषा, साहित्यावर पाश्चात्य विचारांचे बीजारोपण करणे होय. वरवर पाहता या गोष्टी आपणास क्षुल्लक वाटत असतात पण दूरगामी परिणामाच्या दृष्टिकोनातून या गोष्टी चिंतनीय आहेत. एक वेळ संस्था मोडीत निघाल्या तरी चालतील पण व्यवस्था टिकली पाहिजे, असे विनोबा भावे का म्हणायचे याचे प्रत्यंतर आज जागतिकीकरणाच्या काळात येऊ लागले आहे. वृत्तपत्र, रेडिओ, दूरचित्रवाणी आणि इंटरनेटच्या माध्यमातून एका अफाट माहितीच्या जंजाळात माणूस दिवसेंदिवस गुरफटून जात आहे. माहितीचा खजिना हाती लागल्यानंतर चमत्कारी दिव्याप्रमाणे आपण काही वेगळे करू शकू, अशा अविर्भावात आज प्रत्येक माणूस वावरत आहे. पण ज्ञानाच्या क्षेत्रात सामान्य ज्ञान ही केवळ पहिली पायरी असते, याचे भान फार थोड्यांना असते. स्वामी चक्रधरांनी सांगितलेल्या ज्ञानाच्या चार प्रकारांची तर गोष्ट कोणीही काढू नये. माझ्या शेजारच्या घरातील माणूस किती दिवसापासून आजारी आहे, त्याचे आम्हास काही सोयर सुतक नसते, पण कुठल्यातरी शकीराच्या सामाजिक बांधिलकीवर आणि मायकल जॅक्सनच्या पोटात मृत्यू समयी मिळालेल्या औषधी गोळ्यांवर आमची वांझ चर्चा होत असते. अशी धादांत बिनकामी माहिती ज्या माध्यमांच्या द्वारे आमच्यापर्यंत पोहोचते त्या माध्यमातून पत्रकारांना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर एखादी लेखमाला अथवा  डॉक्युमेंटरी काढावी वाटत नाही, हे दुर्दैव होय. आज पत्रकारितेमध्ये पेड न्यूजचा प्रकार वाढतो आहे आणि

तो लोकशाही मूल्यवस्थेला मारक ठरणार आहे. हे पत्रकारांनी अगोदर लक्षात घेतले पाहिजे, लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ म्हणून ज्या क्षेत्राला ओळखण्यात येते, तोच जर असा आतून पोखरला जात असेल तर इमारत कोसळण्यास वेळ लागणार नाही. पत्रकारितेमध्ये आणखी काही वाईट प्रवृत्तींचा शिरकाव अलीकडच्या काळात झाला. कोणत्याही कायद्याचा वापर हा आपण कसा करतो यावर त्याचे सर्वस्व अवलंबून असते.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

रविवार, १६ जुलै २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -३००
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 16 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-300 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# दोन्ही देशांच्या संबंधांना आणखी दृढ करण्यासाठी नव्या योजनांची आखणी

## पंतप्रधान नरेंद्र मोदी : संयुक्त अरब अमिरातीचा दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**अबुधाबी : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांचा फ्रान्सचा दौरा झाल्यानंतर शनिवारी संयुक्त अरब अमिरातच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी युएईचे राष्ट्रपती शेख बिन जायद यांची भेट घेतली आणि त्यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक देखील केली. या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आहे. राष्ट्रपतींच्या भेटीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, अबुधाबीला आल्यानंतर राष्ट्रपतींची भेट घेऊन आनंद झाला. तसचे युएईच्या राष्ट्रपतींनी केलेल्या स्वागतासाठी पंतप्रधान मोदींनी त्यांचे आभार मानले आहेत.**



पुढे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, आम्ही दोन्ही देशांच्या संबंधांना आणखी दृढ करण्यासाठी नव्या योजनांची आखणी केली आहे. तसेच या बैठकीमध्ये दोन्ही देशांच्या व्यापराला चालना देण्यासाठी देखील चर्चा करण्यात आल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या दौऱ्यामध्ये युएईचे राष्ट्राध्यक्ष शेख बिन जायद यांच्यामध्ये अनेक सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती भारत आणि युएईच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. पुढे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं की, 'आम्ही दोन्ही देशांच्या संबंधांना आणखी दृढ करण्यासाठी नव्या योजनांची आखणी केली आहे. तसेच या बैठकीमध्ये दोन्ही देशांच्या व्यापराला चालना देण्यासाठी देखील चर्चा करण्यात आल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.' तर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या दौऱ्यामध्ये युएईचे राष्ट्राध्यक्ष शेख बिन जायद यांच्यामध्ये अनेक सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती भारत आणि युएईच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि अबू धाबीच्या शिक्षण मंत्रालयाने शनिवारी आयआयटी दिल्लीचे कॅम्पस स्थापन करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्याची माहिती शिक्षण मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी दिल्ली ही आयआयटी मद्रास नंतर बाहेरील देशात आयआयटीचा कॅम्पस स्थापन करणारी दुसरी संस्था आहे. आयआयटी मद्रासने टांझानियाच्या झांझिबारमध्ये कॅम्पस स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे. याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी COP28UAE चे अध्यक्ष डॉ. सुलतान अल जबर यांची भेट घेतली आहे. तसेच त्यांच्या भेटीमुळे अत्यंत आनंद झाल्याचं पंतप्रधान मोदी यांनी म्हटले आहे. पंतप्रधान मोदी यांनी ट्विट करत या बैठकीबद्दल माहिती दिली आहे.

### चर्चेतली बातमी

## विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसमध्ये मोर्चेबांधणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे येण्याची शक्यता असून, त्यासाठी पक्षातील काही नेत्यांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्लीत जाऊन पक्षाध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे यांची भेट घेतली. या भेटीत विरोधी पक्षनेतेबदाबाबत काही नावांची चर्चा झाल्याचे समजते. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे होते. अजित पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादीचे संख्याबळ घटले आहे. राष्ट्रवादीत फूट पडल्यामुळे विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद दुसऱ्या क्रमांकाचे आमदार असलेल्या काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही विरोधी पक्षनेते पद काँग्रेसकडे जाईल, असे सूचित केले होते.

काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी तीनच दिवसांपूर्वी राज्यातील प्रमुख नेत्यांना दिल्लीत बोलावून बैठक घेतली होती. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर तसेच आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा झाली. विरोधी पक्षनेतेपदावर लगेच दावा करायचा नाही, असे बैठकीत ठरले असले तरी, हे पद पक्षाकडे येणार असेल, तर त्याची जबाबदारी कुणावर सोपवायची, याबाबत पक्षश्रेष्ठींकडूनही चाचपणी करण्यात येत आहे. पटोले यांनी आजच खरगे यांची भेट घेतली. या भेटीत विरोधी पक्षनेतेपदाबाबत तसेच काही नावांबाबत चर्चा झाल्याचे समजते. स्वतः पटोले हे सुद्धा विरोधी पक्षनेते पदासाठी इच्छूक आहेत. याशिवाय विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्याही नावांची चर्चा आहे.

## रवींद्र महाजनी पंचत्वात विलीन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अभिनेते रवींद्र महाजनी यांनी ७७ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. पुण्यातील तळेगाव-




दाभाडे फ्लॅटमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आला. रवींद्र महाजनी यांच्यावर नवी पेठे येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. रवींद्र महाजनी यांच्या अंत्यदर्शनासाठी अनेक मराठी कलाकार पोहोचले आहेत. आठ महिन्यापूर्वी हवापालट म्हणून त्यांनी तळेगाव दाभाडे तालुक्यातील आंबी गावातील एका सोसायटीत भाड्याने एक फ्लट घेतला होता. त्यांची प्रकृती बराच काळ ठीक नव्हती त्यामुळे ते हवापालट करण्यासाठी आले होते. शुक्रवार सकाळपासून त्यांच्या घरातून दुर्गंधी येऊ लागल्यानंतर शेजाऱ्यांनी पोलिसांना सांगितले. मराठी चित्रपटसृष्टीत रवींद्र महाजनी यांच्या निधनाने शोक व्यक्त केला जात आहे.

## २३ ऑगस्टला यान चंद्रावर उतरविण्याचे नियोजन : इस्त्रो

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीहरीकोटा :** २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजून ४७ मिनिटांनी 'चंद्रयान-३' चंद्राच्या पृष्ठभागावर अलगद उतरविण्याच प्रयत्न केला जाईल, असे भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो)चे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी शुक्रवारी सांगितले.

सॉफ्ट लँडिंग यान अलगद उतरविणे हे तांत्रिकदृष्टया आव्हानात्मक मानले जाते. चंद्रयान-३ हे १ ऑगस्ट रोजी चंद्राच्या कक्षेत प्रवेश करेल, अशी माहिती सोमनाथ यांनी यानाच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर पत्रकारांना दिली. २३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५.४७



मिनिटांनी चंद्रयान-३ अलगद उतरविण्याची योजना आहे. मागील मोहिमेमध्ये काय चूक झाली याचा अभ्यास करण्यासाठी एक वर्ष लागले. दुसरे म्हणजे आम्ही त्यात सुधारणा करण्यासाठी कोणती पावले उचलली पाहिजेत आणि काय चूक होऊ शकते याचा अभ्यास केला. त्या आधारावर पुनरावलोकन केले, असे ते म्हणाले. सतीश धवन अंतराळ केंद्रावरील प्रक्षेपण केंद्रावर राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते-लेखक विनोद मानकारा यांच्या नवीन पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. 'प्रिझम- द ॲन्सेस्ट्रल ॲबोड ऑफ रेनबो' असे शीर्षक असलेल्या या पुस्तकात विज्ञानविषयक लेख आहेत. धवन अंतराळ केंद्रावर ऐतिहासिक प्रक्षेपणाची उलटगणती सुरू असताना इस्त्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी हे पुस्तक विक्रम साराभाई अंतराळ केंद्राचे संचालक एस. उन्नीकृष्णन नायर यांच्याकडे सुपूर्द करून प्रसिद्ध केले. यावेळी इस्त्रोचे अनेक शास्त्रज्ञ आणि पुस्तकाचे प्रकाशक उपस्थित होते.

## खातेवाटप करताना मुख्यमंत्र्यांना डावलले

### राष्ट्रवादीचे नेते आ. अनिल देशमुख यांची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** राज्यात मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर शुक्रवारी



बहुप्रतिक्षित खातेवाटप झाले. हे खातेवाटप करताना भाजपच्या वरिष्ठांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डावलल्याचे दिसते, अशी टीका माजी गृहमंत्री व राष्ट्रवादीचे नेते आ. अनिल देशमुख यांनी केली. एकनाथ शिंदेंसाठी ही धोक्याची घंटा असल्याचेदेखील ते म्हणाले.

अकोल्यात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यासाठी आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राष्ट्रवादीतील नेते आमदारांनी सत्ताधाऱ्यांकडे सात मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर खाते वाटपाचा प्रश्न रेंगाळला होता. खातेवाटपावरून खल सुरू होते. दिल्ली वाऱ्या झाल्या. त्यानंतर बहुप्रतिक्षित खातेवाटप शुक्रवारी जाहीर करण्यात आले. सध्याच्या मंत्रिमंडळात अजित पवार गटाचा वरचष्मा दिसून येतो. सगळी महत्त्वाची खाती त्यांच्याकडे गेली आहेत. राष्ट्रवादीचे आमदार अनुभवीदेखील आहेत. या खातेवाटपात सर्वाधिक शिंदे गटाचे नुकसान झाले. खातेवाटप करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डावले गेल्याचे दिसून येते. भाजपने राष्ट्रवादीच्या नऊ आमदारांना मंत्री करून त्यांच्याकडे महत्त्वाची खाती दिली. आगामी काळात एकनाथ शिंदेंसाठी ही धोक्याची घंटा ठरू शकते, असेही देशमुख म्हणाले. पक्ष संघटन बळकटीसाठी आगामी काळात विविध ध्येय धोरण राबविण्यात येणार आहे. कुठल्याही प्रकारच्या प्रलोभनाला बळी न पडता राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने आणि ताकदीने शरद पवार यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सामाजिक समतेचा विचार जनतेच्या मनात रुजवण्याचे काम संघटनेमार्फत करण्यात येईल, असे अनिल देशमुख म्हणाले.

## रणनीती ठरविण्यासाठी विरोधी पक्षांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** शेतकऱ्यांना नुकसान भरपाई, कमी झालेल्या पावसाने झालेली चिंताजनक स्थिती, महागाई, राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था आदी मुद्द्यावर सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाचा राहील असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. १७ जुलैपासून विधीमंडळाचे अधिवेशन सुरू होत असून तत्पुर्वी १६ जुलै रोजी विरोधी पक्षांची बैठकीत धोरण निश्चित केले जाईल असेही त्यांनी सांगितले. शुक्रवारी मिरजेत महालक्ष्मी मूर्तीचे अनावरण आणि चौक सुशोभीकरणाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आ. पाटील आले होते. यावेळी माध्यम प्रतिनिधींनी त्यांच्याशी संवाद साधला.



# चंद्राच्या दिशेने भारताची पाऊले!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची (इस्रो) आकाशाकडे वेगाने जाणारी पाउले आणि चंद्राला स्पर्श करण्याचे त्यांचे प्रयत्न पाहण्यासाठी संपूर्ण जगाने भारताचे अभिनंदन केले आहे.चीनने देखील भारताच्या चांद्रयान ३ चे स्वागत करत भारताचे अभिनंदन केलें आहे. इस्रोने चांद्रयान-३ मोहीम सुरू केली आहे ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे. भारत अवकाशाच्या जगात एक विक्रम करणार आहे. चांद्रयान-३ हे चंद्राचा शोध घेणारी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) ची तिसरी चंद्र मोहीम आहे. तज्ज्ञांच्या मते, यामुळे सूर्यमालेचा इतिहास आणि त्याची उत्पत्ती समजण्यास मदत होईल. त्यात चांद्रयान-2 सारखा लँडर आणि रोव्हर असेल, पण ऑर्बिटर नसेल. चांद्रयान-३ चा फोकस चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षित लँडिंग करण्यावर आहे.**

मिशनच्या यशासाठी नवीन उपकरणे तयार करण्यात आली आहेत आणि अल्गोरिदम सुधारण्यात आले आहेत. चांद्रयान-2 मोहीम ज्या कारणांमुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरू शकली नाही त्या कारणांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. जर सर्वकाही योजनेनुसार झाले तर हे वाहन 23 किंवा 24 ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरेल. या मोहिमेमुळे अमेरिका, रशिया आणि चीननंतर चंद्रावर सॉफ्ट लँड करणारा भारत हा जगातील चौथा देश बनणार आहे.

चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करताच आपण जगातील निवडक देशांच्या श्रेणीत येऊ, असे खगोलशास्त्रज्ञ डॉ. शशी भूषण पांडे यांनी जागरण प्राइमला सांगितले. एवढेच नाही तर हे काम इतर ग्रहांवरही होऊ शकते असा विश्वासही आपण मिळवू शकतो. ते म्हणतात की, पहिले काम म्हणजे चांद्रयान-३ चे सॉफ्ट लँडिंग करणे. त्याचे रोव्हर लँडिंगनंतर चंद्रावर फिरण्यास सक्षम असेल.

चांद्रयान-3 चंद्राच्या सर्वात दुर्गम भागात जाईल. चंद्राचा दक्षिण ध्रुवीय प्रदेश हा अतिशय वेगळा आणि चंद्राचा सर्वात दुर्गम प्रदेश आहे. सूर्यप्रकाश अनेक भागांमध्ये पोहोचत नाही. या भागात पूर्ण अंधार आहे. येथे तापमान -200 अंश सेल्सिअसच्या खाली जाऊ शकते. सूर्यप्रकाशाचा अभाव आणि अत्यंत कमी तापमानामुळे उपकरणे चालवणे कठीण होते. याव्यतिरिक्त, अनेक खड्डे आहेत, ज्यांचा आकार काही सेंटीमीटर ते अनेक किलोमीटरपर्यंत आहे. या मोहिमेमुळे चंद्राची निर्मिती आणि उत्क्रांती यासह पृथ्वी आणि सूर्यमालेचा इतिहास आणि उत्पत्ती समजून घेण्यात मदत होईल. विश्व किती विशाल आहे याचेही गूढ उकलता येते. चंद्र देखील सर्वात जवळचा खगोलीय पिंड आहे. यावर अवकाश संशोधनाचा प्रयत्न करता येईल.ते म्हणतात की चांद्रयान-३ नंतर चंद्रावर पाणी आहे की नाही हे देखील समजू शकते. यासोबतच तेथील रासायनिक रचना कशी आहे, तेथील नैसर्गिक घटक कसे आहेत हेही कळू शकते. इतर ग्रहांवर यशस्वीरीत्या जाण्याचा मार्गही त्यामुळे खुला होऊ शकतो.

धोरणात्मक दृष्टिकोनातून देखील खूप महत्वाचे आहे. हे इस्रोच्या 'रॉकेट' लाँच व्हेईकल मार्क-III (LVM-III) वरून प्रक्षेपित केले जाईल. त्याचे यशस्वी प्रक्षेपण झाल्यास, ते भविष्यात संरक्षण संशोधनाला आत्मविश्वास आणि बळ देऊ शकेल.

22 ऑक्टोबर 2008 रोजी भारताची पहिली चंद्र मोहीम जर आपण इतिहासाची पाने उलटली तर आपल्या लक्षात येईल की अमेरिकेने 1972 मध्ये चंद्रावर आपले शेवटचे वाहन सुरक्षितपणे उतरवले होते, तर रशिया किंवा त्याऐवजी सोव्हिएत युनियनने 1976 मध्ये शेवटच्या वेळी हे केले होते. तेव्हापासून आजतागायत गेल्या अर्ध्या शतकात हे दोन्ही देश दुर्बिणीच्या किंवा संशोधन उपग्रहाच्या नजरेतून चंद्राकडे पाहत आहेत.

भारताने 22 ऑक्टोबर 2008 श्रीहरिकोटा येथून चांद्रयान-1, चंद्रावर भारताची पहिली मोहीम यशस्वीरित्या प्रक्षेपित केली. चंद्राच्या रासायनिक, खनिज आणि फोटो-जिओलॉजिकल मॅपिंगसाठी हे यान चंद्राभोवती 100 किमी उंचीवर फिरत होते. या यानात भारत, अमेरिका, यूके, जर्मनी, स्वीडन आणि बल्गेरियामध्ये उत्पादित 11 वैज्ञानिक उपकरणे होती. सर्व प्रमुख मोहिमेची उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, मे 2009 मध्ये कक्षा 200 किमी पर्यंत वाढवण्यात आली. या उपग्रहाने चंद्राभोवती 3400 हून अधिक प्रदक्षिणा केल्या. 29 ऑगस्ट 2009 रोजी अंतराळयानाशी संपर्क तुटल्याने हे अभियान संपले.

भारताने 2019 मध्ये चांद्रयान-2 लाँच केले. त्या काळात ही मोहीम यशस्वी झाली असती तर याच मोहिमेद्वारे चंद्रावर यशस्वी सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला असता, परंतु त्यावेळी लँडरमध्ये बिघाड झाल्यामुळे ते होऊ शकले नाही. विशेष म्हणजे 2019 पासून आतापर्यंत इतर कोणताही देश हे करू शकला नाही. 2019 मध्ये एका इस्रायली खाजगी कंपनीने असे करण्याचा प्रयत्न केला, परंतु मिशन अयशस्वी झाले. यानंतर 2021 मध्ये यूएईच्या रोव्हरसह जपानची चंद्र मोहीमही अयशस्वी ठरली होती. चीन सध्या पृथ्वीच्या या एकमेव उपग्रहावर सॉफ्ट लँडिंगचा एकमेव मास्टर आहे, ज्याने 2013 ते 2020 या कालावधीत तीन वेळा निर्दोष पद्धतीने हे केले.

**चांद्रयान-2, चांद्रयान-3 किती वेगळे**

चांद्रयान-2 चे एक काम चंद्राच्या कक्षेत ऑर्बिटर स्थापित करणे हे देखील होते, जे यावेळी केले जाणार नाही. 2019 मध्ये तिथे बसवलेले ऑर्बिटर अजूनही चांगल्या स्थितीत आहे. चांद्रयान-३ च्या यशातही त्यांचा महत्त्वाचा वाटा असेल. इस्रोचे म्हणणे आहे की, चांद्रयान-3 ची तयारी चांद्रयान-2 च्या विरुद्ध पद्धतीने करण्यात आली आहे. याला फेल्युअर बेस्ड मॉडेल असे म्हटले जात आहे, म्हणजे कोणत्या परिस्थितीत काय चूक होऊ शकते, अशी भीती समोर ठेवून सर्व तयारी करण्यात आली आहे. चांद्रयान-3 मध्ये ऑर्बिटरच्या जागी एक प्रोपल्शन मॉड्यूल स्थापित केले गेले आहे, जे नेव्हिगेशनला मदत करेल. चांद्रयान-३ चे लँडर अधिक मजबूत करण्यात आले आहे. हे अनेक फॉल बॅक/पर्यायी प्रणाली आणि सेन्सर्स वापरते. चांद्रयान-2 लँडरच्या अपयशास कारणीभूत असलेल्या सॉफ्टवेअर समस्येचे निराकरण करण्यात आले आहे. लँडरमध्ये आता पाच ऐवजी चार मोटर्स आहेत. चांद्रयान-३ तपासण्यासाठीही शेकडो चाचण्या करण्यात आल्या आहेत. लँडरची रचना अशी आहे की त्याचा एक पाय जरी दोन



मीटर उंच खडकावर पडला तरी असमतोलामुळे तो कोसळणार नाही. तरीही, उतरण्याचा वेग नियंत्रित असणे आवश्यक आहे आणि लँडिंगसाठी जमीन जितकी सपाट असेल तितके लँडर आणि रोव्हरच्या सुरक्षिततेसाठी चांगले.

**चांद्रयान-३ ही माहिती गोळा करेल**

चंद्रावर सॉफ्ट लँडिंग केल्यानंतर, चांद्रयान-3 त्याच्या पृष्ठभागावरील खनिजांसह अनेक माहिती गोळा करेल. चांद्रयान-३ सोबत पाठवलेल्या लँडर आणि रोव्हरमध्ये मागील वेळेप्रमाणे सहा पेलोड स्थापित केले गेले आहेत, सर्वसाधारणपणे, पेलोड डेटा ट्रान्समिशन युनिटसारखे कार्य करते. चांद्रयान-३ च्या लँडरमध्ये चार पेलोड आहेत जे चंद्रावरील भूकंप, पृष्ठभागाचे थर्मल गुणधर्म, प्लाझ्मा आणि पृथ्वीपासून चंद्राचे अचूक अंतर शोधतील. त्याचप्रमाणे, रोव्हरमध्ये दोन पेलोड आहेत, जे चंद्राच्या पृष्ठभागावर पोहोचतील आणि मातीतील रासायनिक आणि खनिज रचना शोधतील आणि चंद्राच्या मातीत आणि खडकांमध्ये कोणती खनिजे आहेत याची माहिती गोळा करतील. त्याचा तिसरा भाग प्रोपल्शन मॉड्यूल आहे, जो पुढील सहा महिने चंद्राच्या कक्षेत राहील आणि एका लहान ग्रहाप्रमाणे फिरत राहील.

**मिशनची उद्दिष्टे**

भारताने हे मिशन यशस्वीपणे पूर्ण केले तर ते खूप मोठे यश असेल. या मिशनच्या यशानंतर सिग्नलवर वेळेवर पोहोचणे निश्चित होईल, असे वैज्ञानिकांचे म्हणणे आहे. विज्ञानाच्या दृष्टिकोनातून ते खूप फायदेशीर आहे. जसे की चंद्राची उत्पत्ती कोठून झाली हे आपण जाणून घेऊ शकतो. त्याच्या पृष्ठभागाचा नीट अभ्यास करा. रॉकेट तंत्रज्ञानाच्या चाचणीसाठीही ही एक उत्कृष्ट चाचणी असेल. चंद्राच्या पृष्ठभागावर लँडरचे सुरक्षित आणि सॉफ्ट लँडिंग सुनिश्चित करणे, रोव्हरच्या कुशलतेचे निरीक्षण आणि प्रात्यक्षिक करणे हे त्याचे उद्दिष्ट आहेत. चंद्राची रचना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, चंद्राच्या पृष्ठभागावर उपलब्ध रासायनिक आणि नैसर्गिक घटक, माती, पाणी इत्यादींवर वैज्ञानिक प्रयोग करता येतात. सूक्ष्म भूकंपीय लहरींची माहिती मिळवणे हाही या मोहिमेचा उद्देश आहे. हे चंद्राच्या आतील पृष्ठभाग आणि त्याच्या गाभ्याबद्दल महत्त्वपूर्ण माहिती प्रदान करू शकते. सूर्याची प्रखर उष्णता चंद्रावर किती लवकर आणि किती खोलीपर्यंत पोहोचते हे तपासता येते. चंद्रावर भविष्यातील वैज्ञानिक वसाहतींचे स्वरूप यावर बरेच अवलंबून असेल.

चांद्रयान-3 मोहिमेत 3921 किलो वजनाचा उपग्रह सुमारे 400,000 किमी अंतर पार करेल. रॉकेटचे वजन 642 टन आहे, जे अंदाजे 130 आशियाई हत्तींच्या वजनाच्या बरोबरीचे आहे. त्याची उंची 43.5 मीटर आहे, जी कुतुबमिनार (72 मीटर) च्या निम्म्यापेक्षा जास्त आहे.

**मिशन फायदे**

चंद्र, पृथ्वी आणि विश्वाच्या चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी हे मिशन आवश्यक आहे. ही चाचणी यशस्वी झाल्यास भारताला आपली क्षमता जगाला दाखवण्यासाठी व्यासपीठ मिळेल. रॉकेट प्रक्षेपण, अवकाश तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ या दिशेने उत्कृष्ट काम करता येईल. याचा फायदा भारताच्या अंतराळ तंत्रज्ञान उद्योगालाही होणार आहे. दोन वर्षांपूर्वी 2020 मध्ये, भारताची अंतराळ अर्थव्यवस्था $ 9.6 अब्ज होती, जी 2025 मध्ये $ 13 अब्ज होईल असा अंदाज आहे.

**इंडियन नॅशनल स्पेस प्रमोशन अँड** ऑथोरायझेशन सेंटरची स्थापना झाल्यानंतर अवकाश क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढला आहे. देशात सध्या सुमारे 140 नोंदणीकृत स्पेस-टेक स्टार्टअप्स आहेत. यामध्ये स्कायरूट, ध्रुव स्पेस, सॅटसुर आणि बेलाट्रिक्स यांचा समावेश आहे. भारतातील पहिले खाजगी क्षेत्रातील रॉकेट विकसित करण्याचे श्रेय स्कायरूटला जाते. उर्वरित कंपन्या उपग्रह आधारित फोन, ब्रॉडबँड, 5G आणि सोलर फार्म सारख्या क्षेत्रात काम करत आहेत. इंडियन स्पेस असोसिएशनचे महासंचालक लेफ्टनंट जनरल (निवृत्त) ए.के. भट्ट म्हणाले, "चांद्रयान-3 हे विशेषतः अंतराळ संशोधन मोहीम आहे. हे चंद्रावर सॉफ्ट लँडिंग आणि रोव्हर क्रियाकलाप करण्याची आपली क्षमता प्रदर्शित करेल. पण मोठ्या चित्रात, चंद्रावर माणूस उतरवण्याच्या दिशेने हे पहिले पाऊल आहे. अंतराळात लावलेल्या वैज्ञानिक शोधांचा मानवी विकासावरही अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे. भविष्यात, ते अवकाशातून पृथ्वीसाठी संसाधने प्रदान करू शकते.

स्कायरूट एरोस्पेस प्रा. लि. डॉ. सीव्हीएस किरण, संशोधन आणि विकास आणि रणनीती प्रमुख, आयएमडी यांच्या मते, "या मिशनशी अनेक धोरणात्मक हितसंबंध जोडलेले आहेत. भारताच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास ते राष्ट्रीय अभिमानासह तंत्रज्ञान क्षेत्रातील आपली प्रगती सांगेल. हे वैज्ञानिक शोध, आर्थिक संधी आणि भविष्यातील आंतरराष्ट्रीय सहकार्य सुलभ करेल. या सगळ्यात भारताला पुढे जाण्याची आणि जागतिक अवकाश समुदायात स्थान मिळवण्याची संधी मिळेल.

चांद्रयान-3 च्या यशामुळे अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात खाजगी गुंतवणूक वाढण्याची अपेक्षा आहे. याचा फायदा संपूर्ण अंतराळ उद्योगाला होणार आहे. येत्या काही दिवसांत, उद्योगाला स्पेस-ग्रेड हार्डवेअर आणि तंत्रज्ञान पुरवण्यासाठी इतर देशांकडून ऑर्डर मिळू शकतात. यामुळे कंपन्यांचा व्यवसाय तर वाढेलच, शिवाय लोकांना या उद्योगात रोजगारही मिळेल.

# अन् पैसेवाल्यांचे धाबे दणाणले...!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**दोन, तीन आठवडे झाले प्रत्येकांच्या मुखातून फक्त, आणि फक्त टमाटरचे भाव वाढले याच विषयावर अनेकदा ऐकायला मिळत आहे. म्हणजेच यात काही वेगळे आहेच विचार करण्याची गोष्ट अशी की, वर्षातून एकदा बळीराजाच्या मालात भाव का वाढ झाली अन् सर्वाची डोकेदुखी सुरू झाली पण, यात सर्वात जास्त धाबे दणाणले. डोके दुखायला लागले असतील तर ते, फक्त आणि फक्त म्हणजेच पैसे वाल्यांचेच कारण, बळीराजा कोण आहे किंवा तो कसा जगतो ह्या विषयी जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा कधीही वेळ नसतो. एकदा का त्याच्या मालात भाव वाढ झाली की, मग लगेच महागाई वाढली म्हणून जगभर डिंडोरा पिटायला मागे पुढे बघत नाही हे, वास्तव सत्य आज बघायला मिळत आहे.**

या टमाटरच्या भाव वाढी विषयी बळीराजा, गोर, गरीब मात्र काहीच बोलत नाही कारण, दुष्काळ, अडी अडचणी, आपत्ती, वाईट परिस्थिती कशी असते त्या सर्वांचा त्यांना चांगल्याप्रकारे अभ्यास असतो त्याच परिस्थितीतून ते संघर्ष करून दैनदिन जीवन जगत असतात म्हणून ते, पैशावाल्यासारखे डिंडोरा पिटत फिरत नाही तर..आपले काम करत असतात अहो त्यांच्याकडे फालतू गोष्टीविषयी बोलण्यासाठी वेळ तरी कुठे असतो उठले, सुटले शेतावर जातात नाही तर पोटभरण्यासाठी कामाच्या शोधात वणवण फिरत असतात मग टमाटरच्या भाव वाढिविषयी बोलणार तरी कधी. . . ? अडी, अडचणींशी त्यांची मैत्री झालेली असते त्यामुळे आपल्या मित्रांविषयी ते वाईट बोलत बसतील तर जगतील कधी... ? म्हणून ते बोलत नाही तर.. जगून दाखवतात. टमाटरचे भाव वाढले पाहून पैशावालेच बोलत आहेत "अरे, बापरे टमाटर किती महाग झाले घेणेच होत नाही" मग आपल्या आवडीनुसार हॉटेलमधून पिझ्झा मागून घेण्यासाठी एका क्षणात पाचशे रूपये द्यायला खर्च होत नाही का. . . ? आवडीनुसार महाग कपडे, दागिने खरेदी करण्यासाठी पैसे खर्च होत नाही का... ? पांढरे शुभ्र कपडे घालून दारूच्या दुकानात जाऊन मित्रांसोबत बसून मस्त पैकी पार्टी केली जाते तेव्हा पैसे खर्च होत नाही का. . . ? काही निसर्ग रम्य स्थळाला भेट देण्यासाठी जातांना पैसे खर्च होत नाही का. . . ? बफेची चाल सुरू करून अन्न वाया जाते तेव्हा पैसे खर्च होत नाही का. . . ? अनेक रंगांचे सामान घेतांना पैसे खर्च होत नाही का. . . ? की, कोणी फुकटात देते की, कमी पैशात सामान देतात. . . ? लाखो, करोड रूपयाचे बंगले, घर दिसतात त्यांना खर्च करावे लागत नाही का. . . ? शानदार गाड्या घरी असतात त्यांना पैसे खर्च होत नाही का. ... ? लाख रूपये पगार असतांना वरतून लाच मागण्यात तरबेज असतात एवढे पैसे कमी होतात का. . . ? आज बळीराजाचे टमाटर का महाग झाले ना झाले .भिकारी असल्यासारखे टमाटरच्या विषयी जगभर डिंडोरी पिटत फिरतांना दिसतात मग खरे भिकारी कोण आहेत. ... ? आज प्रत्यक्ष दिसून येत आहेत. आज एवढे दिवस झाले बळीराजावर एवढे संकट येतात बघून सुध्दा कोणताही पैसेवाला त्याची मदत करण्यासाठी पुढाकार घेतांना दिसला नाही, तो,मरो अथवा वाचो त्याच्याशी काहीही देणे, घेणे नसते फक्त १ जुलै शेतकरी दिन आला की, शुभेच्छा देण्यासाठी व मोबाईल च्या स्टेटसवर शुभेच्छा पोस्ट मात्र वेळात वेळ काढून लावत मोठेपणा मिरवत असतात व दुसऱ्या दिवशी त्याला विसरून जातात प्रत्येक्षात बघायला मिळत आहे. म्हणूनच एवढा पावसाळा असून सुध्दा पाऊस पडला नाही व तो संकटात असतांना त्याची आपुलकीने मदत करणाऱ्याची एकही बातमी कुठे वाचायला मिळाला नाही हीच आपुलकी आहे का. ...बळीराजाविषयी. . . ? तो, जगाचा पोशिंदा आहे भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो मात्र त्याचा आज बळी घेतला जात आहे. त्याच्या मालात भाव वाढ झाली की, मग न बोलणाराही बोलायला लागतो व झोपलेले असतील तेही उठून बसतात, बहिऱ्यांना ऐकू यायला लागते म्हणून आज टमाटरचे भाव वाढले पाहून पैसे वाल्यांचे धाबे दणाणले आहेत गरीबांचे नाही कारण गोरगरीब, बळीराजाच्या घरी आब्यांच्या खुला वर्षभर असतात वांग्यांच्या खुला शिजतात, आंबिल



बनवली जाते, घुगऱ्या शिजतात, चिंचेचा उपयोग केला जातो, आळण बणविले जाते, पनीर किंवा पिझ्झा मागविल्या जात नाही किंवा पाण्यावानी पैसे उधळले जात नाही कारण शासनाची पाहिजे तेवढी त्यांच्याकडे लक्ष जात नाही म्हणून ते,आपल्या परीने चटणी, भाकर खाऊन जगत असतात. या पुढेही टमाटरचेच तर काय बळीराजाच्या प्रत्येक मालात भाव वाढ झाली पाहिजे. त्याला दोन पैसे मेहनतीचे मिळाले पाहिजे कारण बळीराजा, गोरगरीब, सर्वसामान्य माणूस कोणाकडूनही लाच घेत नाही, किंवा लाख रूपये पगार त्यांना कोणी देत नाही, पेंन्शन तर...जाऊच द्या त्याच्यासाठी कोणी आंदोलन करत नाही, तो बिजनेसमैन नाही. लाख, करोड रुपयाचे त्याच्यापाशी घर नाही. काहीही त्याच्याकडे नसेल तरी तो भिकारी नाही फरक एवढाच की, निसर्ग त्याच्यावर कोपत असते व शासनाची पाहिजे तेवढी मदत न मिळाल्याने व इतर कोणीही साथ न दिल्यामुळे त्याचा विकास होत नाही. पण,यापुढे बळीराजाच्या मालात जास्त प्रमाणात भाव वाढ झाली पाहिजे. मगच बळीराजा कसा जगतो ह्या पैसेवाल्यांना जास्त नाही तर...थोडं तरी कळायला लागेल.

# शिवकाळाची आठवण पुसली जातेय, त्याचे काय ?




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. मोडी लिपी हात न उचलता लिहिली जाते, त्यामुळे वेगाने लिहिणे सोपे जाते. यात अनेक शब्दांची लघुरुपे वापरून कमीतकमी ओळीत सारांश लिहिला जातो. यातली अक्षरांची वळणे गोलाकार असतात, त्यांमध्ये देवनागरीच्या विपरीत काना खालून वर जातो.**

यामुळे पुढचे अक्षर चटकन लिहिता येते. तसेच प्रत्येक अक्षराची सुरुवात आणि शेवट डोक्यावरच्या रेषेवर होते. मोडी लिपीत चिटणीसी, महादजीपंती, बिवलकरी, रानडी अशी वळणे प्रसिद्ध आहेत. पुढे घोसदार वळण येऊन त्याचा भारतातल्या इतर भागातही प्रसार झाला असे मानले जाते. असंख्य मराठी ऐतिहासिक कागदपत्रे मोडी लिपीत असून इतिहास संशोधनाकरिता मोडी जाणकारांची कमतरता भासते. मोडी लिपी ही मराठी भाषा लिहिण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे, जी महाराष्ट्र राज्यात बोलली जाणारी प्राथमिक भाषा आहे. तिच्या उत्पत्ती संदर्भात अनेक सिद्धांत आहेत. २१व्या शतकातील मराठी लोकांचे असे विचार व मत आले आहे, की जर मराठी भाषेचे मूळ असलेली मोडी लिपी जर पुन्हा वापरात आणली गेली तर मराठी भाषेचा प्रभाव वाढेल. पण या विषयावर आजपर्यंत महाराष्ट्र शासनाने कोणतेही पाऊल उचलले नाही. भविष्यकाळात या विषयावर ठोस पाऊले उचलले जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

मोडी लिपीत एक पत्र सवाई माधवराव पेशवे यांनी सेनापती महादजी शिंदे यांस दि. ३०-१२-१७८४ रोजी लिहिले होते. मोडी लिपीच्या उगमाबद्दल अनेक मते व मतभेद आहेत. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे व डॉ. भांडारकरांच्या मते हेमाडपंताने ही लिपी श्रीलंकेतून आणली. परंतु चांदोरकरांच्या मते ती अशोककालातील मौर्यी- ब्राह्मीचाच एक प्रगत प्रकार आहे. वाकणकर व वालावलकरांच्या मते मोडी लिपी ही ब्राह्मी लिपीचाच एक प्रकार असून हात न उचलता लिहिण्याच्या तिच्या वैशिष्ट्यामुळे इतर लिपींपेक्षा वेगळी झाली आहे. ती श्रीलंकेतून आणली गेली असावी अथवा मौर्यी लिपीवरून विकसित झाली असावी, हे म्हणणे त्यांना मान्य नाही. ही लिपी महाराष्ट्रात कमीत कमी ९०० वर्षे वापरात आहे. सर्वांत जुना उपलब्ध मोडी लेख इ.स.११८९ मधील आहे. ते पत्र पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहात आहे. ती अल्पप्रमाणात का होईना सन १९५०पर्यंत लिखाणात प्रचलित होती. शेवटच्या २-३ शतकात या लिपीत अनेक फेरबदल झालेले आहेत. साधारण इ.स.१७००च्या सुमारास चिटणिसी आणि वळणे ही पूर्णपणे प्रगत झाली. यानंतर त्यात फारसे बदल दिसून येत नाहीत. ऐतिहासिक कागदपत्रांतील ही लिपी क्लिष्ट आणि वाचण्यास कठीण असते. ती पेशवाईकाळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती, असे मानले जाते. पेशवे यांच्या दप्तरातील कागदपत्रे, दस्ताऐवज पाहिले असता त्या उत्कर्षाची कल्पना येते. सुबक अक्षर, दोन ओळीतील समान अंतर, काटेकोर शुद्धलेखन हे या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ ते उत्तर पेशवाई या काळांतील मोडीवाचनातून मराठी भाषेतील स्थित्यंतरे लक्षात येतात व मराठी भाषेचा प्रवास अभ्यासता येतो. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताप्रमाणे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या काळात मोडी संकल्पना महाराष्ट्रात येत होती. याच काळात पहिले मुस्लिम आक्रमण भारतात होत होते. लिखाणाकरिता कागदाचा वापर हा मुस्लिमांनी भारतात सुरू केला असावा, कारण कागज हा फार्सी शब्द असून या अर्थाचा संस्कृत शब्द अस्तित्वात नाही. इतिहासाचार्य राजवाडे ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा हवाला देतात. देवनागरी अक्षरे आडव्या, उभ्या आणि टोकदार रेषांचा अवलंब करतात, त्यामुळे लिखाणाच्या



हस्तलिखित प्रति बनवताना वेग कमी होतो. तर शिकस्तप्रमाणे गोलाकार व एकमेकांना जोडली जाणारी वळणे वापरून मोडी हस्तलिखिताचा वेळ वाचवत होती. विराम चिन्हांचा वापर इंग्रजी भाषाशी ओळख झाल्यानंतरच भारतीय लिपींत सुरू झाला.

भारतीय टपाल सेवेच्या माय स्टँप योजने अंतर्गत मोडी लिपी राखण्यास एक प्रयत्न केला आहे. चित्रात मराठी हे मोडी लिपीमध्ये छापले गेले आहे. ती १३व्या शतकापासून २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषेच्या लेखनाची प्रमुख लिपी होती. महादेव यादव व रामदेव यादव यांच्या राज्यकालात- १२६०-१३०९मध्ये हेमाडपंत- खरे नांव हेमाद्रि पंडित या प्रधानाने मोडी लिपीचा विकास केला. छपाईस अवघड असल्यामुळे मोडी लिपीचा वापर मागे पडला आणि बाळबोध- देवनागरी लिपीचा वापर सार्वत्रिक सुरू झाला. हा वापर सक्तीने करण्याची सुरुवात ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी केली. त्यानंतर मात्र दि.१७ जुलै १८०२ रोजी मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले. म्हणूनच आजचा १७ जुलै हा दिवस मोडी लिपीचा प्रथम मुद्रण दिन दरवर्षी साजरा होतो. इ.स.१८०२मध्ये विल्यम कॅरे या मिशनऱ्याने पंडित वैजनाथ यांच्या मदतीने पहिला मोडी लिथोग्राफ श्रीरामपूर बंगाल येथे बनवला. रघु भोसल्यांची वंशावळी, मराठी भाषा व्याकरण, मराठी कोष, नवा करार सन- १८०७. या ग्रंथांची मोडी लिपीत छपाई केली गेली. ए.के. प्रियोळकर यांनी मोडी छपाईचा इतिहास लिहिला. मोडी लिपीचे चार कालखंडांत वर्गीकरण केले आहे- यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन आणि आंग्लकालीन. यादवकालीन मोडी लिपी लिखाणात अक्षरे एकमेकांच्या अगदीच जवळ व उभी काढली गेली. तीच शिवकालीन शैलीत किंचित उजवीकडे झुकलेली दिसतात. या लिपीला तिरकस वळण, अधिक वर्तुळाकार आणि सुटसुटीत अक्षरे लिहिण्याचा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी सुरू केला होता. तोपर्यंत लिपी ही टाकाने लिहिली जात असे. असाच प्रयत्न पुढे चालू ठेवून पेशवेकालीन शैलीत ती अगदीच रेखीव, गोलाकार, तिरकस आणि सुटसुटीत लिहिली जाऊ लागली. पेशवेकाळातील लिखाण बोरूने होत असे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज राजवटीत फाऊंटन पेनचा वापर सुरू झाला. बोरूने जी प्रत्येक अक्षराला जाडी-रुंदी आणि टोक येत असे, ते या फाऊंटन पेनच्या वापरात शक्य नसल्याने मोडी लिपी अगदीच गुंतागुंतीची व किचकट दिसू लागली. फाऊंटन पेनचा एकच फायदा होता, तो म्हणजे त्यात शाई बराच वेळ टिकून राही. म्हणून सध्याचे मोडी लेखक फाऊंटन पेनच्या कॅलिग्राफीच्या निब्सचा वापर करतात आणि लिखाणात काही प्रमाणात पेशवेकालीन मोडी लिपीचे सौंदर्य आणण्याचा प्रयत्न करतात.

अलीकडे कर्नाटकात ९व्या शतकातील काही आढळलेले शिलालेख हे मोडी लिपीत असून लिपी शिकस्तामधून निर्माण झाली, या मताचे खंडण करतात. १०व्या शतकात नस्तलीकमधून शिकस्ते लिपी जन्मास आली. शिकस्ता म्हणजे मोडकी नस्तलीक होय. यावरून स्पष्ट होते की मोडी लिपीची संकल्पना ही शिकस्तामधून आली नव्हती. कारण महादेवराव, रामदेवराव किंवा हरपालदेवराव यादवांच्या कारकिर्दीत मराठी लोकांचा श्रीलंकेशी संपर्क आला नव्हता. मात्र मोडी लिपीचे नागरी, गुर्जरी म्हणजे महाजनी आणि बंगाली लिप्यांशी साधर्म्य आहे, हे कोणीही ठामपणे सांगू शकेल.

# संयम नसेल तर प्रचंड विद्वत्ता देखिल निरुपयोगी ठरते

आधुनिक केसरी

**ज्ञान गुण गुणवत्ता विद्वत्ता हे तेव्हा उपयोगी ठरत जेव्हा आपल्याकडं पराकोटीचा संयम असतो.संयमा शिवाय सगळं व्यर्थ आहे.जीवनातील वेगवेगळ्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी संयम असणं अंत्यंत आवश्यक असतं .संयमित जीवन तर स्थिर समाधानी आयुष्य आणि असंयमित जीवन अस्थिर, असमाधानी जीवन म्हणून संयमाची जीवनातील भूमिका निर्णायक असते.**

विद्वत्ता, बुद्धिमत्ता, गुणवत्ता प्रचंड मोठ्या प्रमाणात असुन देखील संयम नसेल तर हिच बुद्धिमत्ता निरूपयोगी ठरते.संयम हे जीवनातील उत्कृष्ट बळ आहे. तसेच यशस्वी जीवनाचा पाया असुन मुख्यत्वे जीवनातील प्रगतीचे पहिलं लक्षण संयम आहे. मन, बुद्धी, विचार या मध्ये संयम निर्माण झाला तर जीवनात वेगवेगळ्या क्षेत्रातील यशाच्या मार्गावर मार्गक्रमण करत असताना यशोशिखरावर पोहचण्या पासुन आपल्याला कोणतीही भव्य दिव्य शक्ती रोखु शकत नाही. म्हणून संयम हे जीवनातील ब्रह्मअस्त्र तर आहेच पण उत्कृष्ट असं बळ देखिल आहे. ज्यामुळे आपण अशक्यालापण शक्य करू शकतो. त्याचा वापर आपण ज्या पद्धतीने करणार त्या पद्धतीने परीणाम आपल्याला पाहायला मिळणार म्हणून संयम गुणवत्ता आणि विद्वत्ता यांचा संगम असेल अथवा हे गुण एकत्र असतील तरच यशोशिखरावर पोहचण्यासाठी असणारा दिव्य असा मार्ग निश्चितच आपल्यासाठी खुला होईल या मध्ये शंका नाही.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

साधारणतः पृथ्वीवर जन्मला आलेला प्रत्येक व्यक्ती हा जवळपास सारखाच गुणवान, विद्वान असतो .परंतु आपल्या गुणवत्ता आणि विद्वत्ता आपण कोणत्या कार्यासाठी वापरतो त्यावर आपलं व्यक्तिमत्त्व ठरत आणि त्यावरच त्याच महत्व अवलंबून असतं. गुणवत्ता आणि विद्वत्ता याला जर संयमाची जोड आपण देऊ शकलो तर आपलं जीवन यशस्वी आणि उन्नत, प्रगत, होणार त्याच बरोबर आपला नावलौकिक होईल या मध्ये काही संदेह नाही . तसं पाहिलं तर बुद्धी हि निसर्गतः सगळ्यांना सारखीच प्राप्त होत असते . शारीरीक पातळीवर थोडाफार अंशतः बदल शरिर रचनेत, चेहरा, उंची या मध्ये आपसुकच असतो.निसर्गाने देताना प्रत्येकाला सम प्रमाणात सर्व शारिरीक बाबी वाटप केल्या आहेत .या मध्ये कुठेही फार भेदभाव केला नाही. अपवादाने काही व्यक्तिंना एखाद्या अवयव कमी जास्त प्रमाणात असतोच . कुणाला ऐकायला येत नाही .कुणाला दिसत नाही. तसेच कुणाला बोलता येत नाही.तसेच एखाद्याला एखाद्या अवयव नसेलही मात्र प्रत्येकाला मेंदू आणि बुद्धी हि सर्वांना सम प्रमाणात निश्चितच दिलेली आहे.मेंदू मधील रचना घटक जवळपास सारखेच आहेत परंतु त्या मेंदू चा वापर आपण ज्या पद्धतीने करतो . त्यानुसार आपली विद्वत्ता ठरतो .आणि विद्वत्ता गुणवत्ता आणि संयम एकत्र असेल तर यशाचा त्रिवेणी संगम साधणारच या मध्ये शंका नाही. महणुन प्रत्येक व्यक्ती मध्ये प्रचंड अशी विद्वत्ता आणि गुणवत्ता असते च परंतु सगळ्यात महत्त्वाची बाब हि संयम आहे आणि हा संयम प्रत्येकाकडे सारखा असेलच असे नाही.गुणवत्ता आणि विद्वत्ता प्रचंड असूनही संयमा शिवाय यशाच्या शिखरापर्यंत पोहोचता येत नाही.जगातिक पातळीवर सामाजिक स्थिती अवलोकन केले तर आपसुकच लक्षात येईल कि विद्वत्ता, आणि गुणवत्ता प्रचंड असली तरही संयम नसेल तर अपयशाचा सामना हा निश्चितच करावा लागतो. वास्तविक गुणवत्ता विद्वत्ता आणि सयंम हा त्रिवेणी संगम ज्याच्याकडे आहे. तो सदैव यशोशिखरावर असतो. यशा पर्यंत पोहचण्यासाठी फक्त गुणवत्ता आणि विद्वत्ता असुन चालत नाही .तर उच्च पराकोटीचा संयम खुप आवश्यक आहे.जीवनातील कोणत्याही क्षेत्रात नावलौकिक निर्माण करण्यासाठी अथवा यशस्वी होण्यासाठी आपला संयमच आपल्या कामी येतो .




काला , क्रीडा, संस्कृती, शिक्षण, उद्योग, व्यवसाय, नोकरी, रोजगार स्वयंरोजगार, यापैकी कुठल्याही क्षेत्रात आपल्याला यशोशिखरावर गाठायचे असेल किंवा आपलं नावलौकिक करण्याचा आपला मानस असेल तर गुणवत्ता, विद्वत्ता, आणि संयम हा त्रिवेणी संगम हा अंत्यंत आवश्यक आहे . ज्याने संयमवार विजय मिळवला त्याच्या साठी जगातील कुठलच विजय अशक्य प्राय नाही. गुणवत्ता, विद्वत्ता आणि संयम हा यशाच्या शिखरापर्यंत पोहोचण्यासाठी राजमार्ग आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.महणुन जीवनात अलौकिक असं यश संपादन करयाचे असेल तर आपण आपल्या जीवनात संयमाची पराकाष्ठा केली तर कोणतंच यश आपल्या पासून दूर नसतं.

# शैक्षणिक आधारवड 'कर्मवीर अण्णा'

आधुनिक केसरी

**वर्षोनुवर्षे इंग्रजांच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या हिंदुस्थानातील रयतेला आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, बौद्धिक, मानसिक समाधानासाठी व उन्नती साठी धीर देणारा एकमेव हिरा त्याकाळी दिनांक २२ सप्टेंबर १८८७ रोजी या महाराष्ट्रात जन्मला.माता गंगामाईच्या पोटी एका महान समाजसुधारकाने जन्म घेतला.**

बराचसा बहुजन समाज इंग्रजांच्या गुलामगिरीत तर काही गावपातळीवरील पाटील, सावकार आणि वतनदार यांसारख्या धनदांडग्याच्या शेतावर किंवा घरी, नोकर म्हणून वेठबिगारीस होता.हाताला काम मिळत नव्हते म्हणून मिळेल त्या दामावर सालगडीसमान कायमचा खुंटीला बांधलेला. बहुजन समाजाला शिक्षणाचा जरासाही गंध नव्हता. अशावेळी द्रारिद्र्य कुटुंबाच्या पाचवीला पुंजलेले. घरात भरमसाठ खाणारी तोंड. या धामधुमीच्या त्याकाळात भाऊरावांनी जे शिक्षणाचे रोपटे लावले व ते एखाद्या वटवृक्षाप्रमाणे वाढवले हे महानच. जेव्हा माणसं आणि पर्वत भेटतात तेव्हा अशी महान कार्य होतात हे आपणही म्हणतो. भाऊरावांच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात कुंभोज, दहिवडी, विटे याठिकाणी झाली. ही ठिकाणे कोल्हापूर जिल्ह्यातील आहेत. वसतिगृहात असताना आंघोळीच्या नियमभांगापोटी त्यांची वसतिगृह अधिक्षकांनी हकालपट्टी केली. त्यानंतर ते राजर्षी शाहू महाराज यांचेकडे गेले आणि त्यांच्या सहवासातून शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव घेऊन ते बाहेर पडले.आपल्या बहुजन समाजातील तळागाळातील माणसांची कामे करताना इस्लामपूर येथील अस्पृश्य समजून वर्गाबाहेर बसवलेल्या एका विद्यार्थ्यांला भाऊंनी आपल्या घरी नेले व स्वतः बरोबर जेवू घातले.कोल्हापूरच्या 'मिस क्लार्क' होस्टेलमध्ये त्याला प्रवेशही मिळवून दिला. पुढे तोच विद्यार्थी मोठा होऊन विधानसभेचा पहिला अस्पृश्य सदस्य प्रतिनिधी बनला. साताऱ्यात असताना भाऊरावांनी खाजगी शिकवण्या सुरू केल्या. तेथेच भाऊराव "पाटील मास्तर" म्हणून सर्वत्र प्रसिद्ध झाले. त्यांनी याचकाळात मदवान मास्तर,भाऊसाहेब कुदळे,नानासाहेब येडेकर आदी मंडळीबरोबर १९०९ मध्ये दुधगावात "दुधगाव विद्यार्थी आश्रम "सुरू केले. याच संस्थामार्फत सर्व समाजातील मुलांसाठी अनेक वसतिगृह सुरू केले. रयतेच्या कल्याणासाठी झटणाऱ्या या महानुभावाने रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९२४ साली व्यवसायातून पूर्ण वेळ बाहेर पडून ते बहुजनांच्या पाल्याच्या शिक्षणासाठी समर्पित झाले. १९१९ मध्ये कराड तालुक्यातील काले येथे सत्यशोधक समाजाच्या परिषदेत भाऊरावांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एक शैक्षणिक संस्था सुरू करण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून घेतल्यानंतर या संस्थेचे मुख्यालय सातारा येथे नेण्यात आले. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी फक्त पाठयपुस्तकांचाच नाही तर इतर पूरक पुस्तकांचाही वापर केला. त्यातून मुलांच्या मनात समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांना दिली. त्यांच्या शिक्षणाची स्वावलंबन, स्वाभिमान, स्वातंत्र्य व स्वाध्याय ही चतुःसूत्री होती. या प्रवाहात असताना त्यांची व महात्मा गांधींची भेट झाली. या भेटीनंतर त्यांनी जीवनात खादीचा अंगीकार केला. वाळवा तालुक्यातील वसतिगृहात सर्व जातीधर्माचे विद्यार्थी शिक्षण घेत होते. भाऊराव पाटलांनी "मुष्ठीफंड" ही अभिनव योजना सुरू केली. या योजनेत प्रत्येक घरातून एक मूठ धान्य मिळत असे. त्याचा वसतिगृह चालविण्यासाठी हातभार लागत असे. एकदा तर वसतिगृहात अन्नाची कमतरता भासू लागल्याने भाऊरावांच्या अर्धांगिणीने आपले मंगळसूत्र व दागिनेही विकले.



या सामाजिक कार्यात पत्नी लक्ष्मीबाई यांची त्यांना मोलाची साथ मिळाली. "शाळेविना खेडे व प्रशिक्षित शिक्षकाविना शाळा नको " म्हणून नवीन शिक्षकांसाठी त्यांनी अध्यापक विद्यालये सुरू केले.१९४२ साली "मिश्र वसतिगृह "आणि खास महिलांसाठी ' जिजामाता महिला अध्यापक विद्यालय" सुरू केले. अशा राज्यभरात विविध प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा आणि वसतिगृहे भाऊरावांमुळे सुरू झाली. गरीबाच्या लेकरांसाठी "कमवा व शिका" ही योजना कार्यान्वित केली. हाताला मिळणाऱ्या कामाच्या दामातून लोक आपल्या पाल्यांना शिकवू लागले परंतु जेव्हा ते कमी पडत तेव्हा भाऊरावांनी सर्वप्रथम त्यांना मदतीचा हात दिला.रयत शिक्षण संस्थेच्या या वटवृक्षाच्या छायेत शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी प्रशासकीय सेवेत दाखल झाली तेव्हा भाऊरावांनी पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास गेली असे म्हणावे लागेल. 'श्रम हीच प्रतिष्ठा मानून "स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" हे कर्मवीरांचे घोषवाक्य घेऊन रयत शिक्षण संस्था आजही प्रगतीकडे जात आहे. सर्व समाजातर्फे महानायकास आमचा लाख लाख सलाम.

अशोक विटनोर, मोबा. 9049913053

# थेंब तो....



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**आत्ता मन कधीतरी कुठेतरी सणासुदीला हळवं होत, काळाच्या त्या सावलीत हरवलेल्या स्मृतीत ओला वलेल्या पापण्यात हरवून जातं. मृग नक्षत्राच्या पहिल्या पावसा पासून झालेली सुरुवात त्याच पावसात झालेली पेरणी, बी बिवड, आषाढी एकादशी, बेंदूर होता होता, दिपं अमावस्या येवून ठेपलेली असायची. महिना कसा सुरु व्हायचा, आणि शाळू दिवसा सारखा कधी आषाढ संपायला यायचा ते तेव्हा कधी कळलच नाही. ओढ्या नद्यातून वाहणारे ते गढूळ पाणी, पावसाचा ओसरलेला जोर, गुडघाभर पाण्यात गुडघ्यापर्यंत कपडे खोचून ओढया नद्या ना जाणाऱ्या बायका,पोरी,आणि खळखळून वाजनाऱ्या त्या पाण्याचा आवाज, आजही कानात घुमत राहतो.**

नवीन लग्न झालेल्या नव्या सूनां लेकी माहेरी जाण्यासाठी चाललेली त्यांची तयारी डोळ्यासमोर येते. घरातल्या जात्याची घरघर गडबड,काळाच्या ओघात पडद्याआड होतात. कुणाच्या घरची लेक कुणाची आक्का, ताई, काही दिवसात येणार म्हणून खुशीने बागडणारी अंगणे नातेवाईक, आणि महिनाभरानंतर थोडासा विसावलेला पाऊस आणि त्याच सरसर पडणाऱ्या धारा आणि त्याच्यात कधीतरी डोकावणारे ते ऊन सार कस आल्हाददायक वाटायचं जणू. सणा सुदीचे आनंदाचे दिवस मन भारावून टाकयचे भारावलेल्या वातावरणात सार कस पारंपरिक, साजर संगीत लेकी, नातीच, तोंडभरून कौतुक, उपवास, खेळ नागपंचमीला कुठेतरी शेतात जाताना रुतलेला एखादा काटा कधीतरी पायात रुततो. आणि सस्स...कधी काळी बांधावरून घसरलेला तो पाय आता कधीतरी मनातल्या मनात घसरतो. आणि उगाचंच तेव्हाच गालातल्या गालावर हास्य पसरवून चेहऱ्याला एक नवा तजेला देतो. आघडा म्हणून घेतलेलं दुसरच गवत कधीतरी डोळ्यापुढे येते. आणि तेव्हाच्या ओळखीची खूण पटवून उगाचंच नव्या जुन्याचा मेळ घालायला भाग पाडते. गावात एकाचं ठिकाणी असलेल्या शेतातल्या त्या वारुळा भोवतीची ती गर्दी, नवनवीन साड्या घातलेल्या नव्या नवऱ्या, पोऊर्ति, लाह्या दूध आगडा हरळी चौफेर पसरलेली हिरवाई हे शब्द उच्चारताच त्याभोवती गुंतून राहणारे मन शरीर आजही आनंदात हरवून जातं.

संस्कृती जपण्याचा तो प्रयत्न किती कसोशीने व्हायचा व्रत वैकल्ये यांच्यातून दिसायचा. सण उत्सव व्रत वैकल्ये आताही जपली जातात, साजरी होतात.नाही असे नाही. पण त्याच्यात कुठेतरी काहीतरी उणीव जाणवते. मान्य आहे आजकाल माणसाला वेळ नाही. पण एक मागच्या पिढीचा वारसा इतिहास रूपाने जपला जावा.माहिती रूपाने रहावा, यासाठीच लेखन प्रपंच.

आता घरातच नागोबा आणून त्याची पूजा केली जाते. म्हणजे ठीक आहे.काही गोष्टी एका मर्यादेपर्यंत ठीक आहेत. पण या निसर्गाला समजून घ्या,त्याच्याशी समरस व्हावे,त्याच्यात काही प्रगती करता येते का एवढाच फक्त त्यामागचा हेतू . बाहेरच्या मनमोकळ्या वातावरणाचा अनुभव आनंद येत नाही. शास्त्रीय दृष्ट्या मला वाटते हा ही निसर्ग चक्राचा चा एक भाग . झिम्मा ,फुगड्या, पारंपरिक खेळ, मनोरंजन शारीरिक व्यायाम साठी असावेत.



पूर्वी मनोरंजनासाठी जास्त सोयी सुविधा नव्हत्या.त्यामुळे असेल, एकत्र येऊन विचार विनिमय विचारांची देवाण घेवाण होण्यासाठी असेल. संस्कृती व्रतवैकल्ये कुठेतरी निसर्गाचाच एक भाग होता आणि आजही आहेआणि तो काही प्रमाणात अजूनही जपला जातोय. त्याचा आनंद आहे.निसर्गाच्या सानिध्यात जाऊन वातावरण निर्मिती करणे.किंवा शरीरासाठी ही त्याचा उपयोग करून घेणे निसर्गाचे जतन करणे. त्यातून धार्मिक सामाजिक सांस्कृतिक सलोखा निर्माण व्हावा असा आपल्या पूर्वजांचा त्यामाग चा उद्देश असावा.

आणि त्यातून निर्माण होणारा आनंद घेत जीवनाच्या नव्या दिशेकडे नव्याने वाटचाल होण्यासाठी मदत होईल असे वाटते. पण आता असे वाटते की निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन तो आनंद घेण्यापेक्षा म्हणजे अप्रत्यक्षरित्या निसर्गच घरात आणला जातोय जणू.कधी कधी विचार येतो,आपली पिढी कशी घडली, आणि आत्ताची पिढी कशी घडतेय, याला आपणच जबाबदार आहे की काय ? असे कधीतरी वाटत राहते. आणि मग.... क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षावात त्या चिंब चिंब भिजवतो. कुठल्याशा जाणिवेनं मग कधीतरी हळहळतो. ओलावलेल्या पापण्यात एक उगांच उरी उरतो तो एक थेंब...

# चांद्रयान 3 मोहीम



प्रज्ञा पंडित, ठाणे
संपर्क क्र. 9320441116

आधुनिक केसरी

**अंतराळ हा विषय कायमच जनसामान्यांचा उत्सुकतेचा विषय ठरला आहे. अवकाशातील तारे ग्रह चंद्र आणि संपूर्ण आकाश विश्व याबद्दल अनामिक कुतूहल प्रत्येकाच्या मनात असतेच असते. त्यात चंद्र म्हणजे तर जिव्हाळ्याचा! चंद्राला कोणी भाऊ म्हणतं, कोणी देव म्हणतं, कोणी सखा म्हणतं, तर घराघरात चंद्राला लहान मुलांचा अगदी मामाही बनवले आहे.**

तर कोसो दूर असलेल्या या चंद्रावर आपल्या देशाचे यान त्याला भेट देण्यासाठी नुकतेच प्रक्षेपित झाले. म्हणूनच 14 जुलै 2023 हा दिवस भारतासाठी अतिशय महत्वाचा दिवस ठरला आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा असा क्षण 14 जुलै दुपारी 2 वाजून 35 मिनिटांनी प्रत्येकाने अनुभवला. संपूर्ण जगाचे लक्ष यावेळी फक्त आणि फक्त भारतावर होते.

यावेळी चांद्रयान-3 लाँच व्हेईकल मार्क-3 (LVM3) रॉकेटद्वारे आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटर मधून दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी प्रक्षेपित केले गेले. 615 कोटी रुपये खर्चून तयार केलेले हे मिशन सुमारे 50 दिवसांच्या प्रवासानंतर चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ उतरणार आहे.आता हे चांद्रयान पृथ्वीभोवती काही वेळा फिरेल. त्यानंतर पृथ्वीची कक्षा सोडून चंद्राच्या कक्षेत प्रवेश करेल. 5 ऑगस्ट रोजी हे यान चंद्राच्या कक्षेत प्रवेश करेल. तसंच त्यानंतर 23 ऑगस्ट रोजी हे यान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरायला सुरूवात करणार आहे. त्यामुळे 23 ऑगस्ट हा आता अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. भारतातील वैज्ञानिकानी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) द्वारे आतापर्यंत अनेक वैज्ञानिक मोहिम हाती घेतल्या. जसे की, मंगल यान ,चंद्रयान 1,चंद्रयान 2 इत्यादी... या मोहीम भारतीय अंतराळ संशोधन (ISRO) पार पाडल्या आहेत. परंतु चंद्रयान 2 मात्र चंद्रावर लँड आणि रोव्हर क्रॅश झाल्यानंतर ही मोहीम अपूर्ण राहिली होती. म्हणूनच त्यानंतर भारताने चंद्रयान 3 मोहीम हाती घेतली. ही मोहीम अतिशय महत्त्वाची व मोठी अशी ठरणार आहे. चंद्राच्या भूमीवर सुरक्षित आणि अलगद यान उतरवण्याचा प्रयोग यशस्वी करणे हे चांद्रयान 3 चे उद्दिष्ट आहे. चांद्रयान-३'चे तीन प्रमुख भाग आहेत. विक्रम लँडर (चांद्र स्थानक), प्रग्यान



रोव्हर (स्वयंचलित वाहन) आणि प्रोपल्जन मॉड्यूल (वाहक यंत्रणा). चांद्रयान- ३'चे प्रक्षेपण लाँच वेहिकल मार्क ३ या भारताच्या सर्वात मोठ्या रॉकेटच्या साहाय्याने करण्यात आले.

आवर्जून प्रत्येकाला माहित असावी अशी या मोहिमे बाबत ची बातमी म्हणजे चंद्रावर जात असलेले हे भारतीय अंतराळ संशोधन यान हे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरेल की जिथे आतापर्यंत कुठलेही यान पोहोचले नाही.

याचकरिता संपूर्ण जगभरातील शास्त्रज्ञांकरिता चंद्रयान 3 मोहीम अत्यंत महत्त्वाची व मोठी अशी ठरणार आहे . आपल्या देशातील तंत्रज्ञान किती प्रमाणात विकसित आहे हे दाखवण्याची संधी भारताला मिळालेली आहे. चांद्रयान-३ ही मोहिम भारताच्या अवकाश संशोधन क्षेत्रातील परिश्रम, जिद्द आणि चिकाटीचे प्रतिक आहे. चांद्रयान 3 मोहिमेला यशस्वी उद्दिष्टपूर्ती साठी मनपूर्वक शुभेच्छा आणि सदिच्छा!

# आचरणात आणण्यासारखे काही

आधुनिक केसरी

**जेवढा माणूस आत्मकेंद्रित होत जातो. फक्त स्वतःचाच विचार करत राहतो. तेवढा तो स्वार्थाच्या आहारी जात असतो. त्याचा पैशांचा दागिन्यांचा, प्रॉपर्टीचा हव्यास वाढीस लागतो. त्यामुळे, तो स्वतःचं सुखसमाधान विसरतो.**

पन्नास वर्षांपूर्वीही माणसांच्या गरजाही होत्याच पण, तेव्हाची माणसं समजदारीने वागत असत. कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावं हे ते पक्कं ठरवून त्याप्रमाणे आचरण करीत असतं.




मधुकर ए. निलेगावकर
संपर्क क्र.: ९४२१३७५६९१

ते जीवनावश्यक गोष्टींना अधिक महत्त्व देत असत, आणि ऐषोरामाच्या गोष्टींना दूर ठेवत असतं. त्यामुळे, त्यांच्या कौटुंबिक जीवनातील भावभावनांचा, प्रेमाचा,नात्यांचा आणि आर्थिक बाबींचा ताळमेळ बसत असे. तेव्हा कुठल्याही प्रकारचे आर्थिक, शैक्षणिक, नियोजनाचे, मार्गदर्शनाचे क्लासेस घेतले जात नव्हते. तरीही, कोणत्याही प्रकारची कमतरता, उणीव सर्व लोकांना तेव्हा भासत नव्हती. समजा,तशी उणीव,अडचण जरी आली तरी आजूबाजूचे लोक मग ते कोणत्याही जातीचे का असेनात एकमेकांना सर्वजण मदत करीत असत. ही जमेची बाजू त्याकाळात असे. त्यामुळे, कुठल्याही कारणावरून वादविवाद, भांडण, मारामा-या यांचं प्रमाण तेव्हा अत्यंत कमी असे.

आताच्या काळात शैक्षणिक, आर्थिक उपक्रम यांना व्यवसायाचे स्वरूप आले आहे. त्यासाठी नियोजन, व्यक्तीमत्व विकास नोकरी इत्यादी बाबतचे वर्ग घेतले जातात. तरी सुध्दा सध्याच्या काळातील माणसांचं कौटुंबिक प्रेमाचं, नात्यांचं भावभावनांचं तसेच, आर्थिक बाबतीतील संतुलन राहीलेले नाही. जे पुर्वीच्या काळात होतं. यावरुन सध्याच्या काळातील माणसांनी आपल्या आचार, विचार, व्यवहार, वक्तव्य, त्यांचं वागणं, बोलणं इत्यादी गोष्टींबाबत योग्य ते संतुलन आहेका! हे अंतःकरणपूर्वक लक्षात घेऊन त्याप्रमाणे आचरण केलं पाहिजे. सध्या माणसांचा कल ऐहिक, ऐषोरामी व आर्थिक गोष्टींकडे अतिप्रमाणात वाढलेला आहे. त्यामुळे, उमेदीची बरीच वर्षे, सांसरिक गोष्टींची बरीच वर्षे उपरोक्त गोष्टींची परिपुर्तता करण्यात खर्च होतात.

मग आयुष्याच्या संध्याकाळी त्यांच्याजवळ काहीच शिल्लक राहिललं नसतं. फक्त, स्वार्थ साधण्यातच सारं आयुष्य खर्च झालेलं असतं. त्यांच्या परिणामस्वरूप अशा माणसांना समाधान मिळत नाही. समाधान मिळण्यासाठी माणसांची कर्मे चांगली असावी लागतात. तरच, कौटुंबिक व सामाजिक संतुलन स्थिर राहिल यात शंका नाही.



# हँडसम फौजदार काळाच्या पड्याआड



रवींद्र महाजनी हे एक चित्रपट अभिनेते आणि यशस्वी दिग्दर्शक आहेत, मूळचे भारतातील आहेत. तो केवळ मराठी फिल्म इंडस्ट्रीत काम करतो. 70 च्या दशकाच्या उत्तरार्धापासून ते 80 च्या दशकाच्या मध्यापर्यंत मराठी चित्रपटसृष्टीत योगदान दिल्याबद्दल त्यांनी मोठी प्रशंसा मिळवली आहे. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट सुपरस्टार मानले जाते आणि एकेकाळी विनोद खन्ना म्हणून ओळखले जात होते. निःसंशयपणे, तो एक मोहक देखावा आणि एक देखणा व्यक्तिमत्व असलेली व्यक्ती आहे. त्याच्या चाहत्यांनी त्याच्या अप्रतिम अभिनय कौशल्याची दखल घेतली. त्यांनी विविध चित्रपटांमध्ये काम केले ज्यासाठी ते प्रसिद्ध झाले.

त्याच्या दिसण्यापासून ते अभिनय कौशल्यापर्यंत, तो अविश्वसनीयपणे एक उत्कृष्ट कलाकार आहे ज्याला केवळ उत्कृष्ट अभिनय कौशल्याचा आशीर्वाद नाही, तरीही एक यशस्वी दिग्दर्शक आहे. त्यांनी विविध चित्रपटांचे दिग्दर्शनही केले आहे. 1986 मध्ये, एन. चंद्रा दिग्दर्शित "अंकुश" नावाच्या चित्रपटात तो दिसला. या चित्रपटात रवींद्र महाजनी मुख्य अभिनेत्याच्या भूमिकेत दिसले होते. "हा सागर किनारे", "सुंबरन गाव देवा" यासह काही रोमँटिक गाण्यांमध्ये तो दिसला आहे. त्याच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक म्हणजे “देवता” जो सर्वाधिक लोकप्रिय झाला. 1979 मध्ये, तो “दुनिया करे सलाम” या चित्रपटात दिसला आणि (1984) मध्ये रिलीज झालेला “मुंबई चा फौजदार”, झूंज (1989), कलात नकळत (1990), आराम हराम हे हे त्याचे काही सर्वोत्कृष्ट हिट चित्रपट आहेत. लक्ष्मीची पावले हा चित्रपट त्याच्या कारकिर्दीतील एक ब्लॉकबस्टर हिट होता. अभिनयातील दीर्घ अंतरानंतर, त्याने 2015 मध्ये "काय राव तुमही" नावाच्या चित्रपटाद्वारे पुनरागमन केले. मराठी चित्रपटसृष्टीतील प्रतिष्ठित स्टार म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी 18 हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे आणि उत्तम अभिनय केला आहे. त्यांनी नेहमीच त्यांच्या भूमिका प्रभावीपणे केल्या ज्यासाठी त्यांना मोठी ओळख मिळाली.

अतुल ह. खंडगावकर

# दहशतवादाविरोधात बुलंद आवाज



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**भारताकडे यावर्षी शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन या परिषदेचे यजमान पद होते. यावर्षी भारताने शिखर परिषदांचे आयोजन करून हॅट्रीक साधली आहे. मंगळवारी 4 जुलै रोजी शांघाय सहकार्य शिखर परिषदेची नवी दिल्लीत आभासी पद्धतीने बैठक झाली.या बैठकीमध्ये युरेशियातील प्रमुख देशाने घनिष्ठ संबंध निर्माण करण्याचा आणि परस्पर सहकार्य वाढविण्याचा संकल्प केला.**

आज जग अभूतपूर्व परिवर्तनामधून जात आहे आणि वेगवान तांत्रिक विकासाच्या एका नवीन युगात प्रवेश करत आहे. ज्यासाठी जागतिक संस्थांच्या प्रभाव क्षमतेत वाढ होत आहे. या मूलभूत प्रक्रियामध्ये मजबूत बहुध्रुयियता, वाढलेली परस्परावलंबता आणि डिजिटलायझेशनचा वाढलेला वेग दिसून येत आहे. त्यातच दहशतवादी धमक्या आणि आव्हाने अधिकाधिक विनाशकारी आणि धोकादायक ठरत आहे. विद्यमान संघर्ष तीव्र होत आहेत आणि नवीन संघर्ष उदयास येत आहेत. त्यामुळे दहशतवाद विरूद्ध सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे असा सूर नवी दिल्लीच्या शांघाय घोषणापत्रात मांडला आहे. हे घोषणापत्र प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय प्राधान्यक्रम समोर ठेवून लोकशाही आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी यर्थार्थ भूमीकांचा पुनरूच्चार करते.

शांघाय शिखर परिषदेतील या गटाला दहशतवाद विरोधी समूह म्हणून वर्तमान संदर्भात विशेष महत्त्व आहे. भारताने आपल्या सक्रीय अलिप्ततावाद सिद्धांताचा या निमित्ताने पुन्हा एकदा प्रत्यय आणून दिला आहे. भारताने आयोजित केलेल्या या ऑनलाईन अभासी शिखर परिषदेच्या शेवटी सर्व नेत्यांनी जारी केलेल्या संयुक्त घोषणापत्रामध्ये असेही म्हटले आहे की, सदस्य राष्ट्रे दहशतवादाची समस्या आणि सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी वैचारिक आणि संघर्षात्मक दृष्टिकोणातून दहशतवादी प्रवृत्तींचा प्रखर विरोध करतात. नाटो संघटनेचे विस्तारवादी धोरण आणि युक्रेनला दिल्या जाणाऱ्या पाश्चात्य लष्करी सहाय्याचा थेट संदर्भ न घेता "विशिष्ट देश किंवा देशांच्या गटाद्वारे जागतिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या एकतर्फी आणि अमर्यादीत विस्ताराचा नकारात्मक प्रभाव असल्याबद्दल" या नेत्याने टीका केली. अफगाणिस्तानातील अंतर्गत परिस्थितीच्या गांभीर्याबद्दल चिंता व्यक्त करून त्यांनी म्हटले की, तेथे सर्वसमावेशक लोकाभिमुख प्रशासन स्थापन करणे आवश्यक आहे. सर्वस्थानिक समुदाय धर्म आणि राजकीय गटांचे व अफगाण समाजाचे व्यापक प्रतिनिधित्त्व अशा प्रशासनात घडून आले पाहिजे. या परिषदेतील सर्व सदस्यांनी एकमताने दहशतवाद विरोधी पवित्रा घेतला.लोकशाहीच्या विकासात दहशतवाद हा एक अडसर आहे हे ओळखून या परिषदेने दहशतवाद विरोधी गट सक्रीय केला आहे.

**थोडा पूर्वइतिहास :** या संघटनेची स्थापना चीन आणि रशियाच्या पुढाकाराने 1990 या दशकात 1996 साली करण्यात आली. 26 एप्रिल 1996 रोजी चीन, कझाकिस्तान, किरगिजस्तान, रशिया आणि ताजिकिस्तान या पाच राष्ट्र प्रमुखांनी शांघाय येथे सिमा क्षेत्रामध्ये लष्करी विश्वास वाढविण्याच्या उद्देशाने करारावर सह्या केल्या आणि शांघाय पाच हा गट स्थापन झाला.पुढे 24 एप्रिल 1997 रोजी या पाच देशांनी मॉस्के, रशिया येथे झालेल्या शिखर बैठकीत सिमावरती भागात परस्पर लष्करी सहकार्याच्या करारावर सह्या केल्या.20 मे 1997 रोजी रशिया व चीनच्या अध्यक्षाने बहुध्रूवीय जग घोषणेवर सह्या केल्या. शांघाय पाच गटाची पहिली वार्षिक परिषद 1998 मध्ये अल्माटी कझाकिस्तान येथे, 1999 मध्ये बिश्वेक, किर्गिजस्तान येथे आणि 2000 मध्ये दुशांबे, ताजिकिस्तान येथे झाली.दुशांबे शिखर परिषदेमध्ये सदस्यांनी इतर देशांच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेपाला विरोध करण्याचे मान्य केले. मानवतावाद आणि मानवी हक्कांचे रक्षण करण्याचे तसेच राष्ट्रीय स्वातंत्र्य सार्वभौमत्व प्रादेशिक अखंडता आणि सामाजिक स्थैर्याचे रक्षण करण्यासाठी एकमेकांच्या प्रस्तावांना पाठिंबा देण्याचे ठरविले.शांघाय पाच या संघटेनेने प्रारंभीच्या काळात परस्पर हितासाठी पोषक कार्य केले.पुढे संस्थात्मक विकासात अनेक बदल घडून आले आणि या संघटनेचा विस्तार होत गेला.2001 मध्ये सहा राष्ट्रप्रमुखांनी संघटनेच्या ध्येय उद्दिष्टाला अंतिम स्वरूप दिले.2001 ते 2008 संघटनेचा वेगाने विकास झाला.तसेच आर्थिक व सुरक्षा विषयक उपक्रम तयार करण्यात आले.2002 मध्ये रशियातील पीट्स बर्ग येथे झालेल्या परिषदेत घोषणापत्रावर सह्या करण्यात आल्या आणि ही संघटना 19 सप्टेंबर 2003 रोजी जन्माला आली.2005 मध्ये अत्साना कझाकिस्तान येथे झालेल्या शिखर परिषदेमध्ये भारत, इराण, मंगोलिया आणि पाकिस्तान या देशांच्या प्रतिनिधींनी या शिखर परिषदेत प्रथमच भाग घेतला.अर्ध्या मानवतेचे प्रतिनिधी या परिषदेत जमले असे वर्णन कझाकिस्तानच्या अध्यक्षांनी केले होते.वाहतूक ऊर्जा, दूरसंचार अशा वीसपेक्षा अधिकक्षेत्रांमध्ये परस्पर सहकार्यास



सुरूवात झाली.लष्कर, संरक्षण, आर्थिक, सांस्कृतिक, बँकींग इत्यादी क्षेत्रात शांघाय राष्ट्राने मदतीचा हात पुढे केला.2015 मध्ये रशियातील ऊफा येथे झालेल्या परिषदेत भारत आणि पाकिस्तानला पूर्ण सदस्य म्हणून स्विकारण्यात आले.2016 मध्ये ताशकंद येथे जबाबदारीच्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या.2018 मध्ये या संघटनेच्या वतीने आफ्रिकन युनीयन आणि आफ्रियन सेंटर फॉर द स्टडी ऑफ रिसर्च ऑन टेरॉरिझम या संस्थाशी संबंध प्रस्तापित केले आहे.2023 च्या माहितीनुसार चीन-भारत रशियासह एकूण अकरा राष्ट्रे या संघटनेचे सदस्य आहे.निरीक्षक म्हणून अफगानीस्तानला व बेलारूसला तसेच अफगानीस्तान मंगोलिया यांनाही निरीक्षक म्हणून दर्जा देण्यात आला आहे. श्रीलंका तुर्की, कंबोडिया, अझर बैजान, नेपाळ, अर्मेनिया, इजिप्त कतार, सौदी अरेबिया, कुयेत, मालदीव, म्यानमान, संयुक्त अरब, इमीरात, बहारीन,बेलारूस ही सोळा राष्ट्रे संवाद भागीदार आहेत. शिवाय दक्षिण पूर्ण आशियाई राष्ट्राची संघटना, राष्ट्रकुल संघटना, तुर्कस्तान व संयुक्त राष्ट्रे हे सदस्य पाहुणे म्हणून उपस्थित असतात. प्रारंभी या संघटनेचे स्वरूप पूर्वीचा सोवियट रशियातून बाहेर पडलेली मध्य आशियाई राष्ट्रांना एकत्र आणणे एवढेच होते. परंतु पुढे या संघटनेने युरेशियातील राजकीय, आर्थिक-भूराजनैतिक या विविध दृष्टीने एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि या संघटनेचे महत्त्व वाढू लागले. या संघटनेच्या स्थापनेच्या वेळी रशियन नेते बोडीस एलसीन आणि चीनचे पंतप्रधान झोमिंग झिया यांनी पुढाकार घेतला होता. पुढे चालून रशियाचे अध्यक्ष ब्लादिमोर पुतीन आणि चीनचे पंतप्रधान शी जिन पिंग यांनी हा पुढाकार कायम ठेवून या परिषदेचे प्रभावक्षेत्र व्यापक करण्याचा प्रयत्न केला. पुढे भारत आणि पाकिस्तान या दोन देशांनाही या शिखर संघटनेत सहभागी करून घेण्यात आले. आता संघटनेची सदस्य संख्या 12 पर्यंत पोहोचली आहे. युरोप आणि आशियाला जोडणाऱ्या या विस्तीर्ण भूक्षेत्राला युरेशिया म्हणून ओळखले जात असे आणि जागतिक सत्ता समतोलाच्या दृष्टीने या संघटनेच्या कार्याला विशेष महत्त्व आहे.

**नवे बदलते संदर्भ :** पंतप्रधान मोदी यांचा अमेरिका दौरा युक्रेनमधील रशियन युद्धाचे वाढते दडपण अफगाण समस्या या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शिखर परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातील लोकसंख्येपैकी 40 टक्के लोकसंख्या 60 टक्के भूप्रदेशात राहते. या देशांचा एकत्रित जीडीपी सुमारे 20 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.त्यामुळे या परिषदेतील राष्ट्रांचा बुलंद आवाज महत्त्वाचा ठरतो.शांघाय सहकार्य संघटना ही आशियातील, युरेशियातील प्रमुख राष्ट्रांच्या परस्पर सहकार्याचे खुले व्यासपीठ आहे. सुरक्षेसमोरील आव्हाने आणि धोके लक्षात घेऊन विकासासाठी पोषख वातावरण तयार करण्यावर आणि सामाजिक, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेसाठी लोकशाही मजबूत करण्यावर शांघाय परिषदेवर भर देण्यात आला आहे. सुरक्षेप्रमाणेच व्यापार विकसनशिल अर्थव्यवस्था गतीमान वित्त व गुंतवणूक धोरण सांस्कृतिक आणि मानवतावादी संबंध या क्षेत्रात अधिक सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. धार्मिक असहिष्णुता आक्रमक राष्ट्रवाद वांशिक भेदभाव तसेच झेमोफोबिया कल्पनांचा प्रसार रोखण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज प्रतिपादन करण्यात आली.दहशतवादी, फुटीरतावादी आणि अतिरेकी गटांच्या कारवायाशी सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाद्वारे संयुक्त समन्वित प्रयत्न करण्यावर सदस्याने भर दिला आहे.

**योगदानाची महत्त्वपूर्ण क्षेत्रे :** मागील वर्षी समरकंद येथील झालेल्या शिखर परिषदेत युद्धाने प्रश्न सुटत नाहीत, शांतता व सहकार्याने प्रश्न सोडविले पाहिजे असा आग्रह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धरला होता.हे सूत्र पुढे ठेवून नवी दिल्ली शिखर परिषदेने अणवस्त्रांच्या अप्रसारावरील कराराचे व तरतूदीचे काटेकोरपालन करण्यावर आग्रह धरला. जागतिक क्षेपनास्त्र प्रणालींचा एकतर्फी आणि अमर्याद विकास हा शांततेस धोका ठरतो. त्यामुळे त्यांच्या बाबतीत सदस्य राष्ट्रांनी जागरूक राहण्याचा आग्रह धरला आहे. त्यासाठीनिशस्त्रीकरणावर भर दिला आहे.सदस्य राष्ट्रांनी सुरक्षा आणि शांततेसाठी जैविक आणि विषारी शस्त्रे, त्यांचा विकास, उत्पादन आणि साठेबाजीवर बंदी घातली पाहिजे. तसेच मानवी कल्याणासाठी निशस्त्रीकरण कल्पनांच्या प्रसारावर सुनिश्चितपणे भर दिला पाहिजे. मध्य आशियाला अणवस्त्रमुक्त करण्याची गरज आहे. त्यासाठी व्यापक कृती योजनेची जबाबदारी सदस्य राष्ट्रांनी स्विकारली पाहिजे. लोकशाही आणि शांततापूर्ण विकासाच्या मार्गात दहशतवाद हा अडथळा आहे. त्यासाठी त्याचा निषेध केला पाहिजे. हे सूत्र घेऊन या परिषदेत विचार मंथन करण्यात आले. सामाजिक व आर्थिक विकास हा शांततामय वातावरणातून होऊ शकतो. शाश्वत सामाजिक, आर्थिक विकासासाठी ही संघटना प्रदेशातील लोकांना कल्याण आणि जीवनमान सुधारण्यासाठी परस्परात सहकार्य अधिक सखोल करण्याचा निश्चय करून सांस्कृतिक योगदानासाठी परस्परात सांस्कृतिक सहकार्यासाठी सज्ज झाली आहे. आर्थिक आघाडीवरील गुंतवणूक ऊर्जा, अन्न, सुरक्षा, विश्वासार्ह, लवचिक आणि वैविध्यपूर्ण पुरवठा साखळी तसेच औद्योगिक सहकार्य आणि अंतरप्रादेशिक संबंध मजबूत करण्यावर भारताने भर दिला आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती, आरोग्य, आपत्ती, व्यवस्थापन, पर्यटन, क्रीडा, लोकसंपर्क, महिला आणि तरूणाचा विकास या क्षेत्रातील समग्र बदलावर भारताने जोर देण्याचा आग्रह धरला आहे. पर्यावरण संरक्षण ही हवामान बदलानंतरची प्रमुख समस्या आहे. याबाबत नकारात्मक दृष्टिकोन न ठेवता कार्य करावे. त्यासाठी संघटनेने 2024 हे पर्यावरण वर्ष साजरे करण्याचे ठरवले आहे.

**समारोप :** नवी दिल्ली शिखर परिषदेने अशाप्रकारे दहशतवाद निपटून काढण्याचा निर्धार केला आहे. या परिषदेमध्ये पर्यावरण रक्षण आणि शाश्वत विकासाला गती देण्याचा संकल्प महत्त्वाचा वाटतो. तसेच या परिषदेत इराणला पूर्ण सदस्य राष्ट्र म्हणून प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. बेलारूस प्रजासत्ताकाने यावेळी प्रथमच संयुक्त घोषणापत्रावर सह्या केल्या. संघटनेचा अध्यक्ष या नात्याने भारताच्या मौलिक कार्याचे कौतूक करण्यात आले. पुढील बैठक 2024 मध्ये कझाकिस्तान प्रजासत्ताकामध्ये होणार आहे. या पार्श्वभूमीवर दिल्ली घोषणापत्राचे विशेष महत्त्व आहे. कारण भारताचे नेतृत्त्व मध्य आशियातील देशांनी एकमताने मान्य केले असून भारताच्या भावी प्रभुत्वाची ही नांदी होय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी G20 परिषदेनंतर आता एस.सी.ओ. परिषदेचे अध्यक्ष म्हणून बजावलेले कार्य आशियातील शांतता विकास आणि स्थैर्याच्या दृष्टीने हीतकारक ठरले आहे यात शंका नाही.

**घोषणा पत्राचे मौलिक सार :** शांघाय सहकार्य संघटनेच्या नवी दिल्ली येथील 4 जुलैच्या शिखर परिषदेत प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनावर नरेंद्र मोदी सिद्धांताचा प्रभाव आहे .या घोषणापत्रामध्ये प्रामुख्याने पुढील पाच पैलु मोलाचे ठरतात .

1 . दहशतवाद, फुटीरतावाद आणि अतिरेक्यांना विरोध करण्यासाठी सक्षम प्राधिकरणामधील सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी प्रादेशिक दहशतवाद विरोधी संरचनेच्या प्रभावी क्रियाकल्पासाठी सदस्य राष्ट्रांमध्ये पोषक वातावरण तयार करण्यावर व परस्पर सहकार्य करण्यावर भर देण्यात आला आहे .

2 . राष्ट्रीय कायद्याच्या अधीन राहून परस्पर सहमतीच्या आधारावर सदस्य राष्ट्रे माहिती क्षेत्रातील नव्या धोरणाला सामोरे जाण्यासाठी राज्य सार्वभौमत्वाचा आदर करून इतर देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाहीत . तसेच इंटरनेटचे नियोजन करण्यासाठी सर्व देशांच्या समान अधिकार आणि त्यांच्या राष्ट्रीय विभागात ते व्यवस्थित करण्याचा सार्वभौम अधिकार सुनिश्चित करतील .

3 . सदस्य राष्ट्रे माहिती व संप्रेषण तंत्रणानाच्या सैनिकी करणाला विरोध करतात . सदस्य राष्ट्रे गुन्हेगारीच्या नियंत्रणासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आणि इतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर विशेष वाटाघाटी यंत्रणेच्या चौकटीत सहकार्य सुरू ठेवतील .

4 .तस्करी, आमली पदार्थाचा गैरवापर आणि दहशतवादासाठी निधीचा स्त्रोत म्हणून अवैध वापर याबाबत वाढता धोका लक्षात घेऊन परिषदेने चिंता व्यक्त केली आणि नियामक साधनांच्या अंमलबजावणीचे महत्त्व लक्षात आणून दिले .तसेच 2023 मध्ये आमली पदार्थ नियंत्रणासाठी ठरविलेल्या धोरणाची अंमलबजावणी तात्काळ करण्यावर भर देण्यात आला .

5 .हवामान बदलानंतर निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी या क्षेत्रात नवे वर्ष पर्यावरण वर्ष साजरे करण्यात येईल .

# रवींद्र महाजनी.. रुबाबदार अभिनेता




सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

आधुनिक केसरी

**पुण्यापासून जवळ असणाऱ्या तळेगाव दाभाडे इथल्या आंबी क्सर्बिया सोसायटीच्या एका फ्लॅटमध्ये रुबाबदार व्यक्तिमत्व असलेले अभिनेते रवींद्र महाजनी हे राहत होते. त्याचा मुलगा गश्मीर हा देखील एक मराठी चित्रपट सृष्टीतील आघाडीचा अभिनेता तो मात्र मुंबईत राहतं असतो .परमेश्वरांनी मुळातच देखणं रुप दिलेल्या रविंद्र महाजनी यांनी संपूर्ण मराठी चित्रपट रसिकांना आपल्या अभिनयाने मंत्रमुग्ध केले होते.अभियानातून मराठी चित्रपट सृष्टीत नंदनवन फुलवणाऱ्या अतिशय शांत..लाघवी स्वभावामुळे साऱ्यांनाच आपलसं केलं होतं . आज दुपारी रविंद्र महाजनी गेल्याची बातमी समजली नी संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी चित्रपटातील रसिकांच्या काळजाचा ठेका चुकला.**

...रविंद्र महाजनी हा अभिजात सिनेनट नऊ महिन्यां पासून एकटाच पुण्याजवळील तळेगाव दाभाडे मधील आंबीच्या क्सर्बिया सोसायटीच्या फ्लॅट मधे एकाकी जीवन घालवत होता. त्यांच्या फ्लॅट मधून दुर्गंधी येत असल्याचे शेजाऱ्यांनी पोलीसांना सांगितले. पोलिसांनी त्याच्या फ्लॅटचा दरवाजा तोडला .तर एक अभिजात सिनेनट जमिनीवर मृतावस्थेत आढळला... तेही तो तीन दिवसांपूर्वीच गेल्याचं समजले. हा केवढा दैव दुर्विलास.. आपल्या अभिनयाने मराठी चित्रपट सृष्टीतील रसिकांना मंत्रमुग्ध करणारा...भुरळ पाडणारा... अनेक कॉलेज तरुणींची झोप उडवणारां... रुबाबदार व्यक्तिमत्व... सौंदर्यांचा परिसस्पर्श लाभलेला अभिनेता त्याच्या जीवनाचा शेवट असा क्लेशकारक व्हावा...हे सारं ऐकून मनं सुन्न झालं..उदास झालं... कोणाच्याही जीवनाचा शेवट असा होऊनये अशीच प्रार्थना करीत ..पांडुरंगाच्या चरणी आम्ही सारेजण नतमस्तक होऊन गेलो हे ही मला समजले नाही हे बाकी खरं... रविंद्र महाजनी यांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव येथे झालेला होता. रविंद्र यांचे वडील ह.रा.महाजनी हे दैनिक लोकसत्ता मधे संपादक म्हणून काम करीत होते.रवींद्र यांना बालपणापासूनच अभिनयाची होती. शाळा कॉलेजेस मधून त्यांनी अनेक नाटकातून अनेक भूमिका साकारलेल्या होत्या.त्याचे वडील नेहमीच त्याला सांगत असतं ... आधी तू शिक्षण पूर्ण कर नंतर मग तू नाटक चित्रपटात जा.... रवींद्र इंटर सायन्स मध्ये असताना नापास झाले.. त्यावेळेस त्याचे वडील खूप नाराज झाले.. तरी तू ना उमेद होऊ नकोस... असा धीर देत ते म्हणाले तू आता सायन्स साईड सोडून दे ...आणि आर्ट्स कडे जा. वडिलांचा तो सल्ला ऐकून रवींद्र यांनी आपलं शिक्षण पूर्ण केलं. आपण चित्रपटसृष्टीत जावं.. नाव कमवावं असं त्यांना सारखं वाटत असे.. पण तशी संधी मिळाली नाही. म्हणून रवींद्र महाजनी यांनी मुंबईत नऊ वर्ष टॅक्सी चालवली. पण त्यांच्यातील नाट्य कलावंत हा त्यांना गुपचूप बसवत देत नव्हता. मग अशा परिस्थितीत मधुसूदन कालेलकर यांच्या जाणता अजाणता या नाटकात त्यांना



प्रमुख भूमिका मिळाली. ती प्रमुख भूमिका रवींद्र महाजनी यांनी अतिशय गाजवली. रवींद्र यांनी. खालसा महाविद्यालयात शिक्षण घेत असताना रॉबिन भट्ट , रमेश तलवार , अवतार गिल , शेखर कपूर , अशोक मेहता , असे मात्तब्बर मित्र मिळाले. त्यामुळे आपण नाट्य चित्रपट क्षेत्रात अभिनय करावा ही इच्छा त्यांची पूर्ण झाली. त्यांच्या या मित्र कंपनीमध्ये शेखर कपूर यांनी आधीच ठरवलं होतं की आपण दिग्दर्शन करायचं ..तर रमेश तलवार ..अवतार गिल ..आणि रवींद्र महाजनी यांनी आपण अभिनेताच व्हायचं हे ठरवलं.. तर अशोक मेहता यांनी आपण कॅमेरामन व्हायचं हे निश्चित केलेलं होतं. असं असलं तरी नाट्य क्षेत्रात किंवा चित्रपट क्षेत्रात काम मिळत नव्हतं. त्यामुळे त्यांनी नाईलाजानी टॅक्सी चालवण्यास सुरुवात केली. टॅक्सी ड्रायव्हर म्हणून समाजातून खूप अवहेलना झाली. असं असलं तरी ते खचले नाहीत. त्याचवेळी मधुसूदन कालेलकर यांनी रवींद्र महाजनी च्या रुबाबदार व्यक्तिमत्व वर एक खूप सुंदर नाटक लिहिलं .." तो राजहंस एक.." या नाटकामध्ये रवींद्र यांना प्रमुख भूमिका त्यांनी दिली. रवींद्र यांनी " तो राजाहंस एक या " नाटकातील भूमिका अजरामर केली .

ही भूमिका शांताराम बापू यांनी पाहिली व 1974 साली त्यांनी रवींद्र महाजनी यांना ". झुंज. " चित्रपटांमध्ये नायकाची भूमिका दिली. झुंज चित्रपटातील नायकाची भूमिका ही अजरामर झाली.. तो चित्रपट रौप्य महोत्सवी झाला. त्यानंतर रवींद्र महाजनींना मुंबईचा फौजदार , देवता , आराम हराम आहे ,लक्ष्मी , लक्ष्मीची पावलं , गोंधळात गोंधळ ,अशा चित्रपटांमध्ये अतिशय सुंदर भूमिका मिळत गेल्या आणि रवींद्र महाजनी यांनी त्या गाजवल्या . त्यांच्या जीवनाचा आलेख वाढत गेला. रवींद्र महाजनी यांनी चित्रपटात बरोबरच बेल भंडार , आणि अपराध मीच केला या नाटकातही प्रमुख भूमिका केल्या त्याही रसिकांच्या मनामनापर्यंत पोहोचल्या 1975 ते 1990 हा काळ रवींद्र महाजन यांच्या चित्रपट जीवनातील सुवर्णकाळ ठरला. अलीकडे देखील 2015 मध्ये देखील रवींद्र महाजन यांनी अनेक चित्रपटातून भूमिका केलेल्या भूमिका गाजल्या कॅरी ऑन मराठवाडा हा चित्रपट काय.. राव तुम्ही हा चित्रपट.. किंवा देऊळ बंद आणि पानिपत या चित्रपटातील भूमिका देखील त्यांच्या चित्रपटसृष्टीतील कारकिर्दीची सोनेरी किनार असावी इतक्यात सुंदर भूमिका त्यांनी या चित्रपटातून देखील केल्या. आकाशाला गवसणी घालणाऱ्या आपल्या भूमिकेतून मराठी चित्रपट सृष्टीतील रसिकांच्या मनावर दोन दशकावून अधिक काळ साम्राज्य करणारा हा देखणा रुबाबदार व्यक्तिमत्व असलेला नट रवींद्र महाजनी याच्या जीवनाचा शेवट मात्र सर्व रसिकांच्या मनाला हृदयाला चटका लावून जाणार होता हे बाकी खरं..

# सृष्टी बघण्याची नवी दृष्टी देणारा झाडोरा



गुलाब बिसेन, गोंदिया
संपर्क क्र. : 9404235191

आधुनिक केसरी

**लॉकडाऊन, ऊसकोंडी, पाणीफेरा या प्रसिद्ध कादंबऱ्यांद्वारे वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील हे पौढ साहित्यासोबतच बालकुमारांसाठीही सातत्याने लेखन करत आहेत. त्यांच्या "सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल" या बालकादंबरीला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट बालवाडमय पुरस्कार प्राप्त झाला आहे. "झाड" हा विषय घेऊन निर्गातील बहुगुणी झाडांची बालवाचकांना ओळख करून निसर्गाकडे बघण्याची नवी दृष्टी देणारा "झाडोरा" हा बालकविता संग्रह ते बालकुमारांसाठी घेऊन आले आहेत.**

झाड हा निसर्गाचा अविभाज्य घटक आहे. झाडांशिवाय निसर्ग आणि सजिव सृष्टिची कल्पनाच आपल्याला करता येणार नाही. संपर्ण पर्यावरण हे झाडांभोवती फिरत असते. अशा या झाडांची ओळख बालसुलभ कवितांच्या माध्यमातून करून देण्याऱ्या पन्नास कवितांचा या संग्रहात समावेश आहे. सचित्र रंगीत असलेल्या या बालकविता संग्रहाची सुरूवात "झाड लावूया" या कवितेने झालेली आहे. झाड लावण्याची साद घालताना कवी लिहीतात,

**खड्डे खोदूया**
**माती घालूया**
**रोपे लावूया**
**पाणी देऊया**
**फुले फुलवूया**
**फळे मिळवूया**
**सावलीत बसुया**
**आनंद लुटूया.**

या सभोवतीच्या निसर्गात कडूलिंब, काटेसावर, आंबा, बेहडा, चिंच, वड असे असंख्य झाडे आहेत. या झाडांचा उपयोग माणूस अश्मयुगापासून करत आलेला आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवी मुलभूत गरजा तो प्रामुख्याने झाडांपासूनच भागवतो आहे. फुले, फळे, औषधांसाठी झाडांचा उपयोग नित्याचाच आहे. बरेचदा आपल्या सभोवताली बहुगुणी झाडे असली तरी त्यांची नेमकी ओळख आणि उपयोग आपल्याला माहित नसतात. त्यामुळे त्या झाडांचे महत्व आपल्याला कळत नाही. अशा बहुपयोगी झाडांची ओळख या कवितांच्या माध्यमातून बालवाचकांना होईल.

वाघाटी, लिंब, शतावरी, बेहडा यांसारख्या औषधी वनस्पती माणसाच्या नित्य उपयोगाच्या आहेत. काटेरी शतावरीचे वर्णन करताना कवी म्हणतात,

**काटेरी शतावरी**
**झाळकट त्याची वेल**
**शतावरीच्या पुढे**
**बाकी सारेच फेल.**

अशाच "वाघाटी" या औषधी वनस्पतीविषयी कवी लिहीतात,

**टीबी रोगाचे औषध**
**वाघाटीला मानतात**
**एकादशीला त्याची भाजी**
**मस्त आनंदाने खातात.**

मानवी हव्यासामुळे सर्वत्र सुरू असलेली झाडांची कत्तल निसर्गाचा समतोल बिघडवण्यास पुरक ठरत असताना झाडांचे महत्व, त्यांचे महत्व, औषधी गुणधर्म यांची ओळख बालमनाला होणे गरजेचे आहे. "झाडोरा" या बालकविता संग्रहातील कवितांतून बालवाचकांना झाडांचे महत्व समजून वृक्ष संवर्धनाची नवी दृष्टी मिळण्यास मदत होईल. निसर्गाकडे बघताना केवळ हव्यासी वृत्ती न ठेवता निसर्गाला आपण काहीतरी परत देण्याची भावना या कवितांतून निर्माण होण्यास मदत होईल.




निसर्ग हा बहुरंगी तसाच बहुढंगी आहे. या निसर्गरूपी चित्रात विविध रंग भरण्याचे काम झाडे करतात. पळस, काटेसावर, नागचाफा, रानपांगारा, बकुळ, टाकळी, चाफा इ. फुलले कि निसर्गाची शोभा बघण्यासाखी होते. फुले फुललीकी सृष्टीचा नूरच बदलून जातो. वसंतात लाल पिवळसर फुलांनी बहरणारा पळस कविच्या नजरेतून बघताना अधिक मोहक वाटतो.

**रानात पेटल्या**
**लाल मशाली**
**वर निळे आकाश**
**जणू आग खाली**
**नाचे केशरी पताका**
**सुंदर ताल धरून**
**ह्रदयी वसंत फुलवी**
**मन जाई मोहरून**

या फुललेल्या झाडांकडे बघताना बाल मन मोहरून जाते.

निसर्गाचा स्वभाव हा देण्याचा आहे. झाडे आपल्याला फुले, फळे, पाने, लाकुड, मुळे असे सारेकाही देत आलेले आहेत. अशा परोपकारी झाडांची महती कवितेच्या माध्यमातून बालवाचकांपर्यंत पोहचवण्याचा कवी डॉ. श्रीकांत पाटील यांचा हा प्रयत्न प्रशंसनीय आहे. बालकांना मुळातच गाणी/कविता ऐकायला, वाचायला तसेच म्हणायला खूप आवडतात. त्यामुळे कवितांतून झाडांची ओळख होणे हे बालवाचकांसाठी परवणीच ठरेल.

नारळ, चिकू, अंकोल, आंबा, पेरू, सिताफळ, संत्रा, चिंच, कवठ, आवळा, रामफळ, बोर, फणस, जांभूळ इत्यादी फळे आपल्या अविट चवीने खाणाऱ्याला भुलवतात. "झाडोरा" मध्ये कवीने आपल्या अवतीभवती असणारी तसेच रोजच्या खाण्यातील फळांची विशेष ओळख कवितांतून करून दिली आहे. फळांचा राजा आंबा असो की लांबट चिंच, प्रत्येकाने आपल्या चवीने वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. अशीच फळांची स्वतंत्र ओळख कवी कवितांतून बालवाचकांना करून देतात. सिताफळाविषयी लिहिताना कवी लिहितात,

**औषधी पाने**
**सजली रानात**
**फळ खाल्ल्यावर**
**आनंद भरे मनात**
**फळांचा आकार**
**लंब गोलाकार**
**चव रेंगाळते**
**निरंतर जिभेवर**

बालवाचकांना वनस्पतींचे महत्व पटरून देताना कवीने त्यात माधुर्याची पेरणी उत्तमरीत्या केलेली आहे. त्यामुळे कवीता वाचताना वाचकाला कुठेही कंटाळा येत नाही. परीचीत झाडांविषयी वाचतानाही वाचकाला नित्य नवा आनंद मिळतो.

"झाडोरा" हा कविता संग्रह केवळ झाडांची ओळखच करून देत नाही. तर बालमनाला सृष्टी बघण्याची नवी दृष्टी देतो. त्यांच्यात पर्यावरणीय मूल्यांची रूजवण करतो. या कविता संग्रहात झाडांच्या सोबतच एकंदरीत पर्यावरणाशी निगडीत असलेल्या इतर कवितांतून निसर्गाच्या लोभसवाण्या रूपाचे वाचकाला दर्शन होते. झाडे लावूया, धरणी माय, रक्षण करूया, वसुंधरा, चैत्रपालवी, मळा, चला मुलांनो, झाडोरा, ऐका मुलांनो इत्यादी कवितांतून कवी वाचकाला निसर्गाच्या विविध रूपांचा परीचय करून देतो. या कविता वाचकांच्या पर्यावरणविषयक जाणीवा अधिक वृद्धिंगत होण्यास सहाय्यभूत ठरतील. झाडोरा या शिर्षक कवितेत कवी लिहितात,

**असा झाडोरा झाडोरा**
**छान छान सावली**
**असा झाडोरा झाडोरा**
**उन्हात विसावे माऊली**
**असा झाडोरा झाडोरा**
**प्राणवायू सजीवांना देतो**
**असा झाडोरा झाडोरा**
**प्राणीमात्रांना तो जपतो**

डॉ. श्रीकांत पाटील हे प्रौढ साहित्यासोबतच सातत्याने बालसाहित्य लिहित आहेत. त्यांचा झाडोरा हा बालकविता संग्रह बालमनात पर्यावरणीय मूल्य रूजवण्यास पुरक ठरेल हे नक्की. या कविता संग्रहाला प्रसिद्ध बालसाहित्यिक बबन शिंदे यांनी प्रस्तावना दिली आहे. सचिन भोसले यांनी आकर्षक असे मुखपृष्ठ केले असून रंगतदार प्रकाशनने हा बालकविता संग्रह प्रकाशित केला आहे.

**पुस्तकाचे नाव - झाडोरा**
**पुस्तकाचे लेखक - डॉ. श्रीकांत पाटील**
**प्रकाशक - रंगतदार पब्लिकेशन, ठाणे**
**मूल्य - २००**

# दृढनिश्चयी आणि संयमी 'सुबला'ची कहाणी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**महाभारत हा एक प्राचीन संस्कृत काव्यग्रंथ आहे. महर्षी व्यास यांनी हा ग्रंथ गणपतीकडून लिहून घेतला अशी मान्यता आहे. या ग्रंथाचे आधीचे नाव जयदीप असे होते. महाभारत हा ग्रंथ भारताच्या धार्मिक, तात्त्विक तसेच पौराणिक महाकाव्यांपैकी एक आहे.जगातील हा साहित्यिक ग्रंथ आणि महाकाव्य हिंदू धर्माच्या मुख्य ग्रंथांपैकी एक आहे. हा ग्रंथ हिंदू धर्मातील पाचवा वेद मानला जातो. हा ग्रंथ साहित्यातील सर्वात अनोख्या ग्रंथांपैकी एक मानला जातो. महाभारतातील विविध पात्रे, त्यातील प्रसंग, महायुद्ध हे आपण ग्रंथातून वाचले आहे तसेच यावर आधारित मालिकासुद्धा आपण पाहिली आहे. जगण्याचे निकष कोणते, आपले आचरण कसे असावे, संकट आल्यावर धीटपणे त्याचा सामना कसा करावा, याचं अभ्यासपूर्ण विवेचन देणारा महाग्रंथ आहे. व्यासांच्या प्रभावशाली लेखणीमुळे महाभारतातील पात्रांविषयी सखोल जाणून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होते.**

महाभारतातील महत्त्वाच्या स्त्री व्यक्तिरेखेचा प्रवास घडवणारी कादंबरी वाचकांच्या भेटीस आली आहे. डॉ. रमेश नारायण लिखित 'सुबला' ही कादंबरी वाचनीय असून माहितीपूर्ण, संदर्भमूल्य असणारे पुस्तक आहे. कादंबरीच्या शीर्षकापासूनच वाचकांच्या मनात उत्कंठा निर्माण होते. 'सुबला' काय अर्थ होतो या शब्दाचा किंवा कोण आहे ही सुबला ?... ही सुबला म्हणजेच डोळ्यांवर पट्टी बांधून जीवन व्यतीत करणारी गांधारी. गांधारी म्हणून तिची महाभारतातील भूमिका, तिची कर्तव्ये, पत्नी, आई, सुन म्हणून तिच्या असणाऱ्या जबाबदाऱ्या याबद्दल आपण वाचलेले आहे. या कादंबरीत सुबला ते गांधारी असा तिचा प्रवास अधोरेखित केलेला आहे. संपूर्ण कादंबरी ही गांधारी या व्यक्तिरेखेभोवती फिरत असली तरी अन्य पात्रांचे व्यक्तिचित्रणही लेखकाने प्रभावीपणे केले आहे.

सुबक आकृतिबन्ध, ओघवती लेखनशैली, साधी- सोपी वाक्यरचना, तृतीयपुरुषी निवेदनशैली आणि वर्तमान - भूतकाळ- वर्तमानकाळ असा प्रवास यामुळे कादंबरी कुठेही रखडलेली वाटत नाही उलट आणखी जाणून घेण्याची उत्कंठा वाढत जाते. गांधारीची कर्तव्यपरायणता, महत्त्वाकांक्षा, तिने राखलेला संयम, तिची निर्णयक्षमता, निर्मोही भूमिका, तिच्या वेदना , सगळ्या मोहावर विजय मिळवणारी एक कर्तव्यदक्ष आदर्श स्त्री ही वैशिष्ट्ये या कादंबरीतून अत्यंत तपशीलवार शब्दबद्ध केले आहे.

गांधार देशाचा राजा सुबल याची कन्या म्हणजे ही सुबला. दिसायला अत्यंत रूपवान, तेजस्वी , त्यात तिचे सुरेख डोळे. तिच्या या रूपामुळे सगळेच मोहित व्हायचे. ती चित्रकला, गायन, वादन, नृत्य अशा विविध कलांमध्ये पारंगत होती. भगवान शिवाच्या आराधनेत लीन होणारी राजकुमारी सुबला हिची जन्मापासून ते तिच्या बालपणीचा काळ, तिची जडणघडण कशी झाली, याची विस्तृत माहिती या कादंबरीत वाचायला मिळते.

सुबला आणि तिचे ९९ भावंडं यांच्याशी तिचं नातं कसे होते, खासकरून शकुनीशी असणारी ओढ़ , बंधुप्रेम कसे होते , हा भाग अत्यंत तरलपणे लेखकाने वाचकांसमोर आणला आहे. देवव्रतने गांधार राज्यावर केलेले आक्रमण, राज्याची झालेली उद्विग्न अवस्था, राजा सुबल आणि त्याच्या मुलांना प्राप्त झालेला बंदिवास आणि सुबलाचे हस्तिनापुरात झालेले आगमन, धृतराष्ट्राशी झालेला विवाह या सगळ्या घटनांच्या साखळीमुळे सुबलाचं आयुष्य पूर्णतः बदलून जाते. आपल्या डोळ्यांदेखत आपल्या वडिलांच्या आणि भावंडांच्या झालेल्या मृत्युचा आक्रोश , त्याची धग मनात ठेवत ती कशी जीवन व्यतीत करते, हे वाचताना गांधारीची विविध रुपे दिसून येतात. ती गांधार देशाची म्हणून तिचं गांधारी असे नामकरण केले जाते. आणि शेवटपर्यंत हे नाव तिला धरुन राहते.

इतकी सुंदर , मोहक असूनही समोर राजवैभव असताना गांधारी तिच्या सुंदर डोळ्यांना पट्टी बांधून अंधत्व का स्वीकारते, त्या कृतीमागील तिचा विचार काय असेल, किंवा तिला कधीच डोळ्यावरील पट्टी काढून हे निसर्ग , आपली माणसे पाहावी असे वाटले नसेल का ? अशा विविध प्रश्नांची उकल यात केलेली आहे. या संपूर्ण प्रवासात गांधारीच्या सुख- दुःखात सावलीप्रमाणे तिच्या सोबत असणारी तिची सखी सुखदा आणि गांधारी यांच्यातील मैत्रीबंध संवेदनशीलतेने उलगडला आहे.

कुरु वंशाच्या वृद्धिसाठी राजमाता सत्यवतीने केलेली धडपड , आपल्या पुत्राला राजसिंहासन मिळावे, या महत्त्वाकांक्षेमुळे तिचे प्रयत्न कसे मातीमोल होतात, सत्तेच्या हव्यासापायी देवव्रतला आजन्म अविवाहित राहण्यास प्रवृत्त करणारी राजमाता सत्यवती ही व्यक्तिरेखा या सर्व मुळाशी आहे, असे जाणवत राहते. राजमाता सत्यवती हिचा भूतकाळसुद्धा यात लेखकाने उभा केला आहे. राजगादीला वारस मिळावा,अपत्यप्राप्तीसाठी व्यासांच्याकरवी नियोग पद्धतीचा वापर करणारी राजमाता सत्यवती ही स्त्री असूनही दुसऱ्या स्त्रीचे दुःख, वेदना जाणून न घेता वंशवृद्धिसाठी आपल्या सुनांचा देखील विचार करत नाही. वंशाला दिवा हवा, हा विचार किती खोलवर रुजला गेला होता, हे यातून जाणवते.

राजघराण्यातील या विचित्र प्रकारांनी व्यथित होणारी गांधारी प्रत्येक प्रसंगावेळी किती तटस्थ भूमिकेने वावरते, हे वाचताना वाटते , हे इतके सोपे नाही. गांधारीची दूरदृष्टी, मनावर असणारा ताबा , विचारपूर्वक कृती आणि संयमित भूमिका, ध्येयशील , आपल्या लक्ष्यापासून कणभरही विचलित न झालेली गांधारी ह्या व्यक्तिरेखेचा मनोव्यापाराचे दर्शन घडवणारी ही कादंबरी आहे.


आपले -परकेपणाच्या भावनेतून कौरव - पांडवामध्ये निर्माण झालेले वैर, महायुध्द तसेच श्रीकृष्णाने सांगितलेले गीताज्ञान , युद्धभुमीवर घडणारे महायुद्ध, त्याचे वर्णन इतके प्रत्ययकारी आहे, की आपण युद्धभूमीवर आहोत की काय असा भास होतो. गांधारीने आपल्या मुलाला सुयोधनाला सांगितलेले जगण्याचे सार, आपली वृत्ती कशी असावी, माणसं कशी ओळखावी, इत्यादी मौलिक ज्ञान वाचताना जाणवते, हे आजही किती सुसंगत वाटते. जगण्यातला दृष्टिकोन कसा असावा, याची प्रचिती देणारे गांधारी आणि सुयोधनामधील हा संवाद आहे.




आपल्या पतीचा एवढेच काय आपल्या मुलांचा तसेच सुनांचा चेहरा पाहण्याचा मोह आवरणारी गांधारी हिची मातृत्वाची भावना किती वेगळ्या उंचीची आहे. आपल्या निश्चयावर ती शेवटपर्यंत ठाम राहते.तिची इच्छाशक्ती किती दृढ़ होती, याची जाणीव होते. 'सुबला' या कादंबरीतून गांधारी या व्यक्तिरेखेच्या स्वभावाचे विविध पदर दिसून येतात. सुबला म्हणून असणारी तिचे अस्तित्व , तिची स्व - ओळख या कादंबरीतून लेखकाने करून दिली आहे. सोबत पुस्तकाच्या शेवटी १०० कौरवांची नावेसुद्धा दिलेली आहेत आणि संदर्भही दिलेले आहेत.शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या कादंबरीद्वारे लेखक डॉ. रमेश नारायण यांचा विस्तृत आणि सखोल अभ्यास दिसून येतो. या पुस्तकाचे मुखपृष्ठ अजय भोसले यांनी समर्पक रेखाटले आहे. 'सुबला' ही कादंबरी लक्षवेधी आहे. पौराणिक विषयांचे अभ्यासक, रसिक वाचक यांना संदर्भग्रंथ म्हणून ही कादंबरी अत्यंत उपयुक्त आहे. नक्की वाचा 'सुबला' ची कहाणी !

**( सुबला - कादंबरी / लेखक : डॉ. रमेश नारायण / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : ३०० रूपये )**

## संत सावता माळी



माळीयांच्या घरी । जन्मले सावता ।
पूरसोबा पिता । आनंदित ॥ १ ॥

विठ्ठलाचे नाम । सदा काळ मुखी ।
नाम जप सुखी । संसारात ॥२ ॥

कांदा मुळा भाजी । पिकते शेतात ।
विठ्ठल जपात । सदा राही ॥३ ॥

कधी नाही केली । पंढरीची वारी ।
भेटविला हरी । भक्ती भावे ॥४ ॥

शिकवण जगा । देई मार्ग नवा ।
भक्त लीन हवा ।अविरत ॥५ ॥

संत समाजात | जागविती आशा ।
विचारांची दिशा । प्रबोधन ॥६ ॥

संतांच्या संगती । भक्ती मार्ग गती ।
मिळे सदगती । जीवनात ॥७ ॥

सौ. अमिता अरविंदराव घाटोळ,
अकोला

## सरी पावसाच्या येता

सरी पावसाच्या येता
बेधुंद तो दरवळ
मनी काहुर उठता
भरे थेंबाची ओंजळ

सरी पावसाच्या येता
सुरू होई पोरखेळ
चिखल माती माखता
ती पाखरांची आंघोळ

सरी पावसाच्या येता
जसा अंधारतो काळ
आसमंत प्रकाशता
सारे जीव पळापळ

सरी पावसाच्या येता
सृष्टीचा शालू पांघळ
बळीराजा सुखावता
धरी हाती बैलजोड

सरी पावसाच्या येता
चहुकडे सुखकाळ
मनी आनंदी नांदता
कानी पडे तो भुपाळ

शब्दस्पर्शी
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

## खरेखुरे विद्यापीठ होते

गावात हायस्कूल नव्हते म्हणून
शेजारच्या गावात जावे लागले
शाळा खूप शिकण्यासाठी
घरटे सोडावेच लागले.
नवं गावं नवी शाळा
खूप खूप हौस होती
पंचक्रोशीत एकमेव
शाळा आमची खास होती.
सुंदर गणवेश आमचा
लागे त्यावर नजरा
चॉकलेटी पॅन्टसोबत
पांढराशुभ्र सदरा.
एकच गणवेश असल्यामुळे
लवकर फाटून जायचा
ठिगळं लावून पुन्हा एकदा
कामी आमच्या यायचा.
रस्त्याने जाताना पाहून
लोक बँडवाले म्हणून हसत होते
माहीत नव्हतं त्या वेड्यांना
ते ब्रॅण्डच पाहत होते.
दोन मैलाच्या पायपीटीने
थकवा कधी येत नव्हता
गोड साऱ्या बालमित्रांसोबत
दिवस हसत खेळत जात होता.
दुपारच्या सुट्टीमध्ये
लगबग सुरु व्हायची
गोणपटाच्या दप्तरातून
फडक्यातील शिदोरी बाहेर
यायची.
आईने केलेल्या भाकरीची
चव खूप छान होती
मिरची लोणच्यासोबत गोडी
आईच्या हाताची होती.
आम्ही बाहेरगावची मुले
भरभर जेवून घ्यायचो
अन जवळच्या शेतातून बोरं
घंटी होण्याआधी खाऊन यायचो.
गुरुजी आमचे शिस्तप्रिय
धडे संस्काराचे देत होते
कच्च्या साऱ्या मडक्यांना
आकार छान देत होते.
अशी आमची शाळा सुंदर
विश्वाचे ज्ञानपीठ होते
विजेत्यांना घडविणारे
खरेखुरे विद्यापीठ होते.

ज्ञानेश्वर गायके, खामगांव
कन्नड ९४०३३८४८८९

## माय

माय लेकराची माया
साता समुंदरा पार
येता मायेची आठवण
नयनी आसवांचा पुर
माय लेकराच्या साठी
सुख दुःखात आधार
वर किती रागावली
आत मायेचा पाझर
माय सुखाची ती खान
किती डोंगर पोखरू
वाट पाहे हा चातक
तिच्या मायेचा पाखरू
आजच्या या नवयुगात
माय मॉडेल ग झाली
लेकराच्या जीवनात
रोज दसरा दिवाळी
माय माझं ए टी म
कमी कशाचीच नाय
माझ्या एका सुखासाठी
झगडते माझी माय
तिच्या मायेच्या सीमांना
कमी पडती मोज माप
सुख विश्वाचे हो दिले
असे माझे मायबाप
मंगेश निकाळजे
खोपोली रायगड

## कविता

काळजातले मुके शब्दही बोलके करावे
एवढी बोलकी असावी कविता
कानात शिसे ओतावे
एवढी क्रूर असावी कविता
तीच्या मायेने पाशानालाही पाझर फुटवा
एवढी मायाळू असावी कविता
मूडलो जरी कितीदा
पुन्हा बळ यावे नव्याने
एवढी धैर्यशील असावी कविता
स्वछंदासाठी जगता याव
स्वतःला त्यात निरखता याव
पारख करुन स्वतःची
स्वतःसाठी जगता याव
एवढी स्वार्थी असावी कविता
जमिनीवर स्तब्ध राहून
आकाश कवेत बांधणारी
जिद्द असावी कविता
लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## चैतन्याचा मळा

बाप गेला पंढरीला
विठु शेतामंधी आला
अनं धरून नांगर
औत हाकाया लागला
औत हाकता हाकता
म्हणे तुक्याचे अभंग
बिय पेरतो भुईत
राई रखुमाई संग
एक घुमे ललकारी
चाल सर्जा, चाल राजा
झाला तल्लीन पाऊस
ढोल वाजविती विजा
तरुवेली स्तब्ध सारी
टाळ टिपती टिपती
वरुणाच्या रूपामंधी
चंद्रभागा कोसळती
दुपारच्या पहाराला
वाढी भाकर कामिनी
दिला ढेकर विठुनं
तृप्त झाली रुखमिनी
रात रात जागुनिया
विठु पाणीही भरतो
अनं रिंगणाचा ठेका
विठु शिवारी धरतो
असा चैतन्याचा मळा
विठोबानं फुलविला
बाप तिथं पंढरीत
देव शेतात राबला
कविराज:मनिष आहिरे
सटाणा नाशिक 7588069679

## नभ पावसाळी

नभ पावसाळी ,
झाकाळूनी आले...
उरी भावनांचे,
मेघ दाटलेले...

तहानली भुई,
ओढ पावसाची...
मेघ बरसतां,
तृप्तताच तिची...

ओल्या गं मातीचा,
गंध चोहीकडे...
कुणी शिंपीयले,
अत्तराचे सडे ?

नटे वनराई,
रूप बहरले...
झाडे,वेली आज,
जणू शहारले...

भेगाळली भुई,
झाली चिंब -चिंब...
बरसले आज,
पावसाचे थेंब...

गेल्या बाई दूर,
उन्हाच्या त्या झळा...
धुंद गं सरींचा,
आला पावसाळा...

सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे
९८२३०६६६०६

## अडला पाऊस....



वाट माझीच सोडून
कसा पडला पाऊस.. ?
चिंब भिजवाया मला
कसा अडला पाऊस.. ?
बघ बघ माळावरी
कसा वाढला पाऊस.. ?
आस माझी पुरावाया
कसा नडला पाऊस.. ?
आला गंध वाऱ्यावरी
कसा जडला पाऊस.. ?
गांव माझेच सोडून
कसा वेढला पाऊस.. ?
बलराज संघई
9420015108

## बळीराजाचा संघर्ष

माझ्या बळीराजा संघर्ष
संपता, कधीच संपेना
वाघाने बळी घेतला त्याचा
तरी कोणी जाऊन बघेना

कधी अवकाळी पाऊस येते
तर कधी सतधार पडत असते
आता दिसेनास झाला पाऊस
त्याला संघर्ष करावा लागते

कोणी आहेत उपाशी,
कोणी झाले मालामाल
बळीराजा वाट बघते पावसाची
विजेचा लपंडाव कमी होत नाही
अन् लक्ष नाही अजून शासनाची

बळीराजाचा संघर्ष मोठा
तरीही दिसत नाही कोणाला
त्याच्या मालात भाव वाढ झाली की
लगेच लागतात बोबलायला

बळीराजाचा विकास होत नाही
त्याची कोणाला कदर नाही
पोशिंदा म्हणतात जे,ते सारे
मात्र मदत करायला पुढाकार घेत नाही

सौ.संगीता संतोष ठलाल

## शेतीचे अभंग

बा-चा धंदा शेती
कामामध्ये दंग
मुखी पांडूरंग राबतांना.

तुडवित जातो
घामाने चिखल
जन्माची उकल
कुणब्याची.

दिनरात उभा
शेतात राबतो
मोती पिकवितो
मातीमध्ये.

कष्टाने मातीचा
करे हिर्वा रंग
उभा पांडूरंग पाठीमागे.

बाप भाकरीचा
आहे तो निर्माता
भाळी-काळी माता
जन्मभर.

बाप- पांडूरंग
रूख्मिनी ही आई
बरकत येई
ते धान्याला.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## पाऊस आला

पाऊस आला
व्याकूळ धरतीवरी
निसर्ग घडवितो
किमया न्यारी

टप् टप् पडती
भुईवर गारा
भुरळ घाली
शितल वारा

चहू बाजूंनी
मेघ बरसती
धुंद होऊनी
मुले नाचती

बहरली लता वेली
बहरली रानफुले
चातक पक्षी
आनंदाने डुले

हिरवाईने
नटले रान
धुंदीत पाखरे
गाती गान

पाऊस पडतो
रानावनात
चैतन्य फुलवी
मनामनात
- रवींद्र व्ही. चालीकवार
जि.यवतमाळ
मो.9011559106

## गझल...

डोळे पुसून घेऊ
थोडे हसून घेऊ...
आलीच संकटे तर
त्यांशी लढून घेऊ...
दे हात फक्त हाती
बाकी बघून घेऊ...
गंधाळल्या क्षणांना
हृदयी जपून घेऊ...
भांडू कधी उन्हाशी
प्रीती करून घेऊ...
जगण्यात ही खुशीचे
सारण भरून घेऊ...
संघर्ष हेच जीवन
संगे जगून घेऊ...
सविता बन्सोड
वानाडोंगरी, नागपूर

## भाव मनाचा

क्षण जपावा क्षणातूनी
मन जपावे मनातूनी
मनामनातील भावनांची
ठेवावी ओळख मनातूनी

शब्द जपावा मुखातूनी
आधार द्यावा हातातूनी
जगावयाच्या क्षणांसाठी
जीवनी साथ द्यावी मनातूनी

जीवनी नाते जपावे मनातूनी
प्रेम करावे निज हृदयातूनी
मनातूनी हसा,दूज्यांना हसवा
जीवन प्रवास सार्थक करावा

काव्यरचना: मधुकर
ए.निलेगावकर
९४२१३७५६९१

## त्या तिथे दूर माझे गावं..

त्या तिथे दूर राहिले माझे गावं,
वेडावले मन घेते हृदयाचा ठाव ||धृ||
नभ निळाईच्या निळया निळया क्षणात
ऊन सावलीचा खेळ चाले मनामनात.
विसावत्या सांजेला किनारी शोभे नाव.
त्या तिथे दूर राहिले माझे गाव..१..
सह्याद्रिची सावली त्यात मायेचा गारवा,
ओथंबल्या मनाची नाती,ऋतू एक हिरवा.
नवं नावांची नवलाई, सांगू किती नावं.
त्या तिथे दूर राहिला माझा गावं..२..
चैत्र पौर्णिमेला माझ्या
दख्खनच्या राजाचा थाट
माया ममतेसोबत आशीर्वादाचा साठ.
आई भवानी, लक्ष्मी, मारुती,
महादेव, घ्यावी किती नावं,
त्या तिथे दूर राहिला माझा गावं..३..
दंडवा,रामेश्वर, कमंडलूचं झुळुझुळु पाणी,
पिक पानातून वाजतात सप्तसुर सार आबादाणी.
नांदा सौख्यभरे चा वरदहस्त
सुख समृद्धी त्याची नावं. त्या तिथे दूर राहिला माझा
गावं..४.. अश्रूभरल्या नयनांनी वाटेवर परतततो
चाकरमानी, दूर हरवल्या धुसर वाटेवर मन
पाहे वळूवळूनी. मायेची ही नाळ,देह दूरदेशी
तरी मन घेत धाव, निनाम त्याच नाव,
त्या तिथे दूर आहे ना ! तो माझाच गावं तो माझाच गावं.
© वैशाली इंदुमती जाधव- महाडिक.
सं.-९७६७४३७९२३



# घाणेगाव तांडा येथे नीलेश उदरभरे यांनी वाचवले कोल्ह्याचे प्राण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील घाणेगाव तांडा शिवार मधे गट क्रमांक १० या शेतामधे मोतीराम चव्हाण या शेतक-याच्या शेतामधील विहीरी मधे दि १४/७/२३ रोजी त्यांना एक जंगली प्राणी कोल्हा पडलेला आढळुन आला चव्हाण यांनी वन विभागाच्या कर्मच्या-याला फोन वरुन संपर्क साधुन या घटना संदर्भामधे माहिती कळविली असता वन रक्षक ननावरे यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि अजिंठा वन परिक्षेत्र येथील कर्मचारी अधीकारी यांना हा प्रकार कळवला.

ननावरे यांनी जाईचादेव येथील सर्प मित्र निलेश वसंतराव उदरभरे पुजारी ( सर्पमित्र ) यांना काल करुन संपर्क साधला असता सर्प मित्र निलेश उदरभरे हे त्वरीत दखल घेऊन घटनास्थळी दाखल होऊन स्वताचा जिव धोक्यामधे टाकुन पोटाला कंबरला दोर चरळी आणि पट्टा बांधुन विहीरीमधे पन्नास फुट खोल खाली जाऊन या विहीरीमधे पडलेला कोल्हा जंगली प्राणी याचा जिव वाचवला या कोल्ह्याला वाचविताना सर्पमित्र निलेश उदरभरे या युवकाला खुप त्रास व इजा झाल्या या प्राण्याने निलेश वरती विहीरीमधे हल्ला करण्याचा प्रयत्न ही केला होता तरीही या युवकाने हिम्मत हरली नाही स्वताचा जीव धोक्यामधे टाकुन या कोल्ह्याचे प्राण वाचविले.

यावेळेस वन विभागाचे वनरक्षक ननावरे यांनी सुद्धा या कोल्ह्याला बाहेर काढण्यासाठी निलेश उदरभरे यांना मदत केली या कोल्ह्याला बाहेर काढण्यासाठी या परीसरातील युवक ,गावकरी ग्रामस्थ आणि वनरक्षक ननावरे यांनी



सर्वांनी मिळुन या कोल्हा प्राण्याचा जीव वाचविला आहे.जाईचादेव येथील सर्पमित्र निलेश उदरभरे यांनी या कोल्हा जातीच्या जंगली वन्य जीव प्राण्याचा जीव वाचवुन या कोल्ह्याला पन्नास ते साठ फुट खोल विहीरीमधुन बाहेर काढुन स्वता आणि वनरक्षक ननावरे यांच्या मदतीच्या सहाय्याने या कोल्ह्याचा जीव वाचवुन याच परीसरामधे सोडुन देण्यात आले यावेळेस या कोल्ह्याला थोडी इजा होउन जखम झालेली होती त्या जखमेवर हळद लावुन याच परिसरामधे या प्राण्याला सोडुन देण्यात आले निलेश उदरभरे यांनी येवढ मोठ धाडस दाखवत स्वताच्या जीवाची पर्वाह न करता स्वताचा जीव धोक्यामधे टाकुन या कोल्ह्याचा प्राण वाचवला या बद्दल या परीसरातील सर्वत्र सर्पमित्र निलेश उदरभरे यांची स्तुती आणि मोठे कौतुक केले जात आहे.

# रस्त्यावरील काटेरी झाडे तोडा : सरपंच

## उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** अधिकमासा निमित्त पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनासाठी जाणाऱ्या



भाविकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढते या पार्श्वभूमीवर लोणी गोळेगाव या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाढलेल्या काटेरी झाडांमुळे अपघात आणि रहदारीला अडथळा निर्माण होणार असल्याने झाडे तोडण्याची मागणी गोळेगाव येथील सरपंच यांनी परतूर उपविभागीय अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

याविषयी सरपंच सुजाता उद्धव डोळस यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,परतूर तालुक्यातील मौजे गोळेगाव लोणी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात काटेरी झाडे वाढली असून संबंधित विभागाला वेळोवेळी कळवून देखील कसल्याही प्रकारची कारवाई आज पर्यंत करण्यात आली नसून पुढील काही दिवसात आदिक मास चालू होणार आहे यानिमित्ताने हजारो भाविक माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील श्री भगवान पुरुषोत्तम मंदीरात दर्शनासाठी गोळेगाव मार्गे येतात त्याअनुषंगाने लोणी गोळेगाव रस्ता व्यवस्थित होणे गरजेचे आहे, रस्त्यावर गर्द काटेरी झाडी झाली असून झाडांमुळे रस्ता पूर्णपणे बंद झाला असून,सदर रस्त्यावर एक वाहन देखील व्यवस्थित पास होत नाही अशातच पुढे काही दिवसांवर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढणार असल्याने काटेरी झाडे तोडणे गरजेचे झाले आहे,जर झाडे नाही तोडल्यास मोठ्या प्रमाणावर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही विषारी काट्याची दोन्हीही बाजूने मोठ मोठी झाडे वाढली असल्याने



संबंधित विभागाला तोंडी व लेखी स्वरूपात वारंवार कळवून उडवा उडवीची उत्तरे दिली जात आहेत,वाढलेल्या झाडांमुळे रस्ता पूर्णपणे व्यापून गेला असल्याने झाडे तोडणे अत्यंत गरजेचे झाले आहे त्याकरिता,आपणांस या द्वारे विनंती करण्यात येते की आपल्या स्तरावरून संबंधित विभागाला तात्काळ आदेशीत करून निर्माण झालेली समस्या दूर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# खेळ कुणाला दैवाचा कळला

आधुनिक केसरी

मराठी चित्रपटसृष्टीवर आपल्या अभिनयाने ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांच्या निधनाने संपूर्ण चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली. याबाबत सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. एकेकाळी आपल्या रुबाबदार आणि देखण्या व्यक्तिमत्वाने मराठी रसिकप्रेक्षकांची मने जिंकणारा हा अभिनेता अचानक काळाआड गेल्याची बातमी नक्कीच वेदनादायी आहे. मात्र ज्या पद्धतीने त्यांचा शेवट झाला ती गोष्ट मनाला सुन्न करणारी आहे. महाजनी यांच्या मृतदेहाची अवस्था पाहिल्यानंतर त्यांचा मृत्यू दोन ते तीन दिवसांपूर्वीच झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली. गेले सात ते आठ महिने ते तळेगाव परिसरातील एका सोसायटीत भाडेतत्वावर एकटेच राहत असल्याची माहितीही समोर आली. एकेकाळी आपल्या अभिनयाने सर्वांना भुरळ पाडणारा हा अभिनेता अशा पद्धतीने जाणे धक्कादायकच म्हणावे लागेल. रवींद्र महाजनी यांच्यासारख्या प्रसिद्ध व्यक्तिमत्वाकडे काय नव्हते ? यशस्वी कारकीर्द, पैसा, प्रतिष्ठा, संपत्ती आणि मुलगाही एक प्रसिद्ध अभिनेता. अजून काय हवं असतं माणसाला. सर्व स्थिरस्थावर असताना देखील शेवटाला वाट्याला आलेला एकटेपणा सर्व हिरावून गेला. ते का एकटे पडले असावेत ? दोन- तीन दिवस कोणीच का त्यांच्याशी संपर्क केला नाही ? मुलगा शूटिंगमध्ये व्यस्त असू शकतो. पत्नी अंथरुणाला खिळून असल्याने त्यांच्याकडून कशी अपेक्षा करणार. परंतु मित्र, नातेवाईक, सहकारी किंवा परिचयाच्या कुणाचीच साथ त्यांना शेवटी का लाभली नसावी ? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. मात्र यातून एक गोष्ट चांगली कळली आणि ती म्हणजे पद,पैसा, प्रतिष्ठा, वलय हे सर्व केवळ एक भूलभुलैया आहे. अशावेळी या गोष्टी कमी येत नाहीत. तर कमी येतात ती जिवाभावाची, हक्काची आपल्याजवळ असणारी माणसं. म्हणूनच आपल्याकडे असणारी आपली माणसं हीच आपली खरी संपत्ती आहे. हेच आपण कमविलेले वैभव आहे. मात्र हे वैभव आपल्याला जपता आले पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकजण फक्त धावतो आहे. कुणी पैशासाठी, जबाबदारीसाठी, भविष्याच्या तरतुदीसाठी. परंतु हे सर्व करत असताना आपण सामाजिक प्राणी म्हणून जनमानसात स्वतःला जिवंत ठेवले पाहिजे. आपल्या लोकांच्या वरचेवर गाठीभेटी घेणे, त्यांची विचारपूस करणे , मदत करणे हे आपल्याकडून घडायला हवे. हल्ली मोबाईलद्वारे संपर्काची औपचारिकता पूर्ण करण्याचा ट्रेंड फोफावत आहे. परंतु टेक्नॉलॉजी कितीही प्रगत झाली तरी जिव्हाळा, आपुलकी, प्रेम आणि आधार या गोष्टी ऑनलाईन मिळवता येत नाहीत. अशा घटनेची ही पहिलीच वेळ नाही मराठी अभिनेत्री ललिता, हिंदी अभिनेत्री परवीन बबी यांच्या वाट्यालाही असाच शेवट आला. पूर्वी व्यक्तीच्या अंतिम काळात होणारी गर्दी ही माणूसपण जिवंत असल्याची साक्ष देत असे. आता काही अपवादात्मक उदाहरणे सोडल्यास मोबाईलद्वारे होणारा 'RIP' चा औपचारिक वर्षाव माणूस टेक्नॉलॉजीचा रोबो झाल्याचाच एक पुरावा आहे. म्हणूनच आता गरज आहे ती या चौकटीतून स्वतःला मुक्त करण्याची. कुटुंबाला आणि आपल्या माणसांना आवर्जून वेळ देण्याची.

सागर ननावरे

# अलिबाग-विरार कॉरीडोर भूसंपादित शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाई संदर्भात बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** शुक्रवार दिनांक 14 जुलै 2023 रोजी बहुउद्देशीय मार्गीकेचे मुख्य भुसंपादन अधिकारी दत्तात्रेय नवले यांच्यासोबत अलिबाग विरार कॉरीडोर भू संपादित शेतकऱ्यांच्या कमिटीची बैठक पनवेल तालुक्यातील भू संपादन अधिकारी मेट्रो सेंटर 1, नवीन पनवेल कार्यालयात संपन्न झाली. त्या बैठकीसाठी अलिबाग विरार कॉरीडोर बाधित शेतकरी संघर्ष समिती उरण संघटनेचे अध्यक्ष संतोष ठाकूर, सचिव -रवींद्र कासुकर, संघटनेचे प्रमुख सल्लागार ॲड सुरेश ठाकूर, सुधाकर पाटील, खजिनदार महेश नाईक, वसंत मोहिते, रमण कासकर, राजाराम जोशी, विजय पाटील, गोपाल जोशी, ॲड. निग्रेश पाटील, अनंत पाटील,नामदेव मढवी, विलास मढवी, जयवंत पाटील, अनिल म्हात्रे, नारायण घरत तसेच गाव कमिटीचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते. अलिबाग विरार कॅरीडोरचे मुख्य भूसंपादन अधिकारी दत्तात्रेय नवले यांच्यासोबत चर्चा करण्यात आली. चर्चा सविस्तर व व्यवस्थित पार पडली. शेवटी त्यांनी सांगितले की जिल्हा भूसंपादन नियोजन कमिटीची बैठक झाल्यानंतर आपल्या पुढील बैठकीत जमिनीच्या होणाऱ्या नुकसान भरपाई, पुनर्वसन बाबत तसेच भावा संदर्भात कळविण्यात येईल, असे भू-संपादन अधिकारी दत्तात्रेय नवले यांनी सांगितले.





# जाधववाडीकरांच्या प्रेमाने भारावलो : शरद गावडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जि. प. प्रा शाळा जाधव वाडी मध्ये एक तपाच्या सेवेनंतर बदली होऊन गेल्यानंतर आज निरोप समारंभाच्या कार्यक्रम घेण्यात आला. गेल्यानंतर सर्वप्रथम प्रवेशद्वारावरच सर्व विद्यार्थी रांगेत उभा राहिले होते व मुलींनी औक्षण करून टाळ्या वाजवून केलेले स्वागत समाधान देऊन गेले. जि. प. शाळा जाधववाडीचा संपूर्ण स्टाफ व ग्रामस्थ यांनी फेटा शाल व संपूर्ण कपड्याचा आहेर देऊन निरोप दिला. सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाचे औपचारिक सुरुवात झाली माझा सन्मान केल्या नंतर बऱ्याच जणांनी मनोगते व्यक्त केली माझी माजी विद्यार्थीनी पायल शेळके यांचे मनोगत लक्षवेधी व प्रभावी होते. गावडे सरांमुळे माझा सर्व विषयांचा पाया पक्का झाला व आज इयत्ता बारावी ला मी वर्गात टॉप आहे हे सांगितल्यानंतर मला कृतकृत्य वाटले.

सरांनी केलेले संस्कार लावलेले शिस्त व ज्ञाना ची शिदोरी मला पुढील आयुष्यात उपयोगी पडेल असे सांगितले. सरांनी स्पर्धा परीक्षेचा भक्कम केलेला पाया आजही मला अभ्यासात उपयोगी पडतो आहे हे तिचे शब्द ऐकून कोणतेही पुरस्कार पेक्षा हा मोठा सन्मान आहे, असे मला वाटले.

जि प प्रा शाळा जाधववाडीच्या यशामध्ये गावडे सरांचा सिंहाचा आहे, असे अडगळे सरांनी आपल्या भाषणात सांगितले. तर सिताराम धुमाळ यांनी शैक्षणिक कार्य बरोबर राजमुद्रा प्रतिष्ठान परिवारांना गावडे सरांचे नेहमीच साथ मिळाली आहे असे आवर्जून नमूद केले... राजमुद्रा प्रतिष्ठान परिवाराच्या सर्व उपक्रमातील गावडे सरांचे नेहमीच मोलाचे भूमिका राहिली आहे असेही सांगितले. जाधव सरांनी जुन्या आठवणी उजाळा देत



गावडे सरांचे शाळेच्या प्रतीसाठी नेहमीच अग्रक्रमाची व रास्त भूमिका असायचे असे सांगितले. सर्व शिक्षकांनी केलेला सन्मान ग्रामस्थांची मिळालेले सहकार्य, जिव्हाळा त्यामुळे खरंतर मी भारावून गेलो. कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दशरथ शेळके, उपाध्यक्ष सुधाकर पवार, ग्रामपंचायत सदस्य शरद शेळके, सदस्य शिवाजी शेळके, मनोहर रितूंड, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय गिड्डे ,सरपंच मीरा शिंदे, धनाजी शेळके, सत्यवान कदम, युवराज जाधव छावा ग्रुपचे अध्यक्ष महावीर जाधव, संदेश जाधव, लाला शिंदे,सागर जाधव, गणेश रितुंड, नवनाथ शिंदे, आजिनाथ शिंदे इत्यादी ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका शशिकला परचंडे,पदवीधर शिक्षक सिद्धनाथ भंडारे, प्रभारी मुख्याध्यापक पुरुषोत्तम जाधव, पदवीधर शिक्षक श्री सुनील अडगळे, श्रीमती योगिता अडगळे मॅडम ,श्री क्षीरसागर सर, स्नेहल आमले गावडे मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# गिर्यारोहक जितेंद्र गवारे यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सन २०२१-२२ चा महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा



पुरस्कार ( साहसी ) हा गिरीप्रेमींचा आघाडीचा गिर्यारोहक श्री. जितेंद्र गवारे याला जाहीर झाला आहे. २०१५ साली गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिटयूट ऑफ माउंटेनियरिंग च्या बेसिक रॉक क्लाइंबिंग कोर्समधून जितेंद्रचे वयाच्या ३९व्या वर्षी सुरु झाले. तोपर्यंत जितेंद्र हा ट्रेकिंग, भटकंती यामध्ये सहभागी होत होता. पण गिरीप्रेमी मध्ये आल्या नंतर पर्वतारोहण या साहसी खेळाची ओळख त्याला झाली. त्यानंतर त्याने गिर्यारोहणातील प्राथमिक आणि उच्च प्रशिक्षण पूर्ण करून गिरिप्रेमीच्या अनेक मोहिमांमध्ये सहभाग घेतला. यामध्ये माउंट कॅथेड्रल, माउंट नून, माउंट आमा डब्लम या मोहीमा यशस्वी करून २०१९ मध्ये कांचनजुंगा या जगातील तिसऱ्या उंच अष्टहजारी शिखरावर यशस्वी आरोहण केले. त्यानंतर २०२१ मध्ये २७ दिवसांमध्ये जितेंद्रने माउंट अन्नपूर्णा ( जगातील दहावे उंच शिखर ) व माउंट एव्हरेस्ट ( जगातील सर्वोच्च शिखर ) या दोन शिखरांवर यशस्वी चढाई करत एक विक्रम प्रस्थापित केला. २०२२ पर्यंत जितेंद्रने माउंट मनासलू, माउंट धौलगिरी, माउंट लोहत्से या अष्टहजारी शिखरांवर चढाई करत महाराष्ट्रातून सहा अष्टहजारी शिखरांवर यशस्वी चढाई करण्याचा बहुमान मिळवला. गिरिप्रेमीचे ज्येष्ठ गिर्यारोहक शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित श्री. उमेश झिरपे यांच्या मार्गदर्शनाखाली जितेंद्र गिर्यारोहणामध्ये अजूनही उत्तम कामगिरी करण्यासाठीची वाटचाल करीत आहे. गिर्यारोहण या साहसी खेळामध्ये येण्यापूर्वी जितेंद्र कुस्ती व पोहणे या दोन खेळांमध्ये उत्तम कामगिरी करत होता. नियमित व्यायाम व शारीरिक तंदुरुस्ती हा जितेंद्रच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जितेंद्रला मिळालेल्या पुरस्कारामुळे वडगाव शेरी या भागातील नागरिकांनी आणि समस्त गिरिप्रेमींनी त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# देव्हारी येथे पावसाविनाच कोळपणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी गावासह परिसरात सध्या पावसाने विश्रांती घेतल्याने पिकांच्या आंतरमशागतीच्या कामांना सुरुवात झाली आहे. यात शेतकरी भुसभुशीत झालेल्या जमिनीतील मका पिकाची कोळपणी करत पिंपळवाडी शिवारात दिसत आहे. मात्र, परिसरातील डाभा, पिंपळवाडी, टिटवी,घाणेगाव तांडा,चारुतांडा या भागांत अजूनही समाधानकारक पाऊस न झाल्यामुळे मका, कापूस, सोयाबीन, बाजारी पिकांना दमदार पाऊस असणे गरजेचे आहे.खरीप हंगामाच्या पहिल्या कोळपणीला कामांना सोयगाव तालुक्यातील देव्हारी गावात वेग आल्याचे चित्र दिसत आहे.या भागात तुरळक पावसाने बारीक बारीक तण उगवल्याने सोयाबीन व मका पिकाची कोळपणी

करण्याचा निर्णय शेतकऱ्यांनी घेतला आहे. कोळपणी करण्याच्या वेळी पिकांच्या मुळांना धक्का न लागता कोळपणी करण्याची कसरत देव्हारी येथील शेतकरी प्रा. गजानन चव्हाण,सोनू ठाकूर, विठ्ठल चव्हाण, नरेंद्र ठाकूर हे सोयाबीन, बाजरी पिकांची कोळपणी बैल व औताने करत आहेत.



यावर्षी सर्वच ठिकाणी पाऊस कमी असल्यामुळे जमिनीची पूर्णत : भूक भागलेली नसल्याने फक्त ओलाव्यावरच पिकांचे जीवदान अवलंबून आहे . त्यातच कोळपणी करताना कोवळ्या पिकांची खूपच काळजी घ्यावी लागत आहे . परंतु जमिनीत जास्त प्रमाणात तण पसरत असल्याने कोळपणी करावी लागत आहे . **उत्तम चव्हाण सरपंच तथा एक शेतकरी देव्हारी, ता . सोयगाव**

# फुलंब्री शहरात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरात गेल्या काही महिन्यांपासून डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली आहे,यात आरोग्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे, म्हणून या करिता शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख अय्युब पटेल यांनी फुलंब्री नगरपंचायतीच्या संबंधित अधिकार्यांना निवेदन देत मागणी करण्यात आली. तर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुलंब्री शहरात गेल्या काही महिन्यांपासून डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. सध्या पावसाळा सुरू झाला आहे. या पावसाचे पाणी गल्लोगल्लीत तुंबत आहे. या तुंबलेल्या पाण्यामुळे मच्छर डेंग्यू तयार होत आहे. फुलंब्री शहरातील वार्ड क्रमांक 15 मधील अब्दुल कादर कॉलनी, फत्ते मैदान, झोपडपट्टी परिसर , तहसील परिसर, शिवम नगर,पानवाडी, बाजार पट्टी परिसर व इतर ठिकाणी नगरपंचायतीने दखल घेत



औषध फवारणी करावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख अय्युब पटेल यांनी केली आहे. या प्रसंगी उमेश दुतोंडे , हारुण खान , शेरू शेख बशीर शहा, जाकेर पटेल यांच्या सह आदींची उपस्थिती होती.





नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ.

संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta









# सीटीआर लगतचा रस्ता झाला प्रताप कुमार पथ

आधुनिक केसरी न्यूज






**छत्रपती संभाजीनगर :** चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील सीटीआर म्यान्यूफॅक्चरींग इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत कंपनीचे संस्थापक स्वर्गीय प्रताप कुमार यांच्या स्मरणार्थ कंपनीच्या लगतच्या मार्गाचा प्रताप कुमार पथ असा नामकरण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रताप कुमार पथ नामकरण सोहळ्यामध्ये त्या वेळचे सहकार मंत्री अतुल सावे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, मनापा आयुक्त जी. श्रीकांत, माजी नगरसेवक राजू शिंदे, कंपनीचे उपाध्यक्ष अनिल कुमार व संचालिका प्राजक्ता कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम सीटीआर कंपनीच्या परिसरातच मोठ्या उत्साहात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनिल कुमार यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले . छत्रपती संभाजी नगर युनिटचे सामान्य प्रबंधक प्रणव शंकर यांनी सीटीआर कंपनीनी आजपर्यंतच्या औद्योगिक क्षेत्रातील केलेल्या दैदिप्यमान प्रगतीचा आढावा छान शब्दांमधून साऱ्या समोर मांडला . सीटीआरचे माजीजनसंपर्क अधिकारी सुधीर कोर्टीकर यांनी सीटीआर कंपनींनी आजपर्यंत सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून केलेल्या अनमोल कार्याचा आढावा तसेच सीटीआर कंपनीनी चार गावे दत्तक घेऊन केलेल्या विकासाच्या कार्यासाठी सीटीआरला अनेक दर्जेदार पुरस्कार देऊन मुख्य मंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सर्व गोष्टींचे विचार आपल्या भाषणातून अतिशय भावपूर्णतेनी मांडले.त्यानंतर खॉन मुकीम खॉन यांनीज्यांचे नाव रस्त्याला देण्यात आले.. असे सीटीआर कंपनींनीचे प्रताप कुमार यांचा जीवनपट आपल्या भाषणातून सुंदरतेनी उलगडून दाखविला. इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल या संस्थेतर्फे सीटीआर कंपनीनी दौलताबाद येथे केलेल्या पर्यावरणाच्या कार्यासाठी गौरविण्यात आले. संस्थेचे सहअध्यक्ष हरीश सिद्दीकी यांच्या हस्ते सीटीआर कंपनीच्या संचालिका प्राजक्ता कुमार यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण कुलकर्णी यांनीकेले. कार्यक्रमाच्या शेवटी अनिल कुमार यांनी आभार प्रदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रम संपन्न होण्यासाठी प्रणव शंकर , आर.बी.लाड यांनी विशेष परिश्रम घेतले.



# आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथील नगरपंचायत अंतर्गत येणाऱ्या वार्ड सतरा मध्ये ठिकठिकाणी विविध विकास कामांचे भूमिपूजन विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते ( दि.१४ ) शुक्रवार रोजी करण्यात आले.

येथील वार्ड क्रमांक १७ मध्ये असलेल्या नागरे वस्ती, रहेमतनगर, चोपडे वस्ती, वाघ वस्ती, बलदरी वस्ती आदि ठिकाणी सिमेंट रस्ता कॉंक्रेटीकरणाचे भुमिपुजन तर गंगावणे स्मशानभूमीत सोलर हायमास्ट अशा एकुण ८० लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसगी भाजपा तालुकाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ , माजी उपनगराध्यक्ष गजानन नागरे, मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव , अजय शेरकर, दत्ता ताठे, संभाजी नागरे, पंडित नागरे, राजू नागरे, धोंडीबा नागरे, गणेश ताठे, दत्तू शेरकर, मोहन शिंगारे, सुरेश नागरे, गणेश नागरे, कैलास ताठे, शरद नागरे, सुभाष नागरे, कैलास नागरे, दिलीप जाधव, सुनील नागरे, रेवनाथ जाधव, संजय नागरे, अमोल नागरे, रत्नाकर राऊत, संतोष नागरे, चंद्रकांत नागरे, इस्माईल पटेल, मोहम्मद पटेल, दादा पटेल,अनिस पटेल, मुजाहिद शेख, समद पटेल, बिलाल पटेल रहमान पटेल, नईम पटेल, आजीम पटेल, जाकीर पटेल, नामदेव वाघ,कडूबा वाघ,तुकाराम वाघ, रंगनाथ वाघ,सखाराम वाघ, सुखदेव वाघ,नारायण वाघ, अजिनाथ वाघ आदींची उपस्थिती होती.

# जातेगाव येथील तरुणाचा संशयास्पद मृत्यू

## राष्ट्रीय महामार्गवर रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील जातेगाव येथील एका तरुणाची हत्या करण्यात आली असा आरोप करत काल दिनांक 14 जुलै रोजी औरंगाबाद जळगाव महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. जातेगाव येथील दीपक शेजवळ या तरुणाची सुनियोजित हत्या करण्यात आली असून त्यांची हत्या करणाऱ्या आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. तसेच महाराष्ट्रात दलीत व मुस्लीम समाजवर हल्ले होत असून हल्ले करण्यारांवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली. यावेळी दलित समाजावर होत असलेल्या अन्याय अत्याचाराविरुद्ध आक्रमक आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

उठ तरुणा जागा हो बहुजन समाजाचा धागा हो. यावेळी उपस्थित ऋषिकेश सुरडकर, अजय पगारे, इम्रान सय्यद, वैभव साळवे,आकाश भालेराव, शाम हापत,आकाश भाले,चेतन धुमाळ,अनीस शहा,गणेश तायडे, सतीश भाले, पप्पू घोडसे उपस्थित होते.



# पुण्यातील गुन्हेगारांची झाडाझडती; १३ जणांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शहरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी मध्यरात्री शहरातील गुन्हेगारांची पुन्हा झाडाझडती घेतली. विशेष मोहिमेत ( कोम्बिंग ऑपरेशन ) पोलिसांनी १८२४ गुन्हेगारांची तपासणी केली. त्यापैकी ५७७ गुन्हेगार मूळ पत्यावर वास्तव्यास असल्याचे आढळून आले. बेकायदा शस्त्र बाळगल्या प्रकरणी १३ जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून दोन पिस्तूल, सात काडतुसे, १३ कोयते असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. पोलीस आयुक्त रितेश कुमार, सहपोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी गुन्हेगारांवर कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. गेल्या पंधरा दिवसांत पोलिसांनी विशेष मोहीम राबवून गुन्हेगारांची झडती घेतली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



सर्व प्रकारच्या छत्र्या
रेनकोट
स्टेशनरी
स्कूल बॅग
कंपास व टिफीन बॉक्स
वॉटर बॉटल
सर्व प्रकारचे बोर्ड गेम्स
टॉईज इत्यादी
AT
अजय ट्रेडर्स
ठोक विक्रेता
गांधी पुतला, शहागंज, छत्रपती संभाजीनगर (म.हा.) -431001
9423393145, 9834243932

आधुनिक केसरी

**साहित्य :** १ मोठा नारळ , 4 चमचे साखर, 2 चमचे मिल्क पावडर , अर्धा कप दूध , 5 ते 7 वेलदोडे किंवा आवडत असेल तर फक्त 4 ते 5 थेंब व्हॅनिला इसेन्स , 2 चमचे कॅन्डेन्स्ड मिल्क, सजावटीसाठी केशर किंवा सुकमेवा तुकडे. **कृती :** प्रथम नारळ सोलून , फोडून , त्याच्या पाठी काढून त्याचे बारीक तुकडे करून घ्यावेत व त्यातील सर्व पाणी गाळून ठेवावे .मग 3..4 तुकडे बाजूस ठेवून बाकीचे तुकडे मिक्सरच्या भांड्यातून थोडे फिरवून घ्यावेत मग त्यात नारळाचे पाणी घालून बारीक वाटावेत .आता त्यात साखर , मिल्क पावडर ,कॅन्डेन्स्ड मिल्क व सोललेले वेलदोडे घालून दूध घालावे व मस्त फिरवून एकजीव होईपर्यंत वाटून घ्यावे. आवडत असेल तर व्हॅनिला इसेन्स घालावा .बाजूला ठेवलेल्या नारळाच्या तुकड्याचे बारीक बारीक तुकडे करून ते साच्यातील प्रत्येक कुल्फी मध्ये घालून चमच्याने खाली वर करा म्हणजे प्रत्येक बाईटला तुकडा येऊन मजा येईल .



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

कुल्फीच्या साच्यामध्ये हे मिश्रण घालून त्यावर एकदम हवाबंद होण्यासाठी म्हणून अल्युमिनिअम फॉईलने वरून घट्ट झाकून व्यवस्थित पॅक करून घ्यावे . वर सुरीने एकदम बारीक चिर पाडून त्यात लाकडी कुल्फीच्या स्टिक्स घालाव्यात .त्या नसतील तर चमचे ठेवावेत म्हणजे कुल्फी धरून खाता येईल . फ्रीझरमध्ये 6 ते 7 तास ही कुल्फी सेट होण्यासाठी ठेवावी .मग बाहेर काढून एका खोलगट भांड्यात पाणी घेऊन त्यात साचा ठेवून अलगद कुल्फी बाहेर काढावी व सजावट करुन थंडगार नारळाची कुल्फी खावी. **वैशिष्ट्य :** उन्हाळ्यात तब्येतीसाठी नारळ खूपच गुणकारी असतो .सर्व शरीर ,त्वचा कोरडी पडते ,त्यासाठी स्निग्ध पदार्थ सेवन करणे फायद्याचे असते .म्हणूनच नारळ स्निग्धता तर देतोच पण थंडावा सुद्धा देतो .त्याचबरोबर दुग्धजन्य पदार्थ व गोड खाल्ल्याने पित्तही होत नाही .आणि ही कुल्फी तर चाविलासुद्धा इतकी सुरेख लागते की लहानापासून वृद्धापर्यंत सर्वांनाच पुन्हा पुन्हा खावी वाटेल.






# मंत्रालयीन लिपिकपदी बाबासाहेब पवार यांची निवड

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवले एमपीएससीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेच्या निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत भोकरदन तालुक्यातील जवखेडा( बु ) येथील बाबासाहेब बाळाजी पवार याची मंत्रालयीन लिपिक पदावर निवड झाली आहे.सामान्य शेतकरी कुटुंबातील बाबासाहेब पवार याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एमपीएससी परीक्षेत यश मिळवले आहे.

बाबासाहेब पवार यांची मंत्रालयीन लिपिक पदी निवड झाल्याबद्दल राजुर येथे त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता.यावेळी गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर सुधाकरराव दानवे, भाजप जेष्ठ कार्यकर्ते भगवानराव नागवे, प्रा.बाळासाहेब बोराडे,शालेय समिती अध्यक्ष संतोष पुंगळे यांच्या हस्ते बाबासाहेब पवार यांचा शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

बाबासाहेब पवार सामान्य व अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी आहे.दोन भाऊ,दोन बहिणी असा त्यांचा परिवार आहे. शालेय शिक्षण जवखेडा येथील कै. दशरथ बाबा माध्यमिक विद्यालयात झाले.महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच दीर्घ आजाराने आईचे निधन झाले. याचा फार मोठा आघात बाबासाहेब याच्या मनावर झाला. अशातच दोन बहिणीचे लग्न,लहान भावाचे शिक्षण आणि आईचा दवाखान्याचा खर्च यामुळे कुटूंबावर कर्जाचा डोंगर वाढत गेला.

अशा बिकट परिस्थितीतही बाबासाहेब याने शिक्षणात खंड पडू दिला नाही.पदवीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर एमपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी त्याने छत्रपती संभाजीनगर गाठले. कॉलसेंटर तसेच मिळेल त्याठिकाणी काम करत तो स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करू लागला.परिस्थिती हलाखीची असल्या कारणाने अनेक संकटाचा सामना करावा लागला. कित्येकदा उपाशीपोटी राहून दिवस काढावे लागले.परंतु बिकट परिस्थितीत नातेवाईक, शिक्षक, मित्र आणि ग्रामस्थ यांचे वेळोवेळी सहकार्य लाभल्याचे बाबासाहेबने सांगितले.

यशाने अनेकवेळा हुलकावणी दिली परंतु प्रयत्न सोडले नाही. आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बाबासाहेब पवार याने एमपीएससी परीक्षेत यश खेचून आणले.त्याच्या या यशामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल यात शंका नाही.मंत्रालय लिपिक पदासाठी निवड झाल्याबद्दल बाबासाहेब पवार यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बोगस बियाण्यामुळे अनेक शेतकरी दुबार पेरणीच्या संकटात

## फसवणूक प्रकरणी भूमिपुत्र आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्ह्यात पावसाअभावी खरिपाच्या पेरण्यासाठी शेतकऱ्यांना जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्या पर्यंत वाट पाहावी लागली. प्रदीर्घ विश्रांतीनंतर अखेर ६ जुलै रोजी जिल्ह्यात पेरणीयोग्य पावसाचे आगमन झाले. आणि चातका प्रमाणे पावसाची वाट पाहणाऱ्या बळीराजाच्या अशा पल्लवीत झाल्या. उशिरा का होईना, पण पेरणीचा मुहूर्त सापडल्याने शेतकरी आनंदित होऊन मोठ्या जोमाने पेरणीच्या कामाला लागले. परंतु पेरणी होऊन आठवडा लोटला असताना सुद्धा अनेक शेतकऱ्यांचे पेरलेले बियाणे उगवलेच नाही. परिणामी हा बोगस व निकृष्ट बियाण्याचा दुष्परिणाम असल्याचे शेतकऱ्यांच्या निदर्शनात आले. आता दुबार पेरणी केल्याशिवाय दुसरा पर्यायच नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या प्रकरणी अनेक शेतकऱ्यांनी भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडे तक्रारी केल्या असून, शेतकऱ्यांची फसवणूक केल्याप्रकरणी भूमिपुत्र आक्रमक भूमिका घेणार असल्याचे संघटनेने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात भूमिपुत्र संघटनेने म्हटले आहे की, वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बोगस बियाणे विकून काही कंपन्यांनी व महाबिजने सुद्धा फसवणूक केल्याच्या अनेक तक्रारी आहेत. केवळ बोगस बियानेच नव्हे; तर २५ आणि ३० किलो सोयाबीन बॅग ३००० ते ३५०० रुपये प्रति बॅग विक्री करून बक्कळ नफा कमविण्याच्या हव्यासापोटी शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक सुद्धा केली आहे. प्रत्यक्ष बाजारात ४५ ते ४८ रुपये प्रति किलो सोयाबीन असताना, कंपन्यांनी मात्र शंभर ते १३० रुपये प्रति किलो प्रमाणे विक्री करून शेतकऱ्यांना लुबाडले आहे. तथापि एवढे लुटूनही अनेक शेतकऱ्यांचे पेरलेले बियाणे उगवलेच नसल्याने बोगस बियाण्याचा पर्दाफास उघड झाला आहे.

याबाबत शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. सदर तक्रारींची तात्काळ दखल घेऊन कृषी विभागाने पंचनामे करावेत, व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दुबार पेरणीसाठी आर्थिक मदत मिळावी यासाठी भूमिपुत्र कडून जिल्ह्याचे कृषी अधीक्षक व जिल्हा कृषी अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली असल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून शेतकऱ्यांच्या आलेल्या तक्रारींचा पाठपुरावा तालुकास्तरीय भूमिपुत्र पदाधिकाऱ्याकडून केला जाणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत भूमिपुत्र शेतकरी संघटना स्वस्थ बसणार नसल्याचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी म्हटले आहे.

**राज्य शासनाकडून बियाणांचे प्रमाणीकरण करण्यात आले**



असूनही त्यामध्ये उगवण शक्ती का नाही ? की प्रमाणीकरणातच काही घोळ आहेत ? बियाण्यांचे पासिंग करताना पुरेशा टेस्टिंग केल्या होत्या का ? बियाणे खराब असताना पासिंग कसे केले ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उभे राहिले असून, याबाबत भूमिपुत्र संघटना संबंधित प्रशासनास जाब विचारणार आहे .

**–विष्णूपंत भुतेकर, ( संस्थापक अध्यक्ष भूमिपुत्र संघटना )**

# सालगड्याची मुलगी बनली पोलीस उपनिरीक्षक

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** वणी तालुक्यातील पुरड येथील शिवाली उलमाले हिने पहिल्याच प्रयत्नात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस उपनिरीक्षक पद मिळविले. विशेष तिची घरची परिस्थिती बेताची असून वडील सालगडी म्हणून काम करतात. घरची परिस्थितीची जाणीव ठेवत शिवालीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करण्यासाठी जीवतोड मेहनत घेतली. अभ्यासासाठी कोणताही शिकवणी वर्ग लावला नाही. तिचे पोलीस उपनिरीक्षक पदाच्या निवड यादीत नाव झळकले आणि कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. वडील गावातच एका शेतकऱ्याकडे सालगड्याचे काम करतात.

# चंद्रपूर जिल्ह्यात वाघांचा उच्छाद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चिमूर तालुक्यातील डोमा येथील डोमडू रामाजी सोनवाने ( ६५ ) या गुराख्यावर वाघाने हल्ला करून घटनास्थळीच ठार केले. ही आज शनिवार १५ जुलैच्या सकाळी उघडकीस आली. दरम्यान, या एकाच आठवड्यात वाघाने तीन जणांना ठार केल्याने भीतीचे वातावरण आहे. डोमडू सोनवाने हा १४ जुलै रोजी नेहमीप्रमाणे कंपार्टमेंट नंबर ४७४ येथे गावातील जनावरे घेऊन चराईसाठी गेला होता.

अचानक पट्टेदार वाघाने जनावरावर झडप घातली. त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात वाघाने गुराख्यावर हल्ला चढवून ठार केले. सायंकाळी जनावरे घरी पोहोचली, परंतु गुराखी घरी न आल्याने घरच्या व गावातील लोकांनी जंगलात शोध घेतला असता सोनवाने यांचा मृतदेह आढळून आला. काही अंतरावर गाईचा बछडा सुद्धा वाघाने खाल्लेल्या अवस्थेत आढळून आला. वनविभागाने घटनास्थळ गाठून गुराख्याचा मृतदेह ताब्यात घेतला. वन विभागाने मृताच्या कुटुंबीयांना २५००० रुपयांची मदत केली.





# केंद्रीय प्राथमिक शाळेसमोर साचले तळे

वडोद बाजार : फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील केंद्रीय प्राथमिक शाळेच्या मैदानात पावसाचे पाणी साचत असल्याने या शाळेला तळ्याचे स्वरूप आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. वडोद बाजार येथील केंद्रीय प्राथमिक शाळेच्याचारही बाजूंनी फेव्हर ब्लॉक बसवण्यात आले आहे. मात्र मध्यभागी पाणी साचत असून यामुळे विद्यार्थांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे शाळेतील विद्यार्थांना या डबक्यात साचलेल्या पाण्यामुळे डास मच्छर होत आहे तर त्यात गवत उगले आहे. या ठिकाणी जणू तळे साचले आहे. याकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे. विद्यार्थांना दररोज या पाण्यातून जावे लागत आहे तर जास्त पाऊस पडल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचते. विद्यार्थांना, शिक्षकांना दररोज या साचलेल्या पाण्याचा सामना करावा लागत आहे.

## क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मुंबई-आग्रा महामार्गाजवळ असलेल्या जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वरखेडी-कुंडाणे येथील मैदानावर 'झाडे लावा, झाडे जगवा' या उपक्रमांतर्गत शनिवार दि. १५ जुलै रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन, बिल्डर्स असोसिएशन, क्रेडाई, कन्सल्टिंग इंजिनिअर्स असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोड यांच्या संयुक्त विद्यमाने व हॉटेल कृष्णाईच्या सौजन्याने या वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे प्रदेश सदस्य, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे वरिष्ठ सल्लागार, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे होते. महाराष्ट्रगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. पियुष कंस्ट्रक्शनचे संजय देसले यांनी कार्यक्रम आयोजनाची भूमिका प्रास्ताविकातून मांडली. ॲड. कुंदन पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

राष्ट्रगीतानंतर मैदानालगत मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करुन रोपांना पाणी देण्यात आले. आयोजकांतर्फे देण्यात आलेल्या न्याहरीचा सर्वांनी आस्वाद घेतला. याप्रसंगी जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव संदीप शिंदे, विजय पंजाबी, जगदिश गायकवाड, कैलास पाटील, अनिल वाडेकर, लहू पाटील, सुशील पोपली, योगीराज मराठे, प्रकाश पाटील यांच्यासह अन्य मान्यवर व क्रीडाप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जगदिश देवपूरकर यांनी केले.





## चाकूने हल्ला करून युवकाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** चार युवकांनी धारदार चाकूने हल्ला करून एका २५ वर्षीय युवकाचा निर्घृण हत्या केली. ही घटना शुक्रवारी रात्री ९.४५ वाजताच्या सुमारास यवतमाळ शहरातील स्टेट बॅंक चौकात घडली. पोलिसांनी तीन संशयिताला ताब्यात घेतले असून फरार असलेल्या एका आरोपीचा शोध सुरु आहे.

चेतन बाबाराव चित्रे ( २५ ) रा संकट मोचन यवतमाळ असे मृतकाचे नाव आहे. गोकुळ अष्टमीला त्याचा मारेक-यासोबत वाद झाला होता. तसेच आज दुपारी मृतकाचे काही युवकासोबत वाद झाला होता. अशातच आज रात्री ९.४५ वाजता सुमारास चार युवकांनी धारदार चाकुने चेतन याच्यावर सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या चेतन याला येथील वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी चेतनचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक पियूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पुजलवार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक आधारसिंग सोनोणे, शहर ठाणेदार सतीश चवरे यांच्यासह पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेवुन पंचनामा केला. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून, खुनाचे नेमके कारण कळु शकले नाही. पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर